श्रीसर्वसारदर्पण.

॥ ॐ परमात्मने नमः ॥

श्रीसर्वसारदर्पण

अथवा

जगांत मनुष्यानें कसें वागलें असतां थोर व सुखी होईल याविषयीं माहिती.

सिताराम रघुनाथ अधिकारी
यांनीं प्रसिद्ध केलें.

तें
मुंबईत
जावजी दादाजी
यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

सन १८९९.

किंमत १। रुपया.

नामदार

डा. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर

एल्. एम्., जे. पी.

मुंबई सरकारच्या कायदेकौंसिलचे मेंबर, मुंबई युनिव्हरसिटीचे फेलो, मुंबई म्युनिसिपल कारपोरेशनचे व स्ट्यांडिंग कमिटीचे मेंबर आणि मुंबई मेडिकल युनियनचे व ग्रांटकॉलेज मेडिकल सोसाइटीचे प्रेसिडेंट

यांस

त्यांची विद्वत्ता, ज्ञान, धर्मश्रद्धा, परोपकारीपणा,

इ० अनेक अमूल्य गुण पाहून

हा ग्रंथ

नम्रतापूर्वक व अत्यादरानें नजर केला असे.

प्र०

प्रस्तावना.

मनुष्यांस ऐहिक व पारमार्थिक सर्व प्रकारची माहिती थोडक्यांत मिळावी ह्मणून हा लहानसा ग्रंथ बुद्ध्या सारांश-रूपानें लिहिला आहे, नाहीं तर यांतील कित्येक प्रकरणें इतकीं महत्वाचीं आहेत कीं त्यां प्रत्येकावर एक एक मोठा ग्रंथ लिहिला तरी त्यांचें स्पष्टीकरण पुरतेपणीं होणें कठीण आहे. तथापी विचारी मनुष्यांस त्यां संबंधांतही या ग्रंथावरून बरीच माहिती मिळून समज होण्यासारखा आहे. विद्वानांच्या वाचनांत तर पुष्कळ विषय येत असल्यामुळें त्यांचा यांतील लेखांविषयीं सहज चांगला समज होणार आहे. या ग्रंथांतील महत्वाचा बहुतेक भाग महाज्ञानी व समर्थ सद्गुरु श्रीमत् वैवस्वतस्वामी यांचेपासून मिळालेल्या माहितीवरून लिहिला असून बऱ्याच संबंधांत त्यांच्या ग्रंथाचे आधारही घेतले आहेत; इतकेंच नव्हे, हा ग्रंथ त्यांच्या आज्ञेवरूनच लिहिला आहे, किंबहुना हा ग्रंथ करणारे तेच आहेत असें ह्मटलें तरी चालेल. ग्रंथाची मालकी जरी माझी आहे तरी ती कृपा करून त्यांनीं मला दिली आहे असें मी समजतों व तसें समजणेंच रास्त होय. शेवटीं यांतील विषयांच्या प्रसिद्धीपासून परोपकार व्हावा ह्मणजे आपल्या जन्माचें सार्थक करण्याविषयींच्या मनुष्यांच्या सुविचारांस यापासून मदत व्हावी हा जो महाराजांचा हेतू तो तडीस नेण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना करून ही लहानशी प्रस्तावना पुरी करतों.

प्र०

अनुक्रमणिका.

शुद्धिपत्र.

शुद्ध	अशुद्ध	पृष्ट	ओळ
ही स्वच्छता	स्वच्छता	७	४
घरें असावीं	घरें, असावीं	१७	१४
औषधें	औषधें नेहमीं	२०	२
शहरें	शहरेंः	२३	१८
संभव	संबंध	२८	७
सांगोपन	संगोपन	२८	१९
स्वतःनुद्देशीय	स्वतःउद्देशीय	५३	१७
,,	,,	५३	१८
जिंकावें.	जिंकावें,	५९	११
उकळवून	उकळून	७३	११
नीतिपर व	नीतिपर,	९०	१०
नक्षत्रें	नक्षत्र	८२	९
अतीसजिवापासोनी	अतीस जीवापासोनि	१२७	१७
असतें,	असतें.	१४५	१४

॥ ॐ सच्चित्ज्ञानानंदाय नमः ॥

श्रीसर्वसारदर्पण

अथवा

जगांत मनुष्यानें कसें वागलें असतां थोर व सुखी होईल याविषयीं माहिती.

प्रकरण १—शरीररक्षण.

उत्पत्ति—स्त्रियांचे गर्भाशयांत पुरुष व स्त्री यांचे मिश्ररेतबिंदूपासून गर्भाची ह्मणजे शरिराची उत्पत्ति होते. एकाच वेळीं उभयतांचें रेतस्खलन झालें असतां व गर्भाशयांत रोगामुळें अगर इतर कांहीं कारणामुळें कांहीं बिघाड नसल्यास बिंदूची धारणा होते. ज्या जातीचा प्राण बीजांत असतो त्या ह्मणजे नर अथवा मादी या जातीची किंवा पातकामुळें नपुंसकाची उत्पत्ति होते. अनियमितपणें ज्या स्त्रीचें किंवा पुरुषाचें रेत वारंवार पतन होतें त्यांच्या रेतापासून बीजधारणा होण्याचा बहुधा संभव नसतो. कधींकधीं गर्भाशयांत एकाच वेळीं दोन व क्वचित् तीन बिंदूंचीही धारणा होते. आणि मनुष्येतर प्राण्यांच्या संबंधांत तर अधिक बिंदूही रहातात. बिंदूपासून उत्पत्ति होण्याचें तत्व परमेश्वरापासून तहत सर्व चराचरांस सारखें लागू आहे. गर्भांत आईबापांचे

गुण स्थित असतात, त्यांत नरांत नराचे व मादींत मादीचे विशेष दृष्टोत्पत्तीस येतात. शिवाय गर्भधारणेच्या वेळेस उभय स्त्रीपुरुषांची असलेली स्थिति (मानसिक व शारीरिक), गर्भधारणाची वेळ व गर्भ वाढत असतां स्त्रीची मानसिक स्थिति यांचा परिणामही गर्भाचे शरिरावर आणि गुणांवर होतो; व गर्भाचें लक्षण आईच्या मानसिक स्थितीवरून आणि गर्भ राहिल्यापासून आईबापांस होणाऱ्या सुखदुःखांवरून ओळखितां येतें. सजातीय रेतापासून उत्पन्न झालेल्या स्त्रीपुरुषांच्या संगमापासून उत्पन्न झालेली संतति फार दुर्गुणी होते व भिन्न जातीच्या रेतांनीं दूषित झालेल्या योनीमुळें होणारी संततिही दुर्गुणी असते. (सजातीय ह्मणजे अगदीं सन्निधचे आप्त जसे भाऊबहीण, पिताकन्या, मातापुत्र इ० व भिन्नजातीच्या रेतांनीं ह्मणजे व्यभिचारांनीं असें समजावें.) सबब विवाह अशा प्रकारें स्वकुळांत होऊं नये, व्यभिचाराची सक्त मनाई असावी, रतिसंभोग सुवेळीं आनंद स्थितींत करावा व गर्भिणींनीं उल्हासित वृत्तीनें राहावें. तीन महिन्यांनंतर संभोग वर्ज्य करावा, रेचक व अति उष्ण पदार्थांचें सेवन करूं नये आणि शरिराला किंवा मनाला मोठा धक्का बसूं देऊं नये. गर्भिणीचें आंग हालतें राहील असा स्वल्प उद्योग तिनें केला असतां प्रसूतीचे संबंधानें फार कष्ट होत नाहींत.

मुलांचें संगोपन—प्रसूतीनंतर स्त्रीला वारा फार न लागेल असें जपावें, कारण रिकाम्या जागेंत वारा त्वरित प्रवेश करतो; तसेंच शीतता न होण्याविषयींही जपावें. तथापि हवा अगदींच बंद करूं नये. प्रसूतीच्या ठिकाणीं स्वच्छता

ठेवावी, गरम कपडे वापरावे व खाणेंपिणेंही उष्णच उपयोगांत आणावें, तथापि फारच उष्णता होईल असें करूं नये. मुलास नेहमीं एकाच बाजूस निजवूं नये व दिवा एकाच ठिकाणीं नेहमीं ठेऊं नये ह्मणजे मुलाचें डोकें एकाच बाजूस दाबलें जाऊन चपटें होणार नाहीं. मुलास उंच ठिकाणीं निजवीत जावें, कारण जमिनीबरोबरील हवा बाधक असते व मुंगी, घोण, मांजर वगैरे प्राण्यांपासून त्याला इजा होण्याचा संभव असतो. मुलाला फार उशीर एकटें व काळोखांत राहूं देऊं नये व तें रडूं लागल्यास फार दक्षतेनें त्याच्या रडण्याची परीक्षा करावी. भुकेमुळें रडत असल्यास दूध पाजूं लागलें ह्मणजे चूप राहील, तसें न राहिल्यास त्याला काय इजा आहे तें शहाणपणानें ओळखावें व योग्य उपाय करावा; उपाय करण्यास विलंब बिलकूल लावूं नये. मूल जिचे अंगावर पीत असेल तिनें खाण्यापिण्याचें पथ्य संभाळावें. मुलांस गायीचें वगैरे दूध पाजणें झाल्यास दुधावरील साय काढून पाजावें. मूल बसूं व रांगूं लागल्यावर त्यास हलकें अन्न व पाणी देऊं लागल्यास हरकत नाहीं. मग तर त्यास फारच संभाळावें, एकटें राहूं देऊं नये, कारण तें भलतेंच खाण्याचा अथवा विस्तव, दिवा वगैरे यांपासून त्याला इजा होण्याचा संभव असतो. पांच वर्षांचें मूल होई तोंपर्यंत त्याला रागाऊं अथवा मारूं नये, जरूर तर युक्तीनें व प्रीतीनें समजवावें; मात्र हळू हळू तोंड धुणें व हातपाय, कपडे आणि आंग स्वच्छ ठेवणें याविषयीं वळण लावावें. तसेंच लहान लहान युक्तीच्या, नीतिपर व मनोरंजक गोष्टी सांगून त्याचा समज वाढवावा व त्यास सन्मार्गाचें

वळण लावावें आणि मूळाक्षरें, अंक हीं हळू हळू त्यास शिकवावीं. तसेंच अग्नि, पाणी, लागणें, पडणें व जनावरें वगैरेंपासून होणाऱ्या दुःखाविषयींही त्याचा समज पाडावा. मुलास स्नान घातल्यावर त्यास लागलीच फार हवेवर राहूं देऊं नये व त्याचें आंग तावडतोब साफ पुशीत जावें. लहान मुलास रोगी, अशक्त व वृद्ध अशांच्या शेजारीं निजूं देऊं नये किंवा अंगाला आंग लागून फार वेळ राहूं देऊं नये. मुलाच्या आंगांत बहुधा नेहमीं ऋतुमानाप्रमाणें कपडे असावे. मुलास गोड फार खाण्यास देऊं नये. स्त्रीनें गरोदर असतां त्यास अंगावर पाजूं नये.

शरीरस्वच्छता बाहेरील—शरीरसफाई दोन प्रकारची आहे. एक शरिराच्या आंतील व दुसरी बाहेरील. बाहेरील सफाईपासून शरीर सुदृढ होतें, रोग होत नाहींत, अन्नपचन होतें, वर्ण चांगला रहातो, अंतःकरण साल्हाद रहातें व आयुष्य वाढतें. बाहेरील सफाई ह्मणजे हातपाय धुणें, तोंड धुणें, स्नान करणें, गुह्येंद्रियें व केंस स्वच्छ ठेवणें. उष्ण प्रदेशांत बूट, मोजे व विजार वापरणाराशिवाय इतरांनीं बाहेरून घरांत आलें ह्मणजे पाय, हात व तोंड धुवावें. उष्णदेशांत गुद वगैरे प्रक्षालनाकरतां थंड पाणी योजावें व थंड देशांत उष्ण पाणी वापरावें. सकाळीं उठल्यावर शौचविधि झाल्यानंतर तोंड आंतून व बाहेरून स्वच्छ धुवावें. त्या वेळीं दांत व जीभ चांगली साफ करावी, मात्र जेवणानंतर तोंड धुतेवेळीं जीभ घांसूं नये, दांत साफ करण्याच्या संबंधांत दांतांच्या शिवणीस व हिरड्यांस नुकसान न होईल अशी तजवीज असावी. जेवणानंतर बाहेरून सर्व चेहेरा न

धुतला तरी प्रत्येक वेळीं पाण्याचा हात दोनही डोळ्यांवरून ओढावा, त्यामुळें नेत्ररोग होत नाहींत. तोंड व हातपाय धुतल्यावर स्वच्छ कपड्यानें साफ पुसावे. गुह्यस्थानचे केंस सफाईच्या विरुद्ध आहेत. इतर ठिकाणीं राखलेल्या सर्व केसांना दिवसांतून एकदां तरी तेल लावून विंचरून साफ करावे. जें तेल लावावयाचें तें अत्तराप्रमाणें केसांला नुकसान करणारें किंवा चिकटा धरणारें नसून स्वच्छ खोबरेल तेलाप्रमाणें असावें. नखांत मळ राहील अशीं तीं वाढूं देऊं नयेत. डोळे, कान, नाक यांचा मळ राहूं देऊं नये; घाम अंगाला जिरूं देऊं नये, पुसून काढावा, व तो बंद झाल्यावर बराच वेळ गेल्याशिवाय स्नान करूं नये किंवा उघडी हवा घेऊं नये; नाहींतर एकदम शीतता किंवा वायु होण्याचा संभव असतो. स्नान ऊन अथवा थंड पाण्यानें प्रकृतीच्या मानाप्रमाणें व ऋतूला अनुसरून करावें. उष्ण प्रकृतीच्या मनुष्यानें थंड पाण्यानें व शीत प्रकृतीच्या मनुष्यांनीं उष्ण पाण्यानें करणें चांगलें. तसेंच उन्हाळ्यांत थंड व इतर ऋतूंत ऊन पाणी उपयोगांत आणणें बरें. ज्याला शीतोपचार सुखावह वाटतात किंवा सोसतात त्याची प्रकृति उष्ण व याच्या उलट त्याची प्रकृति शीत असें समजावें. स्नान करणें म्हणजे सर्वांग चांगलें चोळून धुवून साफ करणें. स्नान करतांना पाहिजे तर साबू लाऊन आंग धुवावें किंवा पूर्वी सुगंधी उटणें लावून मग स्नान करावें. उटण्यापासून कांती वाढते व आंगाला सुगंध येतो व साबूनें मळ जाऊन आंग स्वच्छ होतें. उटणें लावलें असतां त्याच दिवशीं साबू लावूं नये, स्नान केल्यावर एक तासाच्या आंत कांहीं तरी

खावें, नुसतें पाणी रिकाम्या पोटीं कधींच पिऊं नये; व जेवणानंतर तीन तासांचे आंत स्नान करूं नये, कारण अन्न जिरल्यावर स्नान केलें असतां जठराग्नि जास्त प्रदीप्त होतो व जिरल्यापूर्वी केलें असतां जठराग्नी मंद होऊन अन्न-पचनास हरकत होते. स्नान केल्यावर अंगाला भस्म लावलें असतां त्वचेला शीततेची व उन्हाची बाधा होत नाहीं. स्नानाला, तोंड धुण्याला वगैरे पाणी अस्वच्छ असल्यास उलट बाधक होतें. ज्वर अंगांत असतां स्नान करूं नये व दुखण्यानें फारच अशक्तता झाल्यावरही लौकर स्नान करणें चांगलें नाहीं. ज्वर अगदीं नाहींसा झाल्यावर व अशक्तता अमळ कमी होत चालल्यावर स्नान करावें. अशा वेळीं पहिल्यानें स्नान करणें तें पाणी तापवितांना त्यांत कांहीं उष्ण अथवा वायुहारक पदार्थ घालावे व पाणी चांगलें तापविल्यावर जितकें गरम पाहिजे तितकें आपल्या आपण निऊं द्यावें, त्याला थंड करण्याकरतां आंत थंड पाणी घालूं नये. कित्येक ठिकाणचें व नद्यांचें वगैरे पाणी रोगहारक असतें, त्यांस तीर्थें ह्मणतात; परंतु ज्याप्रमाणें नेहमीं एकच पदार्थ वापरल्यामुळें तो आंगवळणीं पडतो व त्यायोगें त्याचा गुण समजत नाहींसा होतो त्याप्रमाणें रोज तीर्थस्नान करणारापेक्षां कधीं कधीं करणारास फायदा होतो. स्नानानंतर सुगंधी गंध लावावें किंवा उटी लावावी व अनेक प्रकारचे सुगंध ग्रहण करावे. रजस्वला, मळीण देह व वस्त्रें धारण करणारे आणि दुर्गंधीचे धंदे करणारे यांच्याशीं निकट संसर्ग ठेऊं नये. अन्न अंतरोपयोगाला चांगलें पण बाह्य संबंधांत अस्वच्छ असून मुंग्या व माशांचा त्रास वाढविणारें

आहे ह्मणून तें इकडे तिकडे लागूं देणें अथवा पडूं देणें चांगलें नाहीं. हें सर्व बाहेरील स्वच्छतेविषयीं झालें, आतां शरिराचे आंतील स्वच्छतेविषयीं विचार केला पाहिजे.

शरीरस्वच्छता आंतील—स्वच्छता रहाण्याकरितां श्वासोच्छ्वासाबरोबर आंत घ्यावयाची हवा, पाणी व खाण्याचे सर्व पदार्थ स्वच्छ उपयोगांत आणण्याविषयीं फार जपलें पाहिजे. अस्वच्छ हवा ह्मणजे जिला दुर्गंधी असते तीच असें नाहीं. कित्येक अपकारक हवेला दुर्गंध मुळींच येत नाहीं परंतु ती रोगतत्वांनीं भरलेली असते व श्वासोच्छ्वासाबरोबर पोटांत गेल्यावर मोठमोठे भयंकर रोग उत्पन्न करते. मलमूत्रापासून व पदार्थ कुजत असतां त्यांपासून हवा अस्वच्छ व बाधक बनते. घरांतील ओल्या जमिनीपासूनही वाईट हवा उत्पन्न होते, व कोंडलेल्या खोलींत जेथून मोकळी हवा फिरत नाहीं किंवा प्रकाशानें हवेचें पृथक्करण होत नाहीं तेथील हवाही बाधक होते. हवेंत धूर मिश्र झाल्यानेंही ती बिघडते. बाधक हवा स्वच्छ हवेपेक्षां बहुधा जड असते ह्मणून तिचें प्रमाण जमिनीबरोबर जास्त असतें ह्मणून नुसत्या जमिनीपेक्षां पलंगावर किंवा खाटेवर निजणें व उंचावर रहाणें चांगलें. तसेंच मोकळी व सुगंधी हवा घेणें फार हितावह. निदान अन्नग्रहणापूर्वी किंवा तें ग्रहण करतांना तरी सुगंधी हवा मिळाल्यास अन्न विशेष रुचिकर लागतें व शरिराचे आंतील भाग स्वच्छ झाल्यामुळें अन्नांत कदाचित् कांहीं जरी अस्वच्छ किंवा बाधकपणा असला तरी तो बाधत नाहीं. ह्मणून अन्नसेवनापूर्वी व अन्नसेवन करतांना सुगंधी पदार्थ जाळून त्यांचा वास किंवा त्यांपासून शुद्ध होणारी

हवा ग्रहण करावी व फुलांचा वास घ्यावा. हिंदु लोकांत देवपूजा करण्याची, जेवणाचे वेळीं सुगंधी पदार्थ जाळण्याची व घराचे मागले बाजूस जेथें पाणी सांडून पदार्थ कुजण्याचा व हवा बिघडण्याचा संभव असतो तेथें तुळशीचें झाड लावण्याची असलेली चाल फार चांगली आहे. इतर सर्व झाडांपेक्षां तुळशीचे झाडांत अस्वच्छ हवा शोषून स्वच्छ करण्याचा गुण जास्त आहे. तसेंच पिंपळाच्या झाडापासूनही स्वच्छ हवा फार उत्पन्न होते. पिण्याचें पाणी दिसण्यांत स्वच्छ व दुर्गंधीरहित असावें. तें दुहेरी कपड्यांतून गाळल्याशिवाय पिऊं नये. वाईट पाणी पिण्याचा प्रसंग आल्यास तें पहिल्यानें चांगलें तापवून व मग थंड करून प्यावें ह्मणजे आंतील बाधक अंश सगळा जळून जातो. शीततेपासून रोग झालेला असल्यासही पाणी तापविलेलेंच पिण्यास द्यावें. पोट रिकामें असतां नुसतें पाणी पिऊं नये, तथापि अजीर्णावर तें प्याल्यास चांगला गुण करतें. पाणी उभ्यानें, वांकडें तिकडें होऊन व निजून पिणें चांगलें नाहीं. वायूच्या आजाऱ्यास पाण्यांत वावडिंगें घालून व तें चांगलें तापवून व निववून द्यावें. उष्ण प्रकृतीच्या मनुष्यांनीं उन्हाळ्यांत वाळा घातलेलें पाणी प्यावें. पाण्याचीं भांडीं उघडीं कधींही ठेवूं नयेत व तीं आंतून व बाहेरून रोज स्वच्छ धुवून मग त्यांत पाणी भरीत जावें. पाणी घाईनें पिऊं नये व तें पीत असतां बोलूं किंवा हसूं नये. खाणें दोन प्रकारचें आहे. आहार (अन्न ह्मणजे भोजन) व उपहार (फलआहार किंवा फराळ). पहिल्यांत भात, भाकरी, भाजा, अनेक तऱ्हेचीं पक्वान्नें, मांसें, वरण, आमट्या वगैरे सर्वांचा समावेश होतो व मनुष्यें

बहुधा नियमानें दोन, तीन किंवा चार वेळ त्याचा उपयोग करतात. आणि दुसऱ्यांत चहा, काफी, फळें, दूध, मिठाई व अन्नाशिवाय इतर सर्व खाद्य पदार्थांचा समावेश होतो व त्यांचा उपयोग करण्याचा केवळ नियमच असतो असें नाहीं. अन्न कधींच अगदीं पोट भरून खाऊं नये व तें प्रकृतीच्या मानाप्रमाणें कमी किंवा जास्त उष्ण असावें. रोग्यांनीं तर लवकर पचन होईल व रोगाला विरुद्ध होणार नाहीं असें अन्न खावें. मुलांस गोड जास्त खावयास देऊं नये. शीत व रेचक फळें खाल्लीं असतां त्यांवर पाणी पिऊं नये. जेवल्याबरोबर लागलेंच निजूं नये. फणसावर विडा खाऊं नये. तूप व मध समभाग करून खाऊं नये. धातूच्या भांड्यांत चांगली कल्हई असल्याशिवाय आंबट पदार्थ शिजऊं नये, ठेऊं नये व खाऊं नये. ज्या पदार्थांचा गुण आपल्यास माहीत नाहीं तो खाऊं नये. कच्चें अथवा आंबलेलें अन्न खाऊं नये. अन्न नेहमीं झांकलेलें असावें. अन्न ज्या पदार्थांचें तयार करावयाचें अथवा जे पदार्थ खावयाचे ते नासलेले किंवा किडके आहेत किंवा कसें तें पहिल्यानें पाहिल्याशिवाय व त्यांतील केरकचरा वगैरे काढल्याशिवाय उपयोगांत आणूं नयेत. औषधें घेण्यांत अथवा देण्यांत चूक किंवा हयगय करूं नये. अन्न भूक असेल तरच खावें, नाहींतर वेळेवर दोन तीन घांस खाऊन पाणी प्यावें अथवा नुसती पातळ पेज प्यावी. दुखणेकऱ्यास पेज देणें ती दुखण्याचें व त्यास देत असलेल्या औषधाचें शीत उष्णमान पाहून, शीत उष्ण गुणाची जरूर तशी करून द्यावी. साबूच्या तांदुळांची पेज बहुधा शीत असते. कोणत्याही रव्याची पेज करणें तर त्यांत पदार्थ, दु-

खण्याचें शीत, उष्णमान जसें असेल तसे घालावे. जरूर तर रवा पहिल्यानें नुसता अथवा थोड्याशा तुपांत थोडा भाजावा. मीठ, साखर, दूध, सुंठ, मिरीं, वगैरे पदार्थ जरुरीप्रमाणें घालावे. पंधरा दिवसांतून एक दिवस तरी उपोषण करावें, तथापि लहान मुलांनीं, गर्भिणींनीं व अशक्तांनीं उपोषण करूं नये. उपोषण दोन प्रकारचें असतें, अगदीं निराहार किंवा कंद, मुळें व फळें खाऊन रहाणें. उपोषणामुळें अजीर्णांश नाहींसा होऊन प्रकृति निर्विकार होते. उपोषणाचे दिवशीं स्नान करण्यास हरकत नाहीं व जागरण केलें असतां चांगलें, त्यामुळें मस्तकांतील शीतांश नाहींसा होऊन मस्तकशुद्धि होते. मांसभक्षणाच्या संबंधानें महाज्ञानी श्रीमत्गुरुवैवस्वत स्वामी ह्मणतात "अन्य साधनें असतां शरीरपोषणा ॥ जरी हिंसा करिती मनुष्यें जाणा ॥ तरी पातक घडे त्यांना ॥ अहिंसामार्ग प्रशस्त ॥" सबब मांसभक्षण करणें चांगलें नाहीं. त्यापासून मनुष्य अल्पायुषी होण्याचा संभव असतो. यावर कोणी असा आक्षेप घेईल कीं, मांसभक्षण करणारीं मनुष्यें पुष्कळ वर्षें वांचल्याचीं उदाहरणें आहेत, पण तसें वांचण्याला आयुष्य वाढविणारीं अनेक दुसरीं साधनें—नियमित खाणें पिणें, स्वच्छता, दुसऱ्यांचा जीव वांचविणें वगैरेसारखीं ऐहिक व पारमार्थिक असलीं पाहिजेत. त्या साधनांपुढें मांस आहारांतील दुर्गुणांचा जोर चालत नाहीं. विचार करून पाहिलें असतां मनुष्याचे मुखाची आंतील रचना मांसभक्षक प्राण्याप्रमाणें मुळींच नसते, त्यावरून मनुष्याचे देहाला मांसभक्षणापासून फायदा नसला पाहिजे. मांसभक्षणामुळें पुष्टि व धाडसपणा

प्राप्त होतो हें खरें, पण त्यापासून पोसणारे शरिराचे भाग टिकाऊ व निरोगी कमी असतात. थंड प्रदेशांत मांस आहार अनेक कारणांमुळें जरी करावा लागतो तरी तो न केला असतां चालण्यासारखें असतें. दीर्यायुषी मनुष्यांत मांस भक्षण न करणारे व अमली पदार्थांचा उपयोग न करणारे असेच लोक पुष्कळ आढळून येतात. अमली पदार्थांमुळें, त्यांचा उपयोग औषधाप्रमाणें, माफक, नियमितपणें व पथ्य सांभाळून केल्यास फायदा होतो. श्रमामुळें थकलेल्या मनुष्यानें अमल केल्यास थकवा निघून जातो. या संबंधांत स्वामी महाराज ह्मणतात "एक अविचारें कैफ करिती ।। गुंग होऊनि संकटीं पडती ।। दुःखी अल्पवयी होती ।। ह्मणूनी मादक पदार्थ निंद्य पै ।।–परि दृढमनें विचारें तो उपयोगितां ।। तदाधीन होऊनि न वाढूं देतां ।। शौर्यधैर्य चातुर्यानंद होय चित्ता ।। तरी पातक नसेची ।।–तथापी मुळींच त्या स्पर्श न करी जो नर ।। तो मोक्षाधिकारी होय सत्वर ।। पापभीरू होय तो निर्धार ।। दीर्घायुष्यी सद्‌गुणी जाण पां ।। यावरून सिद्ध होतें कीं अमली पदार्थांचा रीतीनें उपयोग केला असतां वाईट नाहीं. तथापि न केल्यापासून सद्‌गुण विशेष वास करतात. अर्थात सद्‌गुणांत शौर्य, धैर्य व चातुर्य यांचाही समावेश होतोच; मग कैफ करण्यापासून जे हे सद्‌गुण प्राप्त होतात त्यांत व कैफ न करणारांत जे हे सद्‌गुण असतात त्यांत फरक काय अशी कोणालाही स्वाभाविक शंका येण्याचा संभव आहे, परंतु याचें निराकरण महाराजांकडून असें करण्यांत आलें आहे कीं, अमल न करणारांत हे गुण

जितके स्वाभाविकपणें असतील किंवा विद्येमुळें वाढतील तितके पूर्णपणें स्थित असतात. परंतु ते अमलामुळें वाढलेले असल्यास त्यांचें स्थैर्य असावें तसें नसतें. तसेंच अमलामुळें प्राप्त झालेली शक्तिही दमदार नसते. अमल अनियमितपणें व अतिशयोक्तीनें केल्यास त्यापासून शक्ति क्षीण होते, चातुर्य नाहींसें होतें, उद्योग होत नाहीं, मोठमोठे रोग उत्पन्न होतात, अविचार होतात व शेवटीं प्राणहानि होते. अमलाची एकदां सवय लागली ह्मणजे त्याला स्वाधीन ठेवणें फार कठीण पडतें. जसजसा तो जास्त दिवस वापरावा तसतसा तो आंगवळणीं पडल्यामुळें अमल येत नाहींसा होतो व त्यायोगें जास्त प्रमाण उपयोगांत आणावें लागतें; याप्रमाणें वाढतां वाढतां तो सर्वप्रकारें हानीस कारण होतो. सबब मुळापासूनच त्याची सवय करूं नये हें फार उत्तम व न केल्यापासूनच इह व परलोक साधन होतात. तथापि फक्त चालू जन्मांत ऐहिक सुखें मिळविण्यास ज्या धाडस, ईर्षा, निश्चय, अभिमान वगैरे गुणांची सांप्रतकाळीं अवश्यकता आहे ते गुण माफक कैफ केल्यानेंच विकास पावण्याचा संभव आहे. सुरेवर मांस व इतर कैफावर दूध आणि सर्व कैफांवर तूप व फळफळावळ पथ्यकारक आहे. आतां शरिरांतील स्वच्छतेबद्दल एक दोनच गोष्टी सांगावयाच्या राहिल्या आहेत त्या ह्या कीं मलमूत्राचा ज्याप्रमाणें अवरोध केला असतां अपकार होतो त्याप्रमाणेंच ढेंकर, जांभई, शिंक, खोकला, गुदद्वारें सरणारा वायु वगैरेंचा कधींच अवरोध करूं नये; मात्र मोकळेपणीं त्यांचा प्रयोग होऊं देण्यासारखी वेळ व स्थळ नसल्यास प्रयोग तजविजीनें

होऊं द्यावा. तसेंच शोक करणें ह्मणजे रडणें व फार चिंता करणें यामुळेंही शरिराचें नुकसान होतें आणि आनंदानें फायदा होतो ह्मणून नेहमीं आनंदवृत्तीनें असणें चांगलें.

वस्त्रें—शरीररक्षणाकरतां वरील सर्व प्रकारांशिवाय वस्त्रें ह्मणजे पांघरुणें यांचीही अवश्यकता आहे. पांघरुणें मुख्यत्वेंकरून दोन प्रकारचीं असतात. एक शरीरावर घालण्याचीं व दुसरीं निजल्यावर हांतरण्यापांघरण्याचीं. सर्व प्रकारचीं पांघरुणें स्वच्छ असून फाटकीं नसावीं. फाटल्यास लागलींच शिऊन दुरुस्त करावीं. पांघरुणें ह्मणजे कपडे बहुधा कापसाचे, तागाचे, लोंकरीचे व रेशमाचे असतात. बिनसुधारलेले जंगलांतील लोक जनावरांचीं कातडीं, झाडाच्या साली व पानेंही वापरतात. शीत काळांत लोंकरीचे कपडे वापरणें चांगलें. कारण ते उबदार असून त्यांपासून थंडीचें निवारण होतें. उष्ण काळांत कापसाचे कपडे वापरणें चांगलें. भोजनाचे वेळीं चकचकीत व उबदार वस्त्रें परिधान केलीं असतां विशेष फायदेशीर आहे, कारण त्यामुळें उष्णता व विद्युल्लता शरिराजवळ राहिल्याकारणानें जठराग्नि प्रदीप्त राहून पाचकशक्ति वाढते. लोंकरीचीं व रेशमाचीं वस्त्रें वारंवार धुतलीं असतां लवकर बिघडतात ह्मणून तीं न मळण्याविषयीं विशेष जपावें. वस्त्रें उन्हांत वाळविल्यास लवकर जीर्ण होतात. अनेक प्रकारचीं मौलवान् वस्त्रें वापरणें हें फक्त शोभेकरतां असून त्यांपासून मनाला उल्हास प्राप्त होतो व उल्हासापासून तेज व पुष्टी येते. शीत व उष्णाशिवाय पर्जन्यापासून शरिराचा बचाव होण्यासाठीं मेण व रबर लावून केलेलीं वस्त्रें छत्र्या, चिरलीं वगैरे पदार्थांचा उपयोग करावा लागतो व

कांटे, खडे, तापलेली जमीन व चिखल वगैरेपासून दुःख न व्हावें ह्मणून कातड्याचे, लांकडाचे किंवा लोखंडाचे जोड्यांचा उपयोग करावा लागतो. कातड्याचे जोडे सर्वांत फार सोईवार असे तयार करतां येतात. जोडे पाण्यांतून, बर्फावरून, अथवा उतरत्या जाग्यावरून वगैरे चालण्यासारखे असे अनेक प्रकारचे सोयीवार करणें चांगलें. घरांत व जेवणाचे संबंधांत ठेववेल तितकी स्वच्छता ठेवणें उत्तम सबब बाहेर वापरण्याचे कपडे, जोडे वगैरे घरांत आल्यावर निराळे ठेवणें बरें. उष्ण देशांत, उष्ण काळांत आंग उघडें ठेवल्यास चिंता नाहीं, पण शीत देशांत तसें करूं नये आणि शरिराचे गुह्यभाग तर सर्व ठिकाणीं सदोदित आच्छादिलेले असावे. ते आच्छादित ठेवल्यामुळें पातिव्रत्यरक्षण होतें, संभोग विलासयुक्त व विशेष सौख्ययुक्त होतो, शरिराचा विशोभितपणा नाहींसा होतो, संभोगेच्छा वाढते व मलविसर्जन करण्याची कंटाळवाणी क्रिया आदबशीरपणें ठेवल्याचें श्रेय प्राप्त होतें. पांच वर्षांच्या वयानंतर ते आच्छादित ठेवणेंच चांगलें. उपवर स्त्रीचें वक्षस्थळ गुह्यभागांत गणणें चांगलें, कारण त्याचा रतिसंभोगाशीं बराच संबंध आहे. आंगावर घालावयाचे कपडे जितके हलके असतील तितके बरे. शीत प्रदेशांत चेहेऱ्याशिवाय सर्व आंग झांकण्यासारखे ते असावेत. उष्ण प्रदेशांत तसे नसले तर बरे. कपडे नेहमीं धांवण्यास, आंग हवेंतसें फिरविण्यास, लवकर काढून टाकण्यास अगर अंगावर घालण्यास सुलभ असे असावेत. डोक्यावरील, मस्तकाचा उन्हापासून अथवा कसल्याही प्रहारापासून जितके अधिक बचाव करणारे असतील

तितके चांगले. लढाईच्या वेळचे कपडेही अशाच प्रकारें जितका शरीराचा अधिक बचाव करणारे असतील व आपल्या पक्षाचे लोक त्वरित ओळखले जाण्यासारखे असतील तितके उत्तम. कपडे धुतल्यावर नेहमीं उन्हांत वाळवूं नयेत व उंदरांपासून त्यांचा नाश न होण्याविषयीं जपावें. नेहमीं न वापरण्याचे उंची कपडे कधीं कधीं मोकळ्या हवेवर उघडून ठेवावे व वर्षांतून एक वेळ तरी उन्हांत वाळवावे आणि त्यांस कसर वगैरेकडून नुकसान न व्हावें ह्मणून जपावें. ते ठेवलेल्या ठिकाणीं सुगंधी पदार्थ ठेवावे. रात्रीं निजतांना परिधान करावयाचे कपडे निराळे असावे.

दागिने—हे प्रत्यक्ष शरीर रक्षण करणारे जरी नाहींत तरी त्यांपासून पर्यायानें शरिराचा फायदा असल्यामुळें या विषयास येथें जागा दिली आहे. दागिन्यांमुळें शरीर शोभिवंत दिसतें व त्यामुळें मनाला आनंद होतो. मनाला आनंद होण्यापासून शरिराचा फार फायदा आहे. शिवाय सोनें, चांदी, मोत्यें व रत्नें यांपासून शरिराची कांती वाढणें, रक्तशुद्धि होणें, वात, पित्त, कफ वगैरेचा नाश होणें असे अनेक गुण होतात. स्त्रियांस त्यामुळें प्राप्त झालेल्या सुशोभितपणामुळें पुरुषांचें चित्त आकर्षण्याचा त्यांच्यांत विशेष गुण प्राप्त होतो. दागिन्यांवरून मनुष्याच्या संपत्तीचें मान कळल्यामुळें अनोळखीपणाचे कारणानें दुसऱ्याकडून होणारा अपमान टळतो. परंतु दागिन्यांला चोरीचें भय फार असतें, सबब ते फार सावधगिरीनें वापरले व सांभाळले पाहिजेत. लहान मुलांच्या आंगावर तर ते मुळींच घालूं नयेत व घातलेच तर त्यांस कधींही कोणत्याही

कारणांनीं जरा सुद्धां नजरेआड होऊं देऊं नये. दागिन्यांच्या संबंधांत अगदीं खात्रीच्या अथवा लायक मनुष्यांशिवाय दुसऱ्या कोणावरही कधींच विश्वास ठेऊं नये. दागिने हलके असून अवयवांना इजा न करणारे असे असावे व त्यांची मोडतोड न होण्याविषयीं फार जपावें. बायकांपेक्षां पुरुषांनीं दागिन्यांचा उपयोग फार कमी करावा. गरिबांनीं शोभेकरतां अथवा सुशोभितपणाची हौस फेडण्याकरितां कमी किंमतीच्या धातूचे अथवा नकली दागिने वापरावे, पण नकली दागिने टिकाऊ नसल्यामुळें ते फार काळजीनें सांभळले पाहिजेत. दागिन्यांत पैसे ठेवण्यामुळें एक प्रकारचें नुकसान आहे, कारण त्यांपासून कांहीं उत्पन्न नसून उलट दागिन्यांची धातू झिजत असते, सबब अशी घट सोसण्याचें सामर्थ्य असणारांस व त्यांत ठेवलेला पैसा अन्य उत्पन्नाचे कामीं लावला असतां जें उत्पन्न होण्याचा संभव तें उत्पन्न बुडविण्याचा भार न वाटणारांस आपल्या शक्तीप्रमाणें दागिने करण्यास हरकत नाहीं व करणें हें पुष्कळ अंशीं चांगलें.

घरें व कंपाउंड (आवार)—घरें, वारा, पाऊस, बर्फ, थंडी, गरमी अथवा ऊन, घातक जनावरें, चोर वगैरेपासून रक्षण होईल अशीं असावीं. तें आंतून व बनेल तर बाहेरूनही अगदीं स्वच्छ व सुशोभित ठेवावें. त्यांत मोकळी हवा येऊन बाहेर जाण्याला व उजेड चांगल्या प्रकारें आंत येण्याला दरवाजे व खिडक्या असाव्या. खिडक्या अशा प्रकारच्या असाव्या कीं, पाउसाच्या अथवा बर्फ पडण्याच्या वेळीं त्या लावल्या तरी उजेड व हवा अगदींच बंद होणार नाहीं. घरें

तुफानी वाऱ्यानें किंवा अतिवृष्टीनें पडणार नाहींत अशीं असावीं. घरांचे पाये व जोतीं मजबूद असावीं. दरवाजे डोक्याला न लागतील असे उंच असावे. घरांतील जमिनीला पावसाळ्यांत ओल न येईल अशा प्रकारें घरें बांधलेलीं असावीं. विशेष बंदोबस्ताचीं घरें ह्मणजे उंदीर, घुशी वगैरेपासून त्रास न होणारीं. घराला मजले असल्यास चांगलें. जमिनीपेक्षां मजल्यावर रहाणें व मजले उंच उंच असणें आरोग्यकारक आहे. घराला जितके मजले असतील त्या मानानें घराचें सामान मजबूद असावें. घराच्या सामानाचे सांधे एकांत एक जितके बरोबर बसतील व भिंती, खांब, बहालें वगैरे जितकीं अगदीं नीट समांतर, सारखीं आणि सरळ असतील तितकी घरांना मजबुती विशेष असते. पाणी आंत शिरणार नाहीं अशा ठिकाणीं व अशा उंच जोत्यांचीं घरें, असावीं. घरें, गवत, विटा, लांकडें, धोंडे, लोखंड वगैरे अनेक प्रकारच्या जिनसांचीं व तऱ्हतऱ्हेच्या आकृतीचीं बांधलेलीं असतात. घरांजवळ विहीर अथवा दुसरें कांहीं पाण्याचें साधन अवश्य असावें. घरास सभोंवतीं जरी ओटीसारखी जागा न ठेवली तरी मागें व पुढें ठेवावी. घरांतच स्वयंपाक करण्याची जागा ठेवणें असल्यास बनेल तर निजण्या बसण्याची जागा तिच्या पासून पृथक् असावी. तसेंच देवपूजा अथवा देवाची प्रार्थना किंवा ध्यान करण्याकरतां व कोठीकरतांही निराळ्या जागा असाव्या. घर मोठें असल्यास बसण्याची व निजण्याची जागा ह्या पृथक् असाव्या. एकंदर सर्व जागा फार स्वच्छ ठेवाव्या आणि बसण्या उठण्याच्या, निजण्याच्या वगैरे करवतील तितक्या

सुशोभित कराव्या. जिने चढण्यास सुलभ असे असून त्यांचे बाजूस कठडा असावा. सर्व दारें व खिडक्यांना आंतून कड्या असाव्या व मुख्य दरवाजाला मात्र बाहेरून कुलूप लावण्यासारखी कडी असावी. खिडक्यांना धातूचे गज अथवा जाळ्या लावलेल्या असाव्या, जेणेंकरून त्या उघड्या असल्या तरी आंत कोणी येऊं शकणार नाहीं. सर्व दरवाजे व खिडक्या लावल्या तरी हवा अगदींच बंद होणार नाहीं किंवा धूर कोंडणार नाहीं अशी तजवीज भिंतीला वरील बाजूंस लहान लहान भोंकें ठेवून वगैरे केलेली असावी. भिंतीला खुंट्या, कोनाडीं व फडताळें जरूर तेथें असावीं. घरांत बहुधा प्रत्येक खोलींत मोरी असावी; मोऱ्या धुऊन नेहमीं साफ ठेवाव्या; मोऱ्यांच्या छिद्रांना जाळ्या बसविलेल्या असाव्या, जेणेंकरून पुढील तोटींत कचरा तुंबून पाणी जावयाचा रस्ता बंद होणार नाहीं व सर्पासारखीं जनावरें आणि उंदीर आंत येणार नाहींत. मोऱ्यांचें पाणी जवळील गटारांत अगर त्यामुळें घाण होणार नाहीं अशा ठिकाणीं सोडलेलें असावें. शौचकूप घरापासून पृथक् असावे, त्यांतील विष्ठा दूर नेऊन टाकण्याची व्यवस्था असावी व दाट वस्तीच्या ठिकाणीं त्यांतील पाणी पक्या कुंडींत जमवून दूर नेऊन टाकण्याची व्यवस्था असावी. कुंडीवर झांकण असावें व विष्ठेची जागाही येणाऱ्या जाणारांच्या दृष्टीस न पडेल अशी आच्छादलेली असावी. घाणीचें पाणी जमिनींत मुरल्यापासून जवळील पिण्याच्या पाण्याच्या विहिरींत तें प्रवेश करतें व त्याच्या सुकण्यामुळें हवा रोगकारक होते ह्मणून कोणत्याही प्रकारच्या दुर्गंधीचा निकास मनुष्य-

प्रकृतीस पाण्याच्या व हवेच्या द्वारें बाधक न होईल अशा प्रकारें केलेला असावा. स्नानाची जागा चोहोंकडून बंद अशी असावी व पाणी तुंबून न राहील अशी व्यवस्था असावी. पाणी तुंबून राहिल्यामुळेंही तें नासतें व घाणीसारखा परिणाम करतें. घराच्या सभोंवतीं आवार (कंपाउंड) असून त्यांत फुलझाडें, फळझाडें व मागल्या बाजूला जेथें पाणी सांडण्याचा जास्त संभव अशा ठिकाणीं तुळशीचीं झाडें, असावीं. घराचे आजूबाजूंस गवत वाढूं देऊं नये व केरकचरा राहूं देऊं नये. पाळलेलीं जनावरें बांधण्याची जागा घराजवळ असल्यास ती पृथक् व मागील बाजूंस असावी व ती सर्व प्रकारें साफ ठेवण्याविषयीं फार जपावें. जनावरांस नेहमीं बांधून ठेऊं नये. घरांतील केरकचरा बाहेर टाकतांना तपासून पहात जावा, तो नेहमीं एकाच ठिकाणीं टाकावा व तो जाळून टाकण्यासारखा असल्यास जाळून टाकावा किंवा जमिनींत खळगा करून त्यांत तो व जनावरांची विष्ठा टाकावी आणि खळगा भरत आल्यावर त्यावर माती घालावी ह्मणजे एक वर्षानें झाडांना व शेतांना उपयोगीं पडण्यासारखें बिन खर्चानें खत तयार होतें. वर्षांतून एक वेळ तरी घराची चांगली दुरुस्ती करावी आणि उष्ण प्रदेशांत मातीच्या जमिनी प्रत्येक आठवड्यास सारवाव्या. आवारांत विहीर असल्यास तिचे सभोंवतीं मजबूत दोन हात उंचीचा कठडा किंवा भिंत असावी व तिच्यांत पानें पडतील असें जवळ झाड नसावें. स्नानाचे, वस्त्रें धुण्याचे व इतर वापराचे पाण्यानें झाडें होतील अशी व्यवस्था असावी.

घरांतील सामान—घरांत नेहमीं धान्य, पाणी, दि-

ल्याचें तेल, लांकडें किंवा विस्तव पेटविण्याचा दुसरा कांहीं पदार्थ आणि त्वरित उपयोगाकरतां लागणारीं औषधें नेहमीं शिल्लक असावीं व हे पदार्थ खराब न होतील अशा रीतीनें ठेवण्याची व्यवस्था असावी. लांकडांत विषारी वगैरे जनावरें रहाण्याचा संभव असतो सबब तीं दूर ठेवण्याची तजवीज असावी. हिंसक जनावरांपासून वगैरे बचाव होण्यासाठीं जंगलाजवळील गांवांतील लोकांजवळ हत्यारें असणें अवश्य आहे व स्वसंरक्षणाकरतां इतर ठिकाणच्या लोकांनींही हत्यारें बाळगिणें चांगलें. पण हत्यारें भलत्याचे हातीं लागतील अशीं ठेवूं नयेत व तीं नेहमीं साफ ठेवित जावीं. घरांतील सर्व पदार्थ नेहमीं जरूर त्याप्रमाणें घांसून, पुसून व धुऊन साफ ठेवावे. कागद, बुकें वगैरे नेहमीं सुरक्षित ठिकाणीं ठेवलेलीं असून स्वच्छ ठेवावीं व तीं मधून मधून काढून साफ करून पुनः ठेवित जावीं. मजल्यावर मनुष्यें रहात असल्यास जिन्याजवळ लौकर पेटणाऱ्या पदार्थांचा सांठा कधींही करूं नये. खाण्यापिण्याचे व निजण्याबसण्यासंबंधी सर्व पदार्थ ज्यांच्या त्यांच्या ऐपतीप्रमाणें ज्यांनीं त्यांनीं घरांत ठेवावे. कोणताही पदार्थ दुसऱ्याकडे मागण्याचा प्रसंग सहसा येऊं नये. कांचेचे पदार्थ फार संभाळावे व असा एखादा पदार्थ फुटल्यास त्याचे तुकडे काळजीपूर्वक वेंचून कोणाचा पाय न पडेल अशा ठिकाणीं टाकावे; सूक्ष्म तुकडे शेणाच्या किंवा ओल्या मातीच्या गोळ्यानें टिपून घ्यावे. नुकसान करणारे पदार्थ मुलांच्या हातीं न लागतील असे ठेवावे व कोणत्याही कारणानें ते त्यांच्या हातीं देऊं नयेत. मौल्यवान् पदार्थ नेहमीं आगीपासून व

चोरापासून निर्भय अशा ठिकाणीं ठेवावे आणि पुऱ्या खात्री-शिवाय त्यांसंबंधी कोणावरही विश्वास ठेऊं नये. अशा संबंधाच्या किल्ल्या नेहमीं जवळ बाळगाव्या. घरांत सर्व रात्रभर एक तरी दिवा असावा व मुलें निजण्याच्या ठिकाणीं तर तो अवश्य असलाच पाहिजे. दिव्याच्या वरच्या बाजूस कपडे ठेऊं नयेत. केरोसीन (घासलेट) तेल जळत असतां विझविण्याकरतां त्यावर पाणी ओतूं नये, राख किंवा माती टाकावी. घरांत कुत्रीं मांजरें वगैरे पाळलेलीं असल्यास त्यांस शिस्तवारपणें वागवावें व त्यांची खाण्यापिण्याची तजवीज योग्य प्रकारची असावी. अटकेंत ठेवलेल्या प्राण्यांच्या (जसे पोपट, मैना वगैरे) खाण्यापिण्याविषयीं तर चांगलाच बंदोबस्त केलेला असावा व स्वतः घरधन्यांनीं त्यांचेकडे नजर असों द्यावी; कारण ज्यांच्यावर तें काम सोंपविलेलें असतें त्यांची विसरपणामुळें वगैरे चूक झाल्यास त्या प्राण्यांस मागण्यास वाचा नसते व अटकेंत असल्यामुळें त्यांस स्वतःही कांहीं करतां येत नाहीं. त्यांचे पिंजरे स्वच्छ असून उंदीर, मांजरें वगैरेचा इलाज न चालेल अशा उंच ठिकाणीं असावे व त्यांत त्यांचे खाण्याचे पदार्थ आणि पाणी नेहमीं शिल्लक असलेलें दिसावें. घर ह्मणजे मनुष्योपयोगी सर्व पदार्थांचें संग्रहालय असें समजावें. अपकार करणारा नसल्यास कोणताही पदार्थ व्यर्थ समजून टाकूं नये, कारण प्रसंगीं कोणत्या पदार्थाची जरूर लागेल त्याचा नेम नाहीं. घरांतील सर्व पदार्थ नेहमीं व्यवस्थितपणें ठेवलेले असावे. पहाणारास घर नेहमीं स्वच्छ, सुशोभित, व्यवस्थित व आंत रहाणारांस सोयीवर व सुखकारक असें दिसावें.

उद्योग—ह्मणजे इंद्रियें व अवयवांचा उपयोग करणें, जसें पायानें चालणें, हातानें कामें करणें, डोळ्यानें पहाणें, कानानें ऐकणें, तोंडानें खाणें, पिणें व बोलणें, नाकानें वास घेणें व श्वासोच्छ्वास करणें वगैरे. खाणें, पिणें वगैरे-प्रमाणें उद्योग करणें हें सर्व शरीररक्षणाकरतां अवश्यक आहे. महाराज याविषयीं परमेश्वरस्फूर्तीचे शब्द लिहितात ते असे:—"**उद्योग न करतां महापाप ॥ इंद्रियावयवोपयोग, न करितां मम कृत्य भंग देख ॥ उद्योगाविणें कदापीही सुख ॥ प्राप्त नोहे प्राणिमात्रां**" ॥ यावरून उद्योग हा जगांत, प्राण्याची धारणा होण्यास अत्यावश्यक आहे व तो न केल्यास महापातक होतें. ह्मणजे ज्यापासून सुख प्राप्त व्हावयाचें तें सर्व सुकृत भस्म होऊन जातें. ह्मणून त्याशिवाय कदापिही सुख होत नाहीं. उद्योग जसा चांगला अगर वाईट करावा तसें चांगलें किंवा वाईट फळ मिळतें, पण तो मुळींच न केल्यास सर्व क्षय एकदम होतो. कारण त्यापासून परमेश्वराच्या ह्मणजे उत्पन्नकर्त्याच्या कृत्याचा ह्मणजे इच्छेचा भंग होतो, उद्योग न करावा असा उत्पन्नकर्त्याचा हेतु असता तर अवयव व इंद्रियें केलीं नसतीं. उद्योग जितका अधिक करावा तितकें फळ विशेष मिळतें. उद्योगामुळेंच अन्न पचतें, भूक लागते व शरिराची वृद्धि व रक्षण होतें आणि अनेक प्रकारचें इहपरलौकिक सुख मिळवितां येतें. उद्योगामुळें शरिरांत जरूर ती उष्णता उत्पन्न होते. व्यायाम अथवा दुसरे शारीरिक श्रम हे शरिराचा प्रत्यक्ष व विशेष फायदा करतात, त्यामुळें शक्ति व आरोग्य वाढतें. चालणें, झाडावर चढणें, पोहणें, नेम मारणें, घोड्यावर बसणें

व अनेक प्रकारचे शारीरिक श्रमाचे व कसरतीचे खेळ खेळणें यांपासून शक्ति वाढते इतकेंच नाहीं पण प्रसंगीं त्यामुळें शरिराचें रक्षण करतां येतें. शरिराचें रक्षण करणें हें मुख्य कर्त्तव्य आहे, कारण तें आहे तरच कांहीं आहे व होईल. परलोकसाधन किंवा मोक्षप्राप्तिही त्यामुळेंच मिळवितां येते, ह्मणून शरीररक्षण सर्व कर्तव्यांत श्रेष्ठ असून त्याकरतां उद्योग अत्यावश्यक आहे; मात्र तो सुनीतिपर असावा. शरिराच्या विशेष श्रमाचीं किंवा कसरतीचीं दुसरीं कांहीं कृत्यें करण्यास नेहमीं न बनलें तरी रोज कांहीं तरी चालण्याचा व्यायाम करित जावा. उद्योग हें सर्वांचें कारण आहे, तो प्राक्तनाचे अवयव व इंद्रियें आहे, त्याच्या दृढावलंबनानें परमेश्वर संतुष्ट होतो व इच्छित फल देतो, ह्मणूनच अपायाला उपाय करण्यामुळें गुण येतो. सबब उद्योग सर्व संबंधांत केल्याविना राहूं नये. शारीरिक उद्योगाहून मानसिक ह्मणजे विचाराचा किंवा ज्ञानाचा उद्योग श्रेष्ठ होय, पहिल्यास दुसऱ्याचा मिलाफ असल्याशिवाय चांगलें सुख, कीर्ति व मोक्ष मिळवितां येत नाहींत.

गांव व शहरें:—यांचाही शरीररक्षणाशीं प्रत्यक्षत्वानें बराच संबंध आहे. ज्या गांवांत पुष्कळ घरें व मनुष्यवस्ती असते त्याला शहर असें ह्मणतात. व जें शहर समुद्राचे कांठीं असून गलबतें रहाण्यास किंवा जाण्यायेण्यास सोईवार असतें त्यास बंदर असें ह्मणतात. गांवें व शहरें जितकीं स्वच्छ व मनुष्यास सोईवार असतील तितकीं शरीररक्षणास अधिक चांगलीं. गांवांत वस्ती पातळ व थोडी असल्यामुळें त्याची स्वच्छता ठेवण्यास फारसें कठिण नसतें,

पण शहराची वस्ती जसजशी मोठी असेल तशी त्याची स्वच्छता ठेवण्याची विशेष खटपट व अवश्यकता असते. प्रत्येक गांवांत पाण्याची विपुलता असून वैद्य, सुतार, लव्हार, शिंपी, न्हावी, धोबी, कुंभार, चांभार, आणि शाळा, दुकान व देऊळ अथवा दुसरी सार्वजनिक जागा इतकें अवश्य असावें. तसेंच लोकांनीं नेमलेले पंच व पंचांनीं आपणांपैकीं नेमलेला एक त्यांचा मुख्य असे असावे आणि या पंचांनीं गांवांतील लोकांच्या फायद्यासंबंधी व नुकसानासंबंधी विचार करून लोकांच्या मदतीनें जरूर त्या आपल्या गांवाच्या फायद्याच्या गोष्टी कराव्या, गांवांत स्वच्छता ठेवावी व किरकोळ तंटेबखेड्यांचा निकाल करावा. अशा प्रकारच्या सार्वजनिक गोष्टी पंचांनीं बहुमतांनीं व ज्ञात्यभिमान, धर्माभिमान, खासगी वैमनस्यें व फायदे वगैरे एका बाजूस ठेवून निःपक्षपातानें कराव्या. गांवांतील सर्व लोकांनीं परस्परांशीं ऐक्यानें वागावें. गांवांतील कचऱ्याचा व घाणीचा उपयोग शेतांकरतां खत तयार करण्याकडे करावा. गांवांत व बाहेर नवीन झाडांची लागवड नेहमीं करीत असावें. दुष्काळाचे वेळीं उपयोग होण्याकरतां गांवासाठीं धान्याचा, पाण्याचा, व ढोरांच्या खाण्याचा सांठा केलेला असावा. शहरांतील घाणीचा चांगला निकास होण्याची तजवीज असावी. विष्ठा व घाणीचें पाणी शहराबाहेर नेतांना उघडें नेऊं नये व त्यापासून हवा किंवा पाणी बिघडून मनुष्यांस इजा न होईल इतक्या दूर अंतरावर त्यांचा निकास व्हावा अशी तजवीज असावी. शहरांतील रस्ते रुंद व स्वच्छ असावेत व पावसाचें पाणी आणि वापराचें पाणी वाहून जाण्याकरतां त्यांचे दोनही

बाजूंस गटारें असावीं. विशेष रहदारीच्या ठिकाणीं मनुष्यांस चालण्याकरतां व गाड्या आणि जनावरें चालण्याकरतां असे रस्त्याचे निराळे भाग केलेले असावे. रस्त्यांचे बाजूनें घरांस इजा न होईल अशा प्रकारें झाडें लावलेलीं असावीं. रस्ते मध्यें कांहींसे उंच असून पाउसाचें पाणी जाण्याकरतां दोनही बाजूंस उतरते असावे. रस्ते फरसबंदी नसल्यास गाड्या, घोडे धांवण्यास चांगले. रस्त्यांवर पाणी शिंपल्यास ते तापत नाहींत व धूळ उडत नाहीं. रस्त्यावर चिखल राहूं देणें चांगलें नाहीं. जितका शहराचा विस्तीर्णपणा व व्यापार-उदिमाची समृद्धि जास्त असेल तितकी जास्त जास्त त्वरेच्या वहनांची आणि मनुष्यांच्या परस्पर दळणवळणाच्या सोईची अवश्यकता असते. अशा प्रकारच्या अवश्यकतेचीं साधनें ह्मणजे टपालाशिवाय तारायंत्र, टेलिफोन, ट्रामवे, रेलवे, विमानें, शिकविलेलीं जनावरें, निशाणें इ०. पागोळ्यांचें पाणी पडून रस्ता खराब होऊं नये आणि त्यांपासून व कौल वगैरे पडण्यापासून रस्त्यावरून चालणारांस त्रास व इजा होऊं नये ह्मणून पागोळ्यांच्या पुढें पन्हळ लावलेले असावे. शहरांत भाजीपाला व मांस आणि मत्स्य वगैरे विकण्याचे बाजार निरनिराळे असावे व ते स्वच्छ व सोईवार इमारतींत असून तेथें विकले जाणारे पदार्थ नासके व अपकारक आहेत किंवा कसें त्यांची तपासणी होण्याची व्यवस्था असावी. अंधारे रात्रीं रस्त्यावर उजेड रहाण्याकरतां फाणसांत दिवे लावण्याची व्यवस्था असावी. रस्त्यांवर कचरा, खड्डे, कांटे अथवा कोणत्याही प्रकारची अडचण राहूं देऊं नये. शहरांतील लोकांस स्वच्छ व विपुल पाणी पिण्यास मिळण्याची

व्यवस्था असावी व कपडे धुण्याकरतां आणि वापराकरतां-ही विपुळ पाणी असावें. शहरांत ठिकठिकाणीं मनुष्यांस स्वच्छ हवेवर फिरण्यास सांपडावें व शहरांतील हवा स्वच्छ व्हावी ह्मणून बाग असावे. तसेंच अनेक प्रकारची माहिती होण्यासाठीं पदार्थ आणि प्राणिसंग्रहस्थानें असावीं. अनेक प्रकारचे मनुष्योपयोगी पदार्थ तयार करण्याचे कारखाने व अनेक प्रकारच्या विद्या व कलाकौशल्यें शिकविण्याच्या शाळा असाव्या. प्रवासी लोकांस उतरण्याकरतां व त्यांस भोजन वगैरे मिळण्याकरतां चांगल्या सोईवार जागा असाव्या. देवांच्या उपासनेचीं स्थानें असावीं. गरिबांस औषध, अन्न व वस्त्रें मिळण्याचीं स्थानें असावीं. आंधळे, पांगळे, लुले, लंगडे वगैरे जे उद्योग करण्यास असमर्थ अशांचें संरक्षण होण्याच्या जागा असाव्या व तेथें त्यांचेकडून होण्यासारखे हलके उद्योग करून घ्यावे. देवस्थानांतून खऱ्या साधुसंतांस व ती जागा स्वच्छ ठेवणारांस रहाण्याची व उपजी-विकेची तजवीज असावी. शहराच्या भागांस व रस्त्यांस नांवें दिलेलीं असावीं व अपराध्यांच्या बंदोबस्ताकरतां ठिक-ठिकाणीं चौकी व पहारे असावे. दुर्गंधीचें काम करणाऱ्या लोकांची वस्ती इतर वस्तीपासून पृथक् व दूर असावी, त्याप्रमाणेंच दुर्गंधीचे कारखानेही दूर असावे. घोडे फिर-विण्याकरतां अथवा कांहीं विशेष कारणासाठीं शहराबाहेर एक चांगली मैदानाची जागा असावी. शहरांत सर्वप्रकारच्या मालाचा नेहमीं सांठा असावा. दुकानांतील माल सहज दिसेल असा चांगल्या व्यवस्थेनें मांडलेला असावा, व निरनिराळ्या प्रतीचा निरनिराळा न बिघडेल अशा प्रकारें ठेवलेला असावा.

दुकानें सुशोभित दिसतील अशीं असावीं व त्यांत गिऱ्हाइकांस जरूर त्याप्रमाणें बसण्यास अथवा उभें रहाण्यास जागा असाव्या. शहरांत पुस्तकालयें, छापखाने, वर्तमानपत्रें, सभा भरण्याकरतां सार्वजनिक स्थानें, पोंहण्याची व तालमीची आणि इतर प्रकारचे शारीरिक कसरत शिकण्याच्या जागा, वेधशाळा व माल ठेवण्याच्या वखारी जरूर असाव्या. ज्वालाग्राही पदार्थांच्या वखारी मात्र वस्तीपासून दूर असून तेथें अग्नीचा कांहीं संबंध नसण्याविषयीं फार जपावें. अशा ठिकाणीं तंबाखू ओढूं देणें चांगलें नाहीं. कित्येक ज्वालाग्राही पदार्थांत उबाऱ्यामुळें वगैरे आपल्या आपण अग्नि उत्पन्न होतो, सबब तो तसा न होऊं देण्याच्या तजविजी असाव्या, व लागलेली आग विझविण्याकरतां ठिकठिकाणीं बंब वगैरे ठेवलेले असावे. मोठमोठ्या रस्त्यांच्या संधीवर प्रसिद्ध पुरुषांचे पुतळे व रस्त्यांच्या नांवाच्या पाट्या लावलेल्या असाव्या, आणि सर्वांस वेळ समजण्याकरतां उंच ठिकाणीं जेथें तेथें मोठीं घड्याळें, व ठिकठिकाणीं पिण्याच्या पाण्याचीं व विश्रांती घेण्याचीं ठिकाणें असावीं. बंदराच्या शहरांत पाण्याकडील बाजूंस गलबतांतून उतारू व माल उतरण्याकरतां व चढण्याकरतां सोईवार धक्के बांधलेले असावे. माल ठेवण्याकरतां मोठमोठ्या वखारी असाव्या व बंदराच्या आसपास पाण्यांत खडक वगैरे असल्यास ते समजण्याकरतां पाण्याच्या वर दिसतील अशा खुणा कराव्या. तसेंच बुडत असतां मनुष्यांचा व मालाचा बचाव करण्याची आणि चोरी, लुटारूपणा, दंगा वगैरेसंबंधीं बंदोबस्त रहाण्याची तजवीज असावी. या सर्व गोष्टीं-

पासून काय फायदे आहेत ते प्रस्तुत काळीं बहुतेकांस ठाऊक असल्यामुळें अथवा विचारी मनुष्यास मननानें ते कळून येण्यासारखे असल्यामुळें या लहानशा पुस्तकांत विस्तारभयास्तव ते सांगणें प्रशस्त दिसलें नाहीं.

संतति—हिचाही शरीररक्षणाशीं पुष्कळ संबंध आहे. वृद्धापकाळीं संततीपासून शरीराचें रक्षण होण्याचा जितका संबंध असतो तितका अन्य कशापासूनही नसतो. मात्र ती संतति योग्य प्रकारची असली पाहिजे. मुलीपेक्षां मुलाचा उपयोग जरी जास्त होतो तरी त्या वेळीं उपयोगीं पडणाऱ्या इतर सर्व पदार्थांहून मुलगी जास्त उपयोगी पडण्याचा संभव असतो. संतति दोन प्रकारची असते. प्रत्यक्ष आणि परोक्ष. प्रत्यक्ष ह्मणजे आपल्या बिजापासून उत्पन्न झालेला मुलगा अथवा मुलगी; व परोक्ष ह्मणजे आपला दत्तक घेतलेला मुलगा अथवा मुलगी, आपल्या मुलाचीं अथवा मुलीचीं, भावाचीं अथवा बहिणीचीं, सवतीचीं, चुलत्याचीं किंवा मामाचीं, आतेचीं किंवा मावशीचीं मुलें. यांहून दूरच्या संबंधाच्या मुलांचा आपल्या संततित्वाशीं संबंध नाहीं असें समजावें. संततीचें सांगोपन लहानपणीं कोणत्या प्रकारें करावें तें पूर्वी "मुलाचें संगोपन" या सदराखालीं दिलेंच आहे. मुख्यत्वेंकरून संततीच्या शरीरप्रकृतीचें रक्षण करणें, त्यांस विद्या शिकविण्याची तजवीज करणें व त्यांस चांगलें आणि सभ्यपणाचें वळण लावणें हें त्यांच्या पालनकर्त्यांचें मुख्य काम आहे. आणि आपल्या पालनकर्त्यांस दुःखाचे व संकटाचे वेळीं मदत करून त्यांचा वृद्धापकाळीं चांगल्या प्रकारें सांभाळ करणें हें संततीचें मुख्य कर्तव्य आहे. सर्वांत

आईचे उपकार मुलांवर फार असतात. कित्येक आयांपासून त्यांच्या अज्ञान स्वभावामुळें मुलांस मोठेपणीं कांहीं संबंधांत त्रास होण्याचा संभव असतो, तथापि शहाण्या मुलांनीं त्यांस उपदेश करून व त्यांच्या तशा स्वभावामुळें होत असलेलें किंवा होणारें नुकसान त्यांस शांतपणें समजाऊन देऊन, त्यांस दुःख न देतां त्रास चुकविण्याचा इलाज करावा. मुलीचें आठ वर्षांचें व मुलाचें बारा वर्षांचें वय होण्यापूर्वी विवाह करूं नये. या संबंधानें स्वामीमहाराज ह्मणतातः—**स्त्रीपुरुषांचा विवाह पाहे ॥ त्यांचे मताविना करूं नये ॥ पुरुष वय स्त्रीहुनी अधिक होय ॥ तरीच जोडा साजिरा ॥–निदान आठ आणि बारा वरुषाचें ॥ वय अनुक्रमें स्त्रीपुरुषांचें ॥ झाल्याविना विवाहा साचे ॥ नव्हतीं योग्य तीं ॥–स्त्रीहुनी पुरुषाचें वय ॥ निदान चार वरुषें अधिक होय ॥ परी वीस वर्षांहुनी अधिक न माय । अन्यथा दुःखप्रद ॥** विचार करून पहातां हें स्वामींचें लिहिणें फार योग्य आहे. अगदीं लहानपणीं लग्नें झाल्यापासून व वृद्धांनीं लहान मुलीजवळ विवाह केल्यापासून जीं उभयतांस अनेक प्रकारचीं दुःखें होतात तीं सर्व प्रसिद्धच आहेत. वर जी वयाची यत्ता सांगितली ती उष्ण प्रदेशांतील आहे, सीतप्रदेशांत मुलीचें १२ व मुलाचें १६ वर्षांचें वय होई तोंपर्यंत तीं विवाहास योग्य होत नाहींत. मुलीची नवऱ्याविषयीं तिच्या पालकांनीं पसंती ध्यावी हें योग्य जरी आहे तरी मुलींनीं स्वतः नवरा शोधणें व त्या फार उपवर होणें हें प्रशस्त नाहीं. ऋतुप्राप्तीपूर्वी मुलीचें लग्न झालेंच पाहिजे आणि तरच व्यभिचाराचा प्रतिबंध चांगल्या प्रकारें

होऊन एकत्र रहाण्याची चाल असणाऱ्या लोकांच्या कुटुंबांत तिला रहाण्याची जरूर ती सवय लागून चांगलें वळण लागतें. विद्या, ज्ञान, रूप यांशिवाय वधूवरांचा स्वभाव कसा आहे हें पहाणेंही अवश्य आहे. जिचा आपल्या नवऱ्याशीं मुळींच समागम झाला नसतां नवरा मेला असेल तिचा पुनर्विवाह होणें सांप्रतकाळीं चांगलें. चांगल्या ज्योतिषास जन्मवेळेवरून व सामुद्रिक लक्षणांवरून प्राक्तनाचे योग वगैरे बरेच समजतात, तसे समजून घेण्याचें साधन असल्यास लग्न करण्यापूर्वीं मुलाविषयीं व मुलीविषयीं सर्व तपास करावा. एकंदरीनें उभयतांचें सर्व प्रकारें चांगलें जमून सुखप्राप्ति होईल व तीं वृद्धांच्या उपयोगीं पडून सत्कार्यें करतील अशी योजना असावी. केवळ द्रव्याकडेसच लक्ष्य देऊन विवाह होऊं नयेत. व्यभिचारामुळें संतती दुर्गुणी व पालकांस उपयोगीं न पडणारी अशी होते, इतकेंच नाहीं पण व्यभिचारीपणामुळें दंपत्याच्या ऐक्यामुळें व प्रेमामुळें होणाऱ्या अनेक सौख्योत्पादक गोष्टी नाहींशा होतात. पुरुषाहून स्त्रीच्या व्यभिचारामुळें तर अतोनात वाईट परिणाम होतात. एकत्र रहाण्याचा रिवाज असणाऱ्या कुटुंबामुळें व्यभिचाराचा प्रतिबंध होतो, स्त्रियांत मर्यादशीलपणा रहातो व त्यांना आत्मसंयमन करण्याची सवय लागते. कुटुंबांत एकत्र रहाणाऱ्या मनुष्यांनीं परस्परांशीं प्रीतीनें, एकमतानें व वडील मनुष्यांस योग्य मान देऊन वागलें पाहिजे. इतर मनुष्यें निराळीं राहिल्यास चिंता नाहीं, पण ज्यांचा हक्क पालनकर्त्याच्या जिंदगीवर पोंचत असेल त्यांनीं जिंदगी कोणत्याही प्रकारची कितीही असो, आपल्या पा-

लनकर्त्यांजवळ राहून त्यांस योग्य प्रकारें मदत केली पाहिजे व सांभाळलें पाहिजे. पालक असमर्थ होतील तेव्हां मुलांनीं संसाराचा भार आपल्या आंगावर घ्यावा व तोंपर्यंत आपल्या पालकांच्या आज्ञेंत वागावें. मुलगा कारभार करूं लागल्यावर वृद्धांनीं त्यासंबंधी कांहीं पाहूं नये, विचारल्यास मात्र सल्लामसलत द्यावी व आपला काळ देवाच्या भक्तींत आणि सदुपदेशांत घालवावा. कारभाऱ्याचें अथवा कुटुंबाच्या मुख्याचें सर्वांनीं ऐकावें व कारभाऱ्यांनीं सर्वांस सारख्या ममतेनें व योग्य मानानें वागवावें. जो जिंदगी मिळवील त्यानें आपल्या मागें तिची व्यवस्था कशी व्हावयाची किंवा ती कोणास किती द्यावयाची तें ठरवून ठेवावें, ठरविलेलें नसल्यास तिचा मालक जो मुख्य वारस असेल तोच व्हावा. दुसरे पुष्कळ वारस असले तरी हिस्से करूं नयेत. वडिलोपार्जित सर्व जिंदगीचा मालकही मुख्य वारसच व्हावा. हिस्से पाडण्यापासून देशांत श्रीमंतांची संख्या कमी होते व त्यामुळें सार्वजनिक मोठमोठीं कामें व्हावीं तशीं होत नाहींत. मुख्य वारस कारभार करण्यास नालायक असल्यास त्याचे वतीनें इतरानें कारभार करावा. कारभाऱ्यानें कुटुंबांतील समजदार मनुष्यांचीं मतें कारभारांत घ्यावीं. कुटुंबांतील इतर मनुष्यांस उपजीविकेचें दुसरें साधन नसेल व त्या संबंधांत त्यांचा निरुपाय असेल तोंपर्यंत त्यांस मुख्यानें कुटुंबांत राहूं देऊन त्यांचें संगोपन करावें. ज्यांस चरितार्थाचें अन्य साधन प्राप्त झालें असेल त्यांनीं पृथक् राहून आपला संसार निराळा करावा. उष्णदेशांत अकरा वर्षांच्या वयापुढें मुलीस विद्या शिकण्याकरतां शाळेंत

पाठवूं नये आणि शीत देशांत पंधरा वर्षांपुढें पाठवूं नये व त्यांस विद्या शिकविणें ती शुद्ध लिहिणें व वाचणें, हिशेब, जरूर तितकी वैद्यकी, पाकज्ञान, नीति व शिवणकाम. ज्या मुलींच्या संबंधानें त्यांस नीति चांगली समजली असून त्यांची वागणूक न बिघडण्याविषयीं खात्री असेल त्या मुलींस वैद्यकी, नीति वगैरेसंबंधी जास्त अभ्यास करण्याकरतां ज्या शाळेंत स्त्रियाच शिक्षक आहेत व जेथें अनीतीचा प्रचार नाहीं अशी खात्री आहे अशा शाळेंत जाऊं द्याव्या किंवा साधन असल्यास घरींच अभ्यास करवावा. स्त्रियांनीं पुरुषाप्रमाणें आपल्यास योग्य असा उद्योग नेहमीं करावा व व्यावहारिक आणि पारलौकिक ज्ञान वाढवित असावें. परमेश्वरभक्तीच्या संबंधानेंही त्यांनीं पुरुषाप्रमाणें तत्पर रहाणें चांगलें.

प्रकरण २–वागणूक.

धनी व चाकर—धनी या शब्दांत राजा, सरकारी व इतर कामांवरील अधिकारी लोक यांचा आणि नोकर या शब्दांत खानगी व सरकारी आणि इतर कामांवरील सर्व लोकांचा समावेश होतो अशा समजानें हा लेख लिहिला आहे. धन्यानें अथवा अधिकाऱ्यानें आपल्या किंवा आपल्या हातांखालील नोकरांस नेहमीं मायाळूपणानें वागविलें पाहिजे. त्यांना कामासंबंधी हुकूम देतांना चांगलें समजाऊन दिले पाहिजेत, ते न समजल्यामुळें पुनः विचारूं लागल्यास सांगितले पाहिजेत व सांगितल्याप्रमाणें कामें झालीं किंवा नाहींत तें पाहिलें पाहिजे. एखादें काम नोकरांनीं मुळींच न

केल्यास अथवा बरोबर न केल्यास त्यांचे हातून तसें जाणून बुजून झालें किंवा चुकून झालें यासंबंधी पहिल्यानें चांगला विचार करून मग अपराधाप्रमाणें शासन करावें. शासन करणें तें शिव्या देणें किंवा मारणें अशा प्रकारचें करूं नये; दंड करणें, पगार कमी करणें किंवा नोकरीवरून काढून टाकणें अशा प्रकारचें करावें. कारण मारणें किंवा शिव्या देणें यामुळें कदाचित् एखाद्या मनुष्याचें मन चिरडीस जाऊन त्यामुळें कधीं कधीं वाईट परिणाम होण्याचा संभव असतो. प्रत्येकाचे हातून चूक होण्याचा संभव असतोच ह्मणून जाणून बुजून चुकी झाली नसल्यास रागावूं नये; निष्काळजीपणामुळें चूक झाली असल्यास पहिल्या खेपेस ताकीद द्यावी. चाकरांना नेहमीं खूष ठेवून काम करून घ्यावें ह्मणजे काम खुषीनें चांगलें व जास्त होतें; तथापि त्यांचे मनांत जरूर तितकी भीति व काळजी राहील असें करावें. हलक्या प्रतीच्या नोकरापेक्षां जसजसा नोकर उंच प्रतीचा असेल तसतसें त्याला जास्त सभ्यपणानें वागविलें असतां चांगलें. चाकराची जरूर नसल्यास त्यास काढण्यापूर्वी कळवून दुसरी नोकरी पहाण्यास त्याला अवधि व मदत द्यावी. फार दिवस इमानानें नोकरी केलेल्या नोकरास योग्यतेप्रमाणें बक्षीस अथवा पेनशन द्यावें व नोकरीच्या कामांत मरणाराचे कुटुंबासही मदत करावी. मोठाले पराक्रम करून स्वामिकार्यीं अथवा परोपकारीं देह खर्चीं घालणारांचे पुतळे करून प्रसिद्ध ठिकाणीं बसवावे, जेणेंकरून त्यांची कीर्ति राहून सर्वांस तो सद्गुण व योग्यता संपादण्याची उत्सुकता होते. चांगलें काम करणारांस बहडती द्यावी.

पोक्त, अनुभवी व सद्गुणी मनुष्याशिवाय नुसत्या विद्वानावर मोठ्या जोखमाचें काम सोंपवूं नये. चाकर आपल्याहून वरचढ होईल अशीं त्याचे हातीं कारभाराचीं सूत्रें कधींच देऊं नयेत. अयोग्य वागणुकीच्या चाकरास काढून टाकावें, कारभाराची सर्व स्थिति आपणास पूर्णपणें कळेल अशी व्यवस्था असावी व कळल्याप्रमाणें ती तशी आहे किंवा नाहीं त्याचा अनुभव स्वतः पहात जावा. चाकरांजवळ फार मिसळून वागूं नये, फार सलगी ठेवूं नये व सत्यपणानें वागावें. त्यांना योग्य प्रकारें विश्रांती मिळूं द्यावी आणि त्यांच्या शरिराची, स्वच्छतेची व खाण्यापिण्याची काळजी घ्यावी. एकानें दुसऱ्याची आपणाजवळ चहाडी केल्यास खरेपणाविषयीं खात्री करून घेतल्याशिवाय कांहीं करूं नये. चाकरांच्या वागणुकीवर नजर ठेवावी, त्यांच्या चांगल्या कपड्यांविषयीं व दागिन्यांविषयीं ते अनीतीनें मिळविल्याचा संशय नसल्यास विषाद मानूं नये. चाकरांच्या धर्माविषयीं व त्यांच्या घरांतील स्त्रियांवर वाईट नजर ठेऊं नये. कोणत्याही बाबतींत नोकरावर विश्वास ठेवण्यापूर्वीं त्याच्या लायकीविषयीं विचार करावा. नवीन नोकर ठेवावयाचा असल्यास त्याची लायकी पहिल्यानें चांगली पहावी. चाकरांनीं नेहमीं धन्याच्या हुकुमाप्रमाणें व वक्तशीर आणि काळजीपूर्वक काम करावें. धन्याच्या नफानुकसानाविषयीं इमानानें नेहमीं काळजी ठेवावी. कामाविषयीं चुकवाचुकव करूं नये. कोणत्याही मादक पदार्थाचा फाजील व नोकरीच्या वेळांत उपयोग करूं नये. कमाईंत गुजारा करावा व विश्वासानें वागावें. इमानानें, स्वच्छपणानें नियमितपणानें व खरेपणानें वागावें. कांहीं चूक झाल्यास

ती छपविण्याकरितां खोटें बोलूं नये. स्वामिकार्यांत व परोपकारांत मरण आल्यास सद्गती मिळते हें पक्कें समजावें. धन्याचे घरांतील स्त्रियांकडे व द्रव्याकडे पापदृष्टी ठेवूं नये, आणि त्याचा धर्म निराळा असल्यास त्याविषयीं तिरस्कार दाखवूं नये. नोकरी सोडणें झाल्यास दुसरा नोकर पहाण्यास फुरसत राहील असें पूर्वीं कळवावें व सोडण्यापूर्वीं नोकरी चांगल्या प्रकारें केल्याविषयीं दाखला घ्यावा आणि असे मिळविलेले दाखले फार जपून सांभाळावे. नोकरींत चूक न होण्याविषयीं फार जपावें. धन्याच्या मर्जीप्रमाणें त्याचा स्वभाव ओळखून व त्यास खूष ठेवून वागावें. आपलें व त्याचें जमत नसल्यास किंवा त्याचे मनोधर्म आपल्याविषयीं चांगले नसल्यास नोकरी सोडावी, परंतु तक्रार करूं नये; तक्रार झाल्यावर मग नोकरी करणें चांगलें नाहीं. धन्याजवळ उद्धट भाषा बोलूं नये, फार सलगीनें वागूं अथवा बोलूं नये व त्यास नेहमीं योग्य मान द्यावा. तो उभा असतां आपण निजून किंवा बसून राहूं नये, बसला असतां उंच ठिकाणीं बसूं नये अथवा निजून राहूं नये. त्याला पहिल्यानें पाहिलें ह्मणजे रोज रीतीप्रमाणें नमस्कार अथवा सलाम करावा. तो पायीं असतां आपण वहनावर आरूढलेलें असूं नये. त्याच्या बरोबर किंवा पुढें विशेष कारणावांचून चालूं नये, मागून चालावें. त्याच्या समक्ष कोणतेंही व्यसन करूं नये. त्याचें कांहींही त्यास विचारल्याशिवाय दुसऱ्या कोणास देऊं नये. त्याचें गुह्य बाहेर बोलूं नये. त्याची थट्टामस्करी करूं नये, आणि शिंक, ढेकर, खोंकणें वगैरे तो सन्निध असतां एका बाजूस तोंड करून आदबीनें करावीं. दोन धनी

असल्यास त्यांच्या योग्यतेप्रमाणें सारखें वागावें व त्यांचे हुकूम परस्परांचे विरुद्ध असल्यास प्रत्यक्षत्वानें ज्याचा हुकूम मानण्याचें आपलें काम असेल त्याचा हुकूम मानावा, तथापि तो हुकूम मूळ धन्याच्या फायद्याविरुद्ध असल्यास मानूं नये. उदाहरणार्थ, "अ" हा आपला वरिष्ठ अधिकारी आहे व "ब" हा त्याहून वरिष्ठ आहे. "ब" नें आपणास अमुक काम अमुक रीतीनें करण्याविषयीं हुकूम दिला आहे व "अ" तसें न करतां दुसऱ्या प्रकारें करण्याविषयीं सांगत आहे तर त्याला "ब" च्या हुकुमाविषयीं सांगून तो न ऐकेल तर त्याच्या ह्मणजे "अ"च्या सांगण्याप्रमाणें करावें. आतां "क" मुख्य मालक किंवा राजा आहे आणि "अ" किंवा "ब" अथवा उभयतांही त्याचे विरुद्ध, त्याचे कायद्याविरुद्ध अथवा त्याचे फायद्याविरुद्ध एखादी महत्वाची गोष्ट करण्यास सांगत आहेत तर ती गोष्ट करूं नये. अशा भानगडीच्या वेळीं सारासार विचार करून वागावें.

गुरु व शिष्य—गुरूची वागणूक शिष्याजवळ व शिष्याची गुरूजवळ आज्ञाधारकपणा, मान, नीति वगैरे संबंधानें धनी व नोकराची जशी वर सांगितली आहे त्याप्रमाणेंच असावी. गुरूनें शिष्यास विद्या निष्कपटपणें व श्रमाबद्दल न कंटाळतां चांगली समजाऊन शिकवावी. शिकविण्याचा काळ व विषय नियमित असावे. पहिल्यानें स्वल्प व मागाहून कठीण विषय घ्यावे व अभ्यासाचीं सर्व साधनें नेहमीं तयार असावीं. पंधरा वर्षांच्या आंतील मुलांस कदाचित् शिक्षा करणें झाल्यास पातळ छडीनें हातांवर करावी. शिकविलेल्या विद्येची परीक्षा नियमित वेळीं घेत

जावी व चांगलें शिकणारांस बक्षिसें वगैरे देण्याच्या रूपानें उत्तेजनाची तजवीज असावी. अभ्यासाची स्थिति मुलांच्या पालकांस कळण्याची तजवीज असावी. गुरूनें सर्व शिष्यांवर समदृष्टी ठेवावी. वाईट वागणुकीच्या मुलांस शाळेंतून काढून टाकावें. शिकविण्याच्या विषयाशिवाय गुरूंनीं शिष्यांस व्यवहारनीतीविषयींही सदुपदेश करावा. ज्या शाळेंत मुलाच्या खाण्यापिण्याची व संरक्षणाचीही तजवीज असेल तेथें व जेथें शिष्य गुरूच्या घरींच अभ्यासाकरतां राहिला असेल तेथें तर गुरूवर त्याच्या संरक्षणाची विशेष जबाबदारी असते. अशा ठिकाणीं गुरूनें शिष्याचें पुत्रवत् पालन करावें. त्याचें खाणें, पिणें, कपडे, स्वच्छता, नीती व शरीररक्षण इकडे चांगलें लक्ष्य दिलें पाहिजे. सुतारकाम, लोहारकाम, शिवणकाम इ० प्रकारच्या शिक्षणाकरतां राहिलेल्या शिष्यास तो करीत असलेल्या कामाच्या योग्यतेप्रमाणें पैसे द्यावे. जोखमी विद्या शिकवितांना गुरूंनीं अपघात वगैरे न होण्याविषयीं फार खबरदारी घ्यावी. शिष्यानें गुरूचें सांगणें फार लक्षपूर्वक समजून घेऊन काळजीपूर्वक अभ्यास करावा. एकट्यानें अभ्यास करण्यापेक्षां साथीदार असणें चांगलें. गुरूला पूज्य मानून आज्ञाधारकपणें व नीतीनें वागावें. कोणत्याही गोष्टीबद्दल आळस करूं नये. आपल्या बरोबर शिकणारे इतर शिष्यांबरोबर व गुरूच्या मनुष्यांबरोबर प्रीतीनें, नीतीनें व सहनशीलतेनें वागावें. तंटाभांडण वगैरे करूं नये. गुरूंनीं सांगितलेल्या विषयाचें चांगलें मनन करीत जावें व आलेल्या शंकांचें निवारण गुरूजवळून लीनतेनें

करून घेत जावें. एकाहून ज्यास्त गुरु असल्यास सर्वांस सारखें मानावें.

पति आणि भार्या—यांनींही परस्परांशीं आज्ञाधारकपणा व मान या संबंधांत बहुतेक अंशीं धनी व नोकर याप्रमाणें वागलें पाहिजे. एकांतांत मात्र पुष्कळ अंशीं बरोबरीच्या नात्यानें व संकोचविरहित वागावें. पतीनें भार्येस बऱ्याच संबंधांत नोकराइतकें कमी न समजतां बरोबरीच्या नात्यानें व कधींच परकेपणा न ठेवतां वागविलें पाहिजे, व ती आपल्या सुखदुःखाची बरोबरीनें वांटेकरीण आहे असें मानलें पाहिजे. तिच्या वागणुकीवर जसें दक्षपणानें नजर ठेवणें जरूर आहे तसेंच तिचेजवळ निष्कपटपणें आणि प्रीतीनें वागणेंही अवश्यक आहे. तसेंच संकटापासून व दुःखापासून तिचें रक्षण करणें पतीचें कर्तव्यकर्म होय. सुशील व सद्वर्तनी भार्येपासून गुह्यही छपवून ठेऊं नये. तिला नेहमीं सदुपदेश करून नीति, संततीचें संगोपन आणि गृहव्यवस्था शिकविली पाहिजे. तरुण स्त्रीला बनेल तेथपर्यंत परगांवीं ठेवूं नये व ठेवावी लागल्यास सुशील मनुष्यांच्या संगतींत व देखरेखीखालीं ठेवावी. वाईट चालींच्या स्त्रियांची संगति तिला होऊं देऊं नये व वाईट चालींच्या पुरुषांशीं तिचा कोणत्याही प्रकारचा संबंध न राहील अशी व्यवस्था ठेवावी. जेथें स्त्रिया कुटुंबी मनुष्यांपासून पृथक् व नोकरांत बराच वेळ राहण्याचा संभव असेल तेथें नोकर स्त्रियाच असाव्या. बाहेरील उद्योग करणाऱ्या स्त्रियांच्या वागणुकीविषयीं तर फारच दक्षता ठेविली पाहिजे. स्त्रीकडून व्यभिचाराचा गुन्हा झाल्यास तिचा त्याग करावा,

कारण तिच्यापासून सुरळीत संसार होणारा नसून तिच्यापासून होणारी संतति आपणास उपयोगीं पडणारी व सुशील आणि पराक्रमी होत नाहीं. पुरुषानें आपल्या स्त्रीजवळ नेहमीं शांतपणें वागावें, ती जिवंत असतां दुसरी स्त्री करूं नये व संततीकरतां करणें भाग झालेंच तर पहिल्या स्त्रीच्या संमतीशिवाय करूं नये आणि केल्यावर दोघींवर प्रीति सारखी ठेवून उभयतांस सुख सारखें द्यावें. तथापि मानाच्या संबंधांत थोरलीचा अधिकार जास्त आहे असें समजावें. पहिलीनें आपल्या सुखांत दुसरीस वांटेकरीण होऊं दिल्याबद्दलच्या तिच्या चांगुलपणाविषयीं कृतघ्न होऊं नये. कलह करणाऱ्या व अवज्ञा करणाऱ्या स्त्रीस पृथक् ठेवावी. स्त्रीनें पतीचा अपमान व आज्ञाभंग कधींच करूं नये. सर्व घरांत स्वच्छता व व्यवस्था ठेवावी, नोकरांच्या कामावर देखरेख ठेवावी, घरांतील सर्व पदार्थांस जपावें व नीटनेटके ठेवावे, पतीच्या व मुलांच्या सुखदुःखाविषयीं फार जपावें, नोकराजवळ मायाळूपणानें वागावें व घरांतील किरकोळ देण्याघेण्याचा हिशेब ठेवावा. अंगावर दागिने असलेल्या मुलांस व अज्ञान मुलें ज्यांस विस्तवाचें वगैरे भय कळत नाहीं अशांस नजरेआड होऊं देऊं नये. मुलांस सुनीतीचें वळण लावावें व त्यांपासून आणि विद्येपासून होणारा फायदा त्यांस समजवावा. सण व धर्मकृत्यें करण्याच्या दिवसासंबंधी वेळेवर व्यवस्था करावी. घरांतील सर्व व्यवस्था नियमबद्ध चालवावी, ह्मणजे सर्व कामकाजाच्या वेळा ठरविलेल्या असाव्या. खाण्यापिण्याच्या पदार्थांचा चांगले वाईटपणा पहात जावा व त्यांपासून तयार

करावयाच्या पदार्थांच्या स्वच्छतेविषयीं वगैरे दक्षता ठेवावी. फाटलेले कपडे लागलीच शिवीत जावें आणि परपुरुष व वडील मनुष्यें यांचे जवळ नेहमीं मर्यादेनें वागावें. परपुरुषांजवळ एकांतीं कोणत्याही कारणानें कधींच राहूं नये. व्यभिचार इह व परलोकींही दुःखदायक होतो. स्त्रीनें बनेल तेथपर्यंत पतीपासून पृथक् राहूं नये, पतीची सेवा करावी, कोणत्याही प्रकारचें व्यसन करूं नये, वाईट चालीच्या व स्वभावाच्या पतीस लीनतेनें सदुपदेश करून ताळ्यावर आणावें, परपुरुषाशीं फार सलगीनें वागूं नये व फावल्या वेळीं गायन, वाचन व अनेक उपयुक्त विद्यांचा अभ्यास वगैरे कामें करावीं. एकटें कोणीकडेही जाऊं नये. मुख्यत्वेंकरून तारुण्यांत फार जपून वागल्याशिवाय व दृढनिश्चयाशिवाय पातिव्रत्य रक्षण होणें कठीण असतें हें पक्कें लक्षांत वागवावें. सवत असल्यास तिचे जवळ व घरांतील इतर मनुष्यांजवळ कलह करूं नये, त्यांचेजवळून आपणास वाईट वाटण्यासारखें कांहीं झालें तरी रागावूं नये किंवा कलह करूं नये, शांतपणें ज्याची चूक त्यास कळवावी. सुशील व पतिव्रता स्त्रीस दुःख सहसा होत नाहीं, झालें तरी तें लौकर नाहींसें होतें, सुख व सत्कीर्ति प्राप्त होते व अंतीं सद्गति मिळते. बाहेरील उद्योग करावा लागणाऱ्या स्त्रियांस तर पातिव्रत्य फारच दक्षतेनें व दृढ मनानें सांभाळलें पाहिजे. व्यभिचारामुळें मनुष्याचें लक्ष्य आपल्या संसारावर बरोबर रहात नाहीं, बहुधा तें मनुष्यसंसाराचें नुकसान करतें, नवराबायकोंत प्रेम रहात नाहीं, दूषितयोनीपासून झालेली संतति कुटुंबांतील मनुष्यांस व खऱ्या पालकांस चांगली उप-

योगीं पडत नाहींव त्या संततीचे हातून बहुधा महत्कार्यें होत नाहींत. व्यभिचार करणें ह्मणजे विश्वासघात करणें होय आणि स्त्रिया बीजधारक असल्यामुळें त्यांनीं व्यभिचार करणें तर फारच वाईट आहे. पातिव्रत्यधर्मांनीं वागणारी पतिव्रता स्त्रीची वाचा सिद्ध असते व पराक्रमी व्यक्तीची उत्पत्ति व्यभिचारांनीं दुष्ट झालेल्या योनीपासून होऊं शकत नाहीं हें प्रमाणसिद्ध आहे. स्त्रियांस शारीरिक श्रम कमी होण्याचा संभव असल्यामुळें त्यांनीं उपोषणादि नेम केल्यास अन्नपचनाचे वगैरे संबंधांत फार फायदेशीर होतें. संततीसंबंधी व एकंदर मनुष्यसुखासंबंधी चांगली व्यवस्था राहण्याकरितां स्त्रीपुरुषांचीं लग्नें होणें व व्यभिचार बंद असणें अत्यावश्यक आहे. ज्यांत व्यभिचाराचा व पराक्रमाचा संबंध नाहीं अशा गोष्टींत स्त्रियांस पुरुषांचे बरोबरीनें वागूं देण्यास हरकत नाहीं. गाण्याशिवाय स्त्रियांस अनेक प्रकारचीं वाद्यें वाजविणें, पोहणें, झाडावर चढणें, घोड्यावर बसणें, खेळ खेळणें, चित्रें काढणें, किंवा करणें वगैरे प्रकारच्या विद्या शिकविण्यास हरकत नाहीं.

मित्र व शत्रु—मनुष्याची चांगली परीक्षा केल्याशिवाय व प्रसंगोप्रसंगीं अनुभव पाहिल्याशिवाय कोणासही मित्र समजूं नये. नुसती ओळख ह्मणजे मित्रत्व नव्हे. निष्कपटपणें प्रसंगीं उपयोगीं पडणारा तोच खरा मित्र. मित्राजवळ कपटानें वागूं नये, स्पष्टवक्तेपणांनीं वागावें, शक्त्यनुसार व प्रसंगीं आपल्या हिताकडेही दुर्लक्ष्य करून मित्राच्या उपयोगीं पडावें. निरपेक्ष हेतूनें उपयोगीं पडणारा तोच खरा मित्र समजावा. मित्राजवळ खोटें बोलूं नये, व महत्वाच्या

कृत्यांत त्याची सल्ला घ्यावी. चांगला अनुभव आल्याशिवाय मित्राजवळही एकाएकीं आपलें गुह्य बोलूं नये. मित्राच्या घरांतील स्त्रियांशीं फार सलगी ठेवूं नये. मित्र समजण्यापूर्वी त्याच्या वागणुकीवर चांगली दक्षतेनें नजर ठेवावी. खऱ्या मित्राच्या संबंधांत परकेपणा मानूं नये व त्यास योग्य मानानें वागवावें. दुर्गुणी मनुष्याशीं मित्रत्व ठेवूं नये व खऱ्या मित्रास विश्वासाचीं कामें सांगावीं. सदैव सुनीतीनें वागणारांस प्रत्यक्ष मित्रत्व नसलें तरी मित्र समजून त्यांशीं वागावें. ज्याचेजवळ आपला बेबनाव झाला आहे, जो अनीतीनें वागणारा, ज्यास आपल्या कांहीं वस्तूविषयीं अभिलाष आहे, ज्यास आपल्या पासून कांहीं दुःख झालें आहे व ज्याच्या इच्छेविरुद्ध आपण वागलों आहों तो आपला शत्रू आहे असें समजावें. शत्रू गोड बोलत असला तरी त्याच्यावर विश्वास ठेवूं नये. शत्रूची वागणूक चांगल्या प्रकारें तपासून पाहिल्याशिवाय शत्रुत्व नाहींसें झालें असें समजूं नये. भाग पडल्याशिवाय शत्रूचें पारिपत्य करूं नये. पारिपत्य करणें तें अपराधानुरूप थोडें किंवा जास्त करावें, पण त्यापासून आपलें त्या वेळीं अगर पुढें नुकसान न होईल असें असावें. स्वजनशत्रूस व एकंदर मनुष्यशत्रूस आत्मशत्रू समजावें. शत्रूवरही प्रसंगीं उपकार करावा व भाग पडल्याशिवाय त्याचे जवळही अनीतीनें वागूं नये. शत्रूजवळही कठोर भाषण करूं नये व आपल्या अंतःकरणाची त्यास ओळख पटूं न देतां सावधगिरीनें वागावें.

दुकानदार व गिऱ्हाईक—दुकानदारानें विक्रीकरतां माल बनविणें तो चांगल्या व न सडलेल्या वगैरे पदार्थांचा

बनवावा. जे पदार्थ उघडे ठेविले असतां बिघडण्यासारखे असतील किंवा खाण्यास अपकारक होतील ते झांकलेले असावे. सर्व माल नेहमीं साफ ठेवावा व तो ज्या भांड्यांत अगर पात्रांत ठेवावयाचा किंवा द्यावयाचा तेंही चागलें स्वच्छ व माल न बिघडेल अशा प्रकारचें असावें. त्याप्रमाणेंच उंदीर, मुंग्या वगैरेपासून मालाची खराबी न होईल याविषयींही जपलें पाहिजे. वजनें, मापें व तोलण्याचे कांटे बरोबर असावे, खरें बोलावें, माल तोलण्यांत लबाडी करूं नये आणि भाव सर्वांजवळून सारखा घ्यावा ह्मणजे गिऱ्हाइकी वाढून बरकत येते. लबाडीच्या धंद्यांत चांगली बरकत होणें संभवनीय नसतें. नाणें घेतांना नेहमी खरें खोटें किंवा चांगलें वाईट कसें आहे तें पाहून घ्यावें. बांधण्यासारखा माल गिऱ्हाइकांस नेहमीं बांधून द्यावा. प्रामाणिक दुकानदारानें मालाच्या नियमित प्रमाणाच्या पुड्या बांधून ठेवल्यास किंवा डबे अथवा पेट्या भरून ठेवल्यास चांगलें. दुकानाची जागा नेहमीं व्यवस्थित, सुशोभित व स्वच्छ ठेवलेली असावी. दुकान जितकें लौकर उघडवून जास्त वेळ उघडें ठेववेल तितकें ठेवावें. चोर वगैरेपासून व आगीपासून दुकानाचें रक्षण होण्याची चांगली तजवीज असावी. ज्वालाग्राही माल विकण्याच्या दुकानांत विड्या व तंबाखु ओढण्याची मनाई असावी. दुकानाच्या दरवाजावर मालकाचें नांव व मालाची जात कळेल अशा प्रकारची पाटी लावलेली असावी आणि मालाच्या भावाची किंवा किंमतीची यादी दुकानांत ठेवावी, व मालावरही नांवें व किंमती लिहिलेल्या असाव्या. दुकानदारांनीं अथवा विक्री करणारांनीं

गिऱ्हाइकांशीं नेहमीं सभ्यपणानें वागून मधुर भाषण करावें. पूर्वीं ठराव केलेला असल्यास गिऱ्हाइकांनीं नेलेला माल नापसंत झाल्यामुळें न खराब करतां जसाच्या तसा परत दिल्यास जरूर तर त्याचे बदला दुसरा द्यावा किंवा पैसे परत द्यावे. खराब होणारा माल खपाच्या मानाप्रमाणें बेताचाच ठेवावा. खरेदी व विक्रीचा हिशेब ठेवावा व निदान प्रत्येक सहा महिन्यांनीं किंवा वर्षानें नफानुकसानाचा ताळा पहावा. विक्रीच्या रकमांची बेरीज करून त्यांत शिलकी मालाची किंमत मिळवून त्यांतून खरेदीची बेरीज व खर्च वजा जातां जी बाकी राहील तो फायदा होय. फायद्यांतून नियमित रक्कम धर्माकरतां काढणें व ती रक्कम कलाकौशल्याच्या वृद्धीकडे किंवा उपजीविकेचें साधन मिळविण्यास खरोखर असमर्थ अशांच्या पोषणाकडे प्रत्येक दुकानदार, व्यापारी व उदमी यांनीं लावल्यास चांगलें. दुकानांकरतां माल खरेदी करणें झाल्यास तो चांगला व स्वस्त असेल तेथून घ्यावा. दुकानांत काम करणाऱ्या मनुष्यास तो भागीदार असला तरी कमिशनच्या रूपानें पगार ठरविलेला असावा, नोकरांच्या कामावर व पैशावर मालकांनीं चांगलें लक्ष्य ठेविलें पाहिजे, विश्वासाविषयीं खात्री असलेल्या गिऱ्हाइकांस माल उधार देणें तो त्याची खात्यावर सही घेतल्याशिवाय अथवा त्याचें लेखी पत्र असल्याशिवाय देऊं नये व अशा गिऱ्हाइकांपासून जो भाव घ्यावयाचा तो रुपयांच्या वाजवी व्याजासुद्धां असावा, गिऱ्हाइकांनीं माल घेणें तो आपल्या समक्ष वजन करवून किंवा मापवून व स्वतः पसंत करून घ्यावा, माल परत करावयाची जरूर

तर (घरीं दुसऱ्यांस दाखवावयाचा असेल तर) पहिल्यानें त्याविषयीं बोली करून तो खराब न होण्याविषयीं खबरदारी घेऊन परत करावा. खरेदी केलेल्या मालाची किंमत चुकविणें ती चांगला हिशेब करून चुकवावी व कांहीं पैसे परत घेणें झाल्यास ते चांगले तपासून पाहून घ्यावे. अशा कामांत घाई व हयगय करणें नुकसानकारक होतें. माल स्वस्त असेल तेथून विकत घ्यावा. माल उधार घेतला असल्यास त्याच्या भावाप्रमाणें हिशेब बरोबर तपासून मग पैसा चुकवावा आणि उधारी खातें जो प्रामाणिक दुकानदार असेल त्याचेकडेसच ठेवावें. माल आणावयास दुसरा मनुष्य पाठविणें झाल्यास विश्वासू पाठवावा व त्यानें आणलेला माल घरीं तपासून व वजन करून पहावा. सवड असल्यास माल उधारीनें न घेणें चांगलें व घेतल्यास त्याबद्दल दिलेल्या पैशाची पावती घ्यावी किंवा ते पैसे खात्यावर आपल्या समक्ष जमा करवावे. हिशेबांत चूक झाल्यामुळें किंवा चुकून आपलेकडे जास्त पैसे आल्यास दुकानदार व गिऱ्हाइक या उभयतांनींही इमानानें एकमेकांस परत द्यावेत. घरवाले आणि जमिनीचे मालक व भाडोत्री यांच्यांतील व्यवहारही याप्रमाणेंच खबरदारीचा असावा व सर्व ठराव लेखी असावे, घर किंवा जागा खाली ह्मणजे रिकामी करविण्याकरतां मालकानें भाडोत्र्यांस आगाऊ कळवून योग्य मुदत दिली पाहिजे. भाडोत्र्यांनीं मालकाच्या कोणत्याही मालाचें नुकसान करूं नये व मालकांनीं भाडोत्र्याच्या योग्य सोयी कराव्या.

व्यापारी, व्यापारी मंडळ्या व दलाल—व्यापा-

ज्यानें जेथील माल मागवावयाचा किंवा जेथें पाठवावयाचा तेथील भावाबद्दल पहिल्यानें चांगला तपास करून मग मागवावा किंवा पाठवावा अथवा पाठविण्यास खरेदी करावा. खरेदीपूर्वी मालाची परीक्षा करून भाव ठरविण्याकरतां अथवा मालाची विक्री करण्याकरतां माहितगार दलालाची योजना करावी. खरेदी करावयाच्या मालाचे नमुने पहावे. खरेदीच्या रकमेंत आणण्याचा किंवा पाठविण्याचा वगैरे खर्च मिळवून जी रक्कम होईल त्याहून विक्रीची रक्कम कमी होत असल्यास व भाव पुढें चढेल असें अनुमान असल्यास माल कांहीं दिवस शिल्लक ठेवावा. या संबंधात नोकर वगैरे जे ठेवावयाचे ते विश्वासू व हुशार असे ठेवलेले असावे व त्यांच्यावर चांगली देखरेख ठेवावी. भावाचा तपास ठेवणें व ते पुढें चढतील किंवा उतरतील याविषयीं धोरण बांधणें हें फायद्यास किंवा नुकसानास मुख्य कारण आहे. जरूर तेव्हां माल ठेवण्याकरतां वखारी असाव्या व त्यांत माल व्यवस्थेनें व स्वच्छ ठेवण्याविषयीं जपावें. माल नेण्याआणण्यांत खराब न होईल व त्याची अफरातफर किंवा चोरी वगैरे न होईल अशाविषयींही जपावें. मालाचा विमा उतरणें फार चांगलें. नेहमीं प्रामाणिक व हुशार दलालांची योजना करावी. व्यापारांत भागीदार असल्यास जें कांहीं करणें तें सर्वांनुमतें अथवा बहुमतानें करावें. जसा भाग किंवा हिस्सा असेल त्या मानानें नफा अगर तोटा वांटला जावा. जास्त भागीदार असल्यास त्यांस व्यापारी मंडळी असें ह्मणावें. अशा मंडळीस एक नांव दिलेलें असावें. अशा प्रकारची मंडळी एखादा मोठा कारखाना चालवीत असल्यासही वरील व पूर्वी सांगितलेल्या "दुका-

नदार" सदराखालील जितक्या गोष्टी लागू पडण्यासारख्या असतील तितक्या अमलांत आणाव्या. एकंदरींत कोणतेंही काम एकोप्यानें, व्यवस्थितपणें, शहाणपणानें व विश्वासानें फायदेशीर होईल असें झालें पाहिजे. मोठमोठे कारखाने व कामें माहितगार, इमानी, मेहनती व सुस्वभावी अधिकारी नेमून चालविलीं पाहिजेत व त्यांवर भागीदार अथवा त्यांच्या सभेनें नजर ठेविली पाहिजे. मंडळ्यांच्या कारखान्यांत तयार झालेल्या पदार्थांवर नियमित खूण केलेली असावी, व सर्व कामें मंडळ्यांच्या ठरावाप्रमाणें चालावीं. मुदतीच्या मुदतीस माहितीचीं पत्रकें तयार करवून त्यांवरून सर्व कामांची स्थिती जाणावी आणि फायदा वाढण्याकरतां नेहमीं जितक्या करवतील तितक्या सुधारणा कराव्या. तसेंच या पुस्तकांतील "धनी व नोकर" आणि "मंडळ्यांची व सभांची रचना" या प्रकरणांतीलही जितक्या गोष्टी लागू पडण्यासारख्या असतील तितक्या या बाबतींत उपयोगांत आणाव्या. विमा उतरण्याचा धंदा करणाऱ्या मंडळ्यांनीं ज्या कारखान्याचा, इमारतीचा, मनुष्याचा अथवा मालाचा वगैरे विमा उतरणें असेल त्याच्या किंमती व स्थितीप्रमाणें विम्याची रक्कम ठरवावी व दुसऱ्या मंडळीकडे त्याचा विमा उतरला आहे किंवा कसें व किती रकमेला उतरला आहे यांविषयीं विचार करावा. तसेंच ज्याचा विमा उतरावयाचा किंवा उतरला असेल त्याच्या सुरक्षतेची चांगली तजवीज केलेली नसल्यास करवावी आणि विम्याची रक्कम देण्याचा प्रसंग आल्यास नुकसान कोणत्या कारणानें किती झालें याविषयीं किंवा वारसाविषयीं चांगला तपास करून निर्णय ठरवावा. होईल तेथपर्यंत व्यापाऱ्यानें

अथवा व्यापारी मंडळीनें स्वतःच्या पैशानें उद्योग करावा व निरुपाय असेल तेव्हांच कर्ज काढावें. "शेअर्स" काढून उद्योग करण्याची पद्धतही चांगली. मोठ्या कारखान्यांतील नोकरांच्या रहाण्याच्या सोयीसंबंधी, स्वच्छतेसंबंधी, शरीरप्रकृती चांगली रहाण्यासंबंधी, प्रकृती बिघडली असतां औषधें मिळण्यासंबंधी, विद्येसंबंधी व सद्वर्तनासंबंधी ज्या होण्यासारख्या तजविजी असतील त्या कराव्या. दलालाचा धंदा करणारांनीं ह्मणजे कमिशन घेऊन कामें करणारे अगर माल पाठविणारे यांनीं ज्या ठिकाणीं काम करावयाचें असेल तेथील ज्या प्रकारच्या मालाची दलाली करावयाची त्याच्या भावाविषयीं चांगला तपास ठेवला पाहिजे. माल विकून देण्याच्या किंवा खरेदी करून देण्याच्या संबंधांत फार विश्वासानें किंवा सचोटीनें वागलें पाहिजे. मालाच्या चांगले वाईटपणाची परीक्षा फार काळजीनें करावी. दलालास वजनांची व मापांची चांगली माहिती असून त्यांसंबंधीं सर्व रीती चांगल्या अवगत असल्या पाहिजेत. माल पाठविण्याच्या अथवा आणविण्याच्या संबंधांत फार विश्वासानें व काळजीनें वागलें पाहिजे. घेतलेल्या मालाचा व त्यासंबंधीच्या खर्चाचा चांगला हिशेब ठेवला पाहिजे.

सावकार व पेढ्या—सावकारी ह्मणजे नाण्याचा धंदा करणें. नाण्याचा धंदा ह्मणजे लोकांचें नाणें अमानत ठेवणें व पाहिजे तेव्हां परत देणें, दुसऱ्यास गहाणावर किंवा विश्वास ठेवण्यासारखें कूळ असल्यास गहाणाशिवाय पैसा व्याजानें देणें व हुंड्या पाठविण्याचा अथवा स्वीकारण्याचा उद्योग करणें. हा धंदा एकट्यानें करण्यापेक्षां मंडळी जमऊन मोठ्या

प्रमाणावर करणें चांगलें, तथापि लहान सहान गांवांत असें होणें संभवनीय नसल्यामुळें तेथें एकट्यालाच हा धंदा करणें भाग असून त्यापासून गरीबगुरिबांस चांगली सोय होण्याचा संभव असतो. लेख केल्याशिवाय पैसा देऊं अथवा घेऊं नये आणि देण्याच्या, घेण्याच्या व व्याजाच्या शर्ती देणारांनीं व घेणारांनीं एक मतानें ठरवाव्या. पैशाऐवजीं धान्य देणें व सव्याज परत घेणें असीही एक सावकारीची रीत आहे. व्याजाचा दर लहान रकमेपेक्षां मोठ्या रकमेला कमी असावा. अमुक मुदतीस लेख बदलण्याचा सरकारी कायदा असल्यास नवा लेख करते वेळीं दयाळू सावकारानें व्याजाची रक्कम मुद्दलांत मिळविली असल्यास शेवटीं कुळास सूट द्यावी. नुसत्या पैशापेक्षां गहाणावरील पैशाच्या व्याजाचा दर कमती असावा. गहाण ठेवावयाचा माल पूर्वी चांगला तपासून त्याच्या किंमतीचें अनुमान ठरविल्याशिवाय रक्कम देऊं नये व माल चोरीचा वगैरे आहे किंवा कसें त्याविषयीं चांगला विचार करावा. व्याजासुद्धां मुद्दलाची रक्कम गहाणाच्या मालाच्या उत्पन्न होणाऱ्या किमतीइतकी होऊं लागल्याबरोबर माल विकून पैसा वसूल करण्याची किंवा त्याचेवर आपली मालकी स्थापन करण्याची तजवीज करावी व ती करण्यापूर्वी कुळास आगाऊ सूचना द्यावी. गहाणाचा माल स्थावर असल्यास व त्याची व्यवस्था सावकाराकडे असल्यास त्यानें तो माल आपलाच असें समजून त्याची व्यवस्था अगत्यानें ठेवावी व त्यासंबंधी जमाखर्चाचा हिशेब चांगल्या प्रकारें निराळाच ठेवावा. पैसे देण्याच्या व्याजाच्या दरापेक्षां अमानत ठेवलेल्या पैशाच्या व्याजाचा दर कमी

असावा व ठेवलेले पैसे कूळ जेव्हां मागेल तेव्हां सर्व किंवा त्यापैकीं जितके मागेल तितके त्यास द्यावे आणि अशा प्रत्येक कुळाचा निराळा हिशेब ठेवावा. कुळाच्या लिहिण्यावरून दुसरा कोणी पैसे नेण्यास आल्यास तो लेख कुळाचाच आहे किंवा कसें याविषयीं पूर्वी चांगली खात्री करून घ्यावी. नाणें देतांना व घेतांना चांगलें तपासून पहावें. हुंड्यांच्या संबंधानेंही इतर पेढीवाल्यांशीं व्यवहार करतांना चांगला हिशेब आणि सावधगिरी ठेवावी व नाण्याचे बदला जरूर तर त्यांस माल पाठवावा. ज्या नोकरांचे हातीं नाण्याचा कारभार असेल त्यांचे योग्य रकमांचे जामीन घ्यावे व नाणें ठेवलेल्या जागेच्या सुरक्षिततेबद्दल चांगली तजवीज असावी.

शेतकरी व माळी—शेतकऱ्यांनीं शेतीसंबंधी कामें हंगामी वेळेवर करावीं. बीं चांगलें व पुरेसें संग्रहीं ठेवावें आणि तें एकदां पेरलेलें व्यर्थ गेल्यास व कदाचित् पुनः पेरण्याचा प्रसंग आल्यास पुरेल इतकें असावें. शेतकामास लागणारें सामान, गाड्या व जनावरें पाळावीं आणि त्या जनावरांच्या विष्ठेचा उपयोग खताकडे करावा. शेतांच्या किनाऱ्यांवर झाडें लावावीं ह्मणजे पाल्याचा उपयोग कुजून खताप्रमाणें होतो. झाडांवर राहिलेल्या पक्षांची विष्ठाही शेताच्या मातींत मिश्र झाल्यामुळें खतासारखे होतें व शेतावर पडलेले जीव ते खाऊन टाकतात आणि झाडामुळें जाळण्यास वगैरे लांकडेंही मिळतात. शिवाय झाडापासून व ढोरांच्या शेणापासून जरूर तेथें राबाकडेही उपयोग करतां येतो. पावसाचे पाण्याखेरीज शेतांस नहराच्या पाण्याचा पुरवठा असावा ह्मणजे दोन पिकें करतां येतात किंवा एखादे वर्षी पाऊस न

पडला तरी दुष्काळाचें भय नसतें. धान्य पिकूं लागलें ह्मणजे चोरांपासून व इतर प्राण्यांपासून त्याचें रक्षण करावें. धान्य पेरलें ह्मणजे त्यांत गवत व दुसरीं झाडें वाढूं देऊं नयेत. धान्य वगैरे पेरण्याकरतां जमीन नांगरणें, तें पेरणें, तयार झाल्यावर काढणें, साफ करणें इत्यादि कामांकरतां ज्या सामानाचा उपयोग केलेला असतो त्यांत नेहमीं सुधारणा करावी ह्मणजे कमी श्रमांत जास्त काम होण्याची जितकी तजवीज होईल तितकी करावी, अनेक प्रकारच्या यंत्रांचा उपयोग करण्याची योजना करावी आणि जमिनीचा कस व पाण्याचा पुरवठा वाढविण्याविषयीं जपावें. माळ्यानें झाडांस पाणी वेळचेवेळीं घालावें. झाडांची छाट करणें, नवीं झाडें लावणें, व कलमें करणें तीं योग्य वेळीं करण्याविषयीं जपावें. बागेंत गवत किंवा जंगली झाडें वाढूं देऊं नयेत किंवा कचरा सांचूं देऊं नये. झाडें व झाडांचे वाफे रांगेनें व झाडांच्या निरनिराळ्या रंगांप्रमाणें चित्रविचित्र व सुशोभित दिसतील असे लावावे. रस्ते व चौक रेखल्यासारखे सुशोभित असावे आणि त्यांवर झाडांच्या व वेलींच्या कमानी केलेल्या असाव्या. ठिकठिकाणीं मजेदार कारंजीं असावीं. आणि बसण्यास उघड्या जागेंत व सुंदर वेलींच्या मंडपांत चांगल्या बैठकीच्या जागा केलेल्या असाव्या. सुवासिक फुलझाडें व फळझाडेंही लावलेलीं असावीं. बागेस पाण्याचा पुरवठा चांगला असून बागेंत जितका रमणीयपणा आणवेल तितका आणावा. बागेंत जनावरें किंवा पक्षी ठेवलेले असल्यास त्यांचे पिंजरे साफ ठेवण्याविषयीं व त्यांस वेळच्या वेळीं खाणें व पाणी घालण्याविषयीं जपावें. झाडांस पाणी

दोनप्रहरीं उन्हाच्या वेळीं कधींच घालूं नये व बागेंत पाऊ-साचें पाणी तुंबून राहूं देऊं नयें. ज्या झाडांस ऊन सोसत नाहीं त्यांस छायेंत ठेवावें. उन्हाळ्यांत संध्याकाळीं रस्त्यांवर पाणी शिंपावें.

धंदेवाईक व कसबी—या सदरांत डाक्तर (वैद्य), इं-जिनीयर, वकील, सुतार, लव्हार, कासार, सोनार, गवंडी, दरजी, धोबी, रंगारी, न्हावी, वगैरे सर्वांचा समावेश होतो असें समजावें. या लोकांनीं गिऱ्हाइकांचीं कामें वेळच्यावेळीं करण्याविषयीं किंवा करविण्याविषयीं फार जपलें पाहिजे. तसेंच कामें काळजीपूर्वक व प्रामाणिकपणें केलीं पाहिजेत. जोखमाचीं कामें करतांना घाई करूं नये. गिऱ्हाइकांचे मनोधर्म व सांगणें चांगलें ऐकून व समजून घ्यावें व त्यांस सांगणें तेंही चांगलें समजावून सांगावें. श्रमाबद्दल पैसा वाजवी घ्यावा, आडवून घेऊं नये. अशा लोकांनीं आपलें काम कमी श्रमांत चांगलें व ज्यास्त होण्याकरितां यंत्रांची वगैरे योजना करण्याचें शोधून काढावें. नोकरीच्या नात्यानें अशीं कामें करणें झाल्यास नोकराच्या धर्माप्रमाणें किंवा गुरूप्रमाणें करीत असल्यास त्याप्रमाणें वागावें. सर्व कामें आळसरहित व शहाणपणानें करावीं. मंडळ्या (कंपन्या) स्थापून हीं कामें इमानानें व वक्तशीर करण्याची तजवीज असल्यास विशेष चांगलें.

मक्तेदार किंवा कंट्राक्टर—जें काम पुढें करण्याचें त्या संबंधींच्या खर्चाचा व उत्पन्नाचा अजमास व तें काम करा-वयाच्या शर्ती वगैरे पहिल्यानें चांगल्या प्रकारें अवगत करून घ्यावीं. काम करणें तें अगदीं ठरावाबरहुकूम करावें. कामें

करण्याकरतां माहितगार, मेहनती व प्रामाणिक मनुष्यांची योजना करावी. जमाखर्चाचा चांगला हिशेब ठेवावा व सर्व कामावर स्वतः देखरेख ठेवावी. तसेंच किती काम झालें, त्यापैकीं कितीचा पैसा मिळाला व बाकी कितीचा मिळणें राहिला हें पहात जावें. पैशाचा किंवा मालाचा भरणा करणें असल्यास तो वक्तशीर करण्याविषयीं जपावें. कांहीं जिन्नस विकण्याचा मक्ता असल्यास त्याची विक्री करण्यांत कोणत्याही प्रकारची लबाडी करूं नये. माल जरूर तितका नेहमीं शिल्लक ठेवावा व तो शर्तीप्रमाणें चोख असावा.

सर्व साधारण वागणूक—मनुष्यानें कधींही आपला काळ फुकट घालवूं नये. जो काळ गेला तो पुनः कधींच येणारा नसून तितका आयुष्यांत वजा पडतो हें कधींच विसरूं नये. दुसऱ्याच्या हक्काचा अभिलाष करणें ती चोरी, ती कधींच करूं नये. कोणीही मनुष्याजवळ त्याचा वाईटपणा कळे तोंपर्यंत वाईट वागूं नये व त्याचेवर शक्त्यनुसार उपकारच करीत असावें. वागणूक तीन प्रकारची असते; स्वतः उद्देशीय, सार्वजनिक व सामाजिक. जी आपल्या स्वतः व आपल्या मनुष्यांकरतां ती स्वतः उद्देशीय, सार्वजनिक ह्मणजे सर्व मनुष्यांकरतां, आणि सामाजिक ह्मणजे दुसरे लोक व आपण मिळून जें एखाद्या गोष्टीकरतां वागणें तें. पहिली बहुधा स्वतःच्याच फायद्याकरतां असते, पण दुसरी व तिसरीच्या उद्देशाचा नेम नसतो असें समजावें; तथापि स्वतः आपण सर्व प्रसंगीं सुमार्गाकडेसच वळण ठेवावें. देह क्षणिक आहे हें नेहमीं मनात वागवावें. नेहमीं खरें बोलावें व कारणपरत्वें खोटें बोलणें भाग

पडल्यास ज्याचे जवळ खोटें बोललें असेल त्यास तरी तें खोटें असें कधींच समजूं नये. चांगल्याजवळ चांगलें व वाईटाजवळ वाईट असें वागावें, परंतु आपलें कांहीं नुकसान नसल्यास वाईटाजवळही चांगलें वागावें. थोडें पण लोकप्रिय असें बोलावें व बोलण्यांत हलके शब्द आणूं नये. वारंवार शपथा घेऊं नये व घ्यावी लागल्यास खरी घ्यावी. चहाडी करूं नये व दुसऱ्याचें गुह्य प्रसिद्ध करूं नये. कारण नसतां उगीच कोणाचीही निंदा करूं नये. साधें वागावें, तथापि अपमान सहन करूं नये, निरुपायानें सहन करावा लागत असल्यास त्यांतून लौकर सुटण्याचा होईल तितका प्रयत्न करावा. काम, क्रोध, मद, मत्सर, मोह, दंभ, निद्रा, मन व क्षुधा हीं आपल्या स्वाधीन ठेवावीं व त्यांस सुमार्गाकडे लावावें. ते सुमार्ग असे, काम स्वस्त्रीद्वारें संतति उत्पत्तीकडे, क्रोध व मद अनीतीनें वागणारांजवळ, मत्सर सुकीर्त्ति, ज्ञान व विद्यासंपादनाविषयीं, मोह सुनीतीनें वागणाराजवळ आणि दंभ सन्मान व स्वातंत्र्य यांविषयीं बाळगावे. आत्मसंयमन करण्याची संवयी ठेवावी. कैफ नियमितपणें करावा. द्यूत खेळूं नये. राग आल्याबरोबर विचार केल्याशिवाय कांहीं करूं नये; एरव्हींही कांहीं करण्यापूर्वी विचार करावा. स्त्री, शत्रु व अभिलाषी मनुष्यावर विश्वास ठेवूं नये. हिंसा करूं नये, पण आपल्या जिवाच्या बचावाकरतां हिंसा करावी. स्वजनहित तेंच आपलें हित असें समजावें. स्वजन म्हणजे पहिल्यानें आपले आप्त व मित्र, मागून ज्ञातिबांधव, नंतर धर्मबंधू, त्यानंतर देशबंधू व शेवटीं सर्व मनुष्यें. उपकार किंवा श्रम कोणाचेही फुकट घेऊं नयेत, त्यांचा

वाजवी मोबदला द्यावा. व्यवहार, भोजन, विद्या व सभेंत भाषण करणें या संबंधांत लाजूं नये; तथापि ज्यामुळें आपलें नुकसान होण्यासारखें असेल, आपणाला धोका व अपमान होण्यासारखा असेल तेथें भीड अथवा संकोच ठेवणें चांगलें. महत्वाच्या कामांत घाई करूं नये खरी, पण जेथें ती करणें भाग असेल तेथें फार सावधगिरीनें करावी. पुण्य किंवा फायदा जास्त होत असल्यास थोडें पाप किंवा नुकसान करण्यास किंवा करून घेण्यास हरकत नाहीं. सुख, कीर्ति, मान व ज्ञान मिळविण्याविषयीं अभिमान अथवा ईर्षा ठेवावी. मोठी कीर्ति किंवा परोपकार होत असल्यास जिवाची पर्वा करूं नये, तथापि निरुपायाशिवाय प्राण जाऊं देऊं नये. देह किंवा प्राण रक्षण करणें हा मुख्य धर्म समजावा. आपलें नुकसान झालें तरी दुसऱ्याचा फायदा करणारें तें उत्तम मनुष्य, आपलें नुकसान न होतां दुसऱ्याचें हित करणारें तें मध्यम, आपल्या फायद्याकरतां दुसऱ्याचें नुकसान करणारें तें कनिष्ठ व आपला फायदा नसतां दुसऱ्याचें नुकसान करणारें तें अधम मनुष्य असें समजावें. अन्यायानें कोणाच्याही जिवास म्हणजे शरिरास इजा देऊं नये. कोणाचाही विश्वासघात करूं नये अथवा कोणासही फसवूं नये. वाजवी कारणानें तसें करणें भाग झाल्यास निरुपाय आहे असें समजावें. सर्व संबंधांत स्वच्छतेविषयीं फार जपावें. अफरातफर होण्यासारखे पदार्थ दुरुस्तीकरतां वगैरे दुसऱ्याजवळ देतांना फार सावधगिरी ठेवावी. आयाप्रमाणें खर्च करावा व नेहमीं कांहीं तरी संग्रह करीत जावा. भविष्यांवर विश्वास ठेऊन कांहींही करूं नये. भय दूर आहे तों-

पर्यंतच त्याला भ्यावें. दुसऱ्याचे मनावर ठसा उमटेल असें बोलावें किंवा ल्याहावें. चांगल्या विचारानें निश्चय ठरवावा व ठरविलेला हरप्रयत्नानें तडीस न्यावा; प्रयत्न फुकट गेला म्हणून नाउमेद होऊं नये, पुनः प्रयत्न करावा. राजभक्ति किंवा स्वामिभक्ति ढळूं देण्याच्या कारणाच्या महत्वाचा विचार करावा. साहसाच्या कामाच्या सफलतेविषयीं व निर्फल झाल्यास बचावाविषयीं पूर्वी चांगला विचार करावा. मार्गावरील कांटे, कांचा व इतर (मनुष्यांस इजा करणारे) पदार्थ व कारणें अवश्य काढून टाकावीं. वडील आप्तसंबंधी, ज्यांचें आपल्याहून अधिक ऐश्वर्य व विद्या, आणि सत्पुरुष यांस सदैव मान द्यावा. लागलेली सवई मोडणें कठीण पडतें ह्मणून पहिल्यापासूनच वाईट सवई लागूं देऊं नये. सुकीर्ति न केल्यास मनुष्यजन्म व्यर्थ गेला असें समजावें. ज्ञान विद्वान् किंवा श्रीमंत यांचे जवळच असतें असें समजूं नये. आपणासह सर्व जग मिथ्या आहे असें समजून सर्व व्यवहार करावे. मृत्यूची आठवण ठेवावी व तो अमुक वेळीं येईल असें कधींही समजूं नये. मुख्य जशा वागणुकीचा असतो तसे त्याच्या हाताखालील सर्व होतात, संगतीचा कांहीं तरी गुण लागतो व मनाला अनुसरून दुसऱ्याची वागणूक दिसते, हे प्रकार लक्षांत ठेवून नेहमीं वागावें. ज्याच्या जवळ संपत्तीचें जोखम असेल अथवा जोखमाचीं कामें असतील त्यानें जिवास फार संभाळावें, अपरात्रीस एकदम दार उघडण्यापूर्वी व एकटें वगैरे कोठेंही जाण्या व रहाण्यापूर्वी विचार करावा. द्रव्यासारखी उपयोगी वस्तु दुसरी कोणतीच नाहीं असें समजावें, त्याचा

नेहमीं नीतीनें संग्रह करावा व योग्यकारणीं मात्र त्याचा व्यय काटकसरीनें करावा. सामाजिक कृत्यांत निष्पक्षपातानें, विश्वासानें व मेहनत घेऊन वागावें. कोणताही न्याय निष्पक्षपातानें करावा. कुळाभिमान, ज्ञात्यभिमान, धर्माभिमान व देशाभिमान बाळगावा. स्वातंत्र्य प्रिय मानावें. पाहिजे तें करून शरीर सांभाळावें, कारण तें असलें तरच सर्व कांहीं आहे व होतें आणि तें पुनः मिळण्याचा संभव नसतो. सर्वांस योग्यतेप्रमाणें मान द्यावा. पाप उघडकीस आल्याविना रहात नाहीं असें समजावें. किंमत सवयीनें बहुधा समजत नाहीं पण तुलनेनें समजते व चेहेऱ्यावरून अंतःकरण ओळखितां येतें हें लक्षांत ठेवावें. काळजीशिवाय वक्तशीर काम चांगलें होत नाहीं असें समजावें. सुख व दुःख मानूं नये. नाणें देतांना व घेतांना चांगलें तपासावें. संकटाचे वेळीं घाबरूं नये. अपराधी व शत्रूकडील बातमी गुप्तरूपें काढावी. चोर वगैरे अपराधी धरतांना स्वतःचे बचावाविषयीं जपावें. राजाच्या कायद्याविरुद्ध चालूं नये. फायद्याकरतांही अनीति करूं नये. समाजाच्या विरुद्ध वागतांना आपलें सामर्थ्य ताडून पहावें. कांहीं गोष्ट सांगणें झाल्यास जशीच्या तशीच सांगावी. दुसऱ्यांशीं त्यांचा स्वभाव ओळखून वागावें. पुढें करावयाच्या महत्वाच्या कार्याची आधीं प्रसिद्धि करूं नये. महत्वाचीं कागदपत्रें फार जपून ठेवावीं. दुसऱ्याच्या धर्माचा, जातीचा, ऐश्वर्याचा व सद्गुणांचा द्वेष करूं नये, अनीतीचा द्वेष करावा. वाईट चालीच्या मनुष्यावर कधींही विश्वास ठेवूं नये. कठोर व बीभत्स भाषण करूं नये.

नीतीनें स्वतंत्रता संपादावी व संभाळावी. काम होईल अशी खात्री झाली तरच तें करण्याचा निश्चय करावा. कोणीही मनुष्यास अथवा प्राण्यास चिडवूं नये. प्रत्यक्ष ऐकण्यापेक्षां सांगण्यानें मनुष्याच्या मनाला जास्त लागतें. आपल्या मुखानें आपलें वर्णन करूं नये. कोणासही विनाकारण दुःख देऊं नये. होऊन गेलेल्या गोष्टीविषयीं खेद अथवा आनंद मानूं नये. जोखमाच्या व स्त्रियांसंबंधींच्या कामावर वृद्ध, अनुभविक व सुशील मनुष्यांची योजना करावी. कोणी गुह्य बोलत असेल तेथें विचारल्याशिवाय जाऊं नये. कोणत्याही परक्या मनुष्याच्या जागेंत त्याचे परवानगीशिवाय जाऊं नये. नियमबद्ध वागावें. ज्ञान नेहमीं वाढवावें. ज्या वस्तूचा गुण आपणास ठाऊक नाहीं ती खाऊं नये. परमेश्वरभक्ति नियमांनीं करावी. नशिबावर भरंवसा ठेवून उद्योग सोडूं नये. आपणास नसल्या तरी पुढील पिढ्यांस उपयोगी अशा गोष्टी अवश्य कराव्या. एकच प्रकारची किंवा एकच ठिकाणीं तजवीज करून कार्य होईलच असें समजूं नये. कालावधीनें पुऱ्या होणाऱ्या कामाची तजवीज जरूर लागण्यापूर्वींच ह्मणजे जरूरीचा संभव दिसूं लागल्याबरोबर करूं लागावें. भयकारक ठिकाणीं राहूं नये व रहावें लागल्यास फार सावध असावें. चांगली गोष्ट लहानापासून किंवा नीचापासूनही शिकावी. अग्नि, पाणी, शत्रू, विषारी जनावरें, स्त्रिया, हातांत शस्त्र असलेला वगैरेजवळ सावध वागावें. खर्च काटकसरीनें करावा, तथापि कृपणपणा करूं नये. मनोराज्य करूं नये. जोखमाचीं कामें मुलांना, मूर्खांना आणि हयगयीनें काम करणा-

रांना कधींही सांगूं नयेत. चांगल्या अनुभवाशिवाय कोणीही मनुष्य अमुक प्रकारचा आहे असें समजूं नये. आपल्या हिताला बाध येईल असें असल्यास कोणालाही त्याचा अपराध बोलून दाखवूं नये. आठवणीकरतां टिपण ठेवित जावें. लिहिलेलें वाचून पाहून मग करणें तें करावें. बोलल्याप्रमाणें करावें व विचार करून बोलावें. रागानें आपलें नुकसान होईल असें कधींही वागूं नये. आपण पूर्वी काय बोललों त्याची आठवण ठेवावी व पुढें करावयाचें तें जरूर नसल्यास आधीं बोलून दाखवूं नये. कपडा झाडल्याशिवाय अंगांत घालूं नये. जबरदस्त शत्रूस व परपीडकांस कपटानें जिंकावें, अति कांहींच चांगलें नाहीं. जास्त संघट्टनानें मान राहात नाहीं. सुख, पुण्य, कीर्ति व मोक्ष ज्यांनीं साध्य केलीं नाहींत त्यांचें मनुष्यपण व्यर्थ गेलें असें समजावें. रस्त्याकडे कांहीं अंतरावर नजर ठेवून व सावधगिरीनें चालावें. आंधळे, लुले, पांगळे, थोटे अशक्त, भार घेतलेले, कैफ केलेला, मस्त व आपणाहून श्रेष्ठ यांस मार्ग द्यावा. कोणत्याही कामाचा आळस करूं नये. वाचनांनीं बहुश्रुतपणा येतो व प्रवासांनीं अनेक प्रकारची माहिती होते ह्मणून दोन्ही अवश्य करावीं. कोणाजवळही कांहीं ठराव करणें तो लेखी करावा. वाजवी प्रमाणांनीं व अनुमानांनीं जें दिसेल तें खरें मानावें. नुसत्या स्वार्थाहून परमार्थ आणि त्याहून स्वार्थसह परमार्थ श्रेष्ठ असें समजावें. शहाण्याला शब्द व मूर्खाला मार हीं सारखीं आहेत असें समजावें. विशेष गोष्ट मनांत रहाणें कठीण जरी असतें तरी ती योग्य स्थळाशिवाय व योग्य वेळेशिवाय बोलूं नये. ज्याचे

कडून निवारण होईल त्यालाच दु:ख सांगावें. कोणाचेंही लक्ष्य दुसरीकडे असतां त्याला कांहीं सांगूं अगर देऊं नये. प्रयत्नांनीं पाहिजे तें होतें असें समजावें. आपल्या प्रमाणेंच दुसऱ्याचें दु:ख समजावें. एखादें भानगडीचें वगैरे काम करण्यापूर्वी जड वाटतें, पण करूंच लागलें ह्मणजे साहाजिक होतें. कोणाचेही मनोधर्म आपल्याला पाहिजे तसे करणें हें मोठें महत्वाचें आहे ह्मणून तसें करण्यास झटावें. मनोधर्माला अनुसरून मुख्यत्वेंकरून मनुष्याला चांगलें वाईट दिसतें असें समजावें. याशिवाय पूर्वी इतर सदरांखालीं सांगितलेल्या व पुढें लिहिलेल्याही गोष्टींस अनुसरून सुज्ञांनीं वागावें.

प्रकरण ३–व्यवस्था व सोई.

रस्ते व वहनें—रस्ते दोन प्रकारचे असतात, जमिनीवरील व पाण्यावरील. जमिनीवरील रस्त्यांच्या दोनही बाजूंस छायेकरतां झाडें लावलेलीं असावीं. त्यांवर धूळ, चिखल, गवत व खळगे राहूं देऊं नये. ठिकठिकाणीं धर्मशाळा, विहिरी, अथवा दुसरी कांहीं पिण्याच्या पाण्याची सोई व प्रवाश्यांच्या सुरक्षतेसाठीं पोलीसचीं ठाणीं असावीं. पावसाळ्यानंतर त्यांची दुरुस्ती होत जावी. धर्मशाळा स्वच्छ असून सोईवार व सुरक्षित असाव्या. रस्ते मनुष्यें, जनावरें, घोड्यांच्या व बैलांच्या गाड्या वगैरे चालण्यालायक व नेहमीं दुरुस्त असावे; नदी, खाडी व नाल्यावरून त्यांस ठिकठिकाणीं पूल असावे. जेथें पूल नसतील तेथें नदींत किंवा खाडींत पाणी जास्त असल्यास

पलीकडे जाण्याकरतां होड्या वगैरे ठेवलेल्या असाव्या; जेथें पाणी नेहमीं जास्त वहातें असत नाहीं तेथें दगडी फरसबंदीचा पक्का बांध असल्यास चांगलें. मोठा पूर आला तरी हरकत नाहीं असे मजबूद व उंच पूल असावे. रस्त्याला चढाव व उतार वहनें जाण्यायेण्यास जितके स्वल्प पडण्यासारखे ठेवले असतील तितके चांगले. रेलवेचे ह्मणजे लोखंडी सडकांचे चढउतार तर फारच स्वल्प असे ठेवावे लागतात व डोंगराचे ठिकाणीं जरूर तर बोगदेही पाडावे लागतात. मोठ्या चढावाचे ठिकाणीं रस्ता तिरकस न्यावा लागतो. रेलवेच्या सडकांचे दोन्ही बाजूंनीं कठडा असणें चांगलें. तसेंच सुरक्षतेसाठीं तारायंत्र व ठिकठिकाणीं सांधे, उभे करण्याच्या खुणा आणि सडकांची नेहमीं तपासणी असणें जरूर आहे. अशा सडकांवरून आडवे जाणाऱ्या रस्त्यावर पहारा ठेवावा लागतो. समुद्रांतील रस्ते ध्रुव नक्षत्रावरून, होकायंत्रांवरून, नकाशावरून, दिसत्या किनाऱ्यावरून वगैरे समजतात. असे रस्ते चोर व लुटारूंपासून सुरक्षित असावे व जेथें किनाऱ्याजवळ वगैरे खडक असतील तेथें खुणा केलेल्या असाव्या. गाड्या व वहनांचीं जनावरें देशपरत्वें अनेक प्रकारचीं असतात. गाड्या ओढण्यास किंवा चालण्यास जितक्या हलक्या व मजबूद असतील तितक्या चांगल्या. जनावरें चांगलीं शिकविलेलीं, सशक्त व निरोगी असावीं; वाईट खोडी असलेलीं नसावीं. जनावरांस क्रूरपणानें वागवूं नये व त्यांच्या खाण्यापिण्याची वेळच्या वेळीं तजवीज करावी. मनुष्यें बसण्याच्या गाड्यांवर ऊन, पाऊस वगैरेंच्या निवारणाकरतां आच्छादन असावें. जं-

गलच्या व चोरांच्या भीतीच्या रस्त्यानें जमावानें व दिवसा प्रवास करावा तें चांगलें. अशा रस्त्यानें जाण्यापूर्वी रात्र पडण्याच्या अगोदर पुढील वस्तीच्या ठिकाणीं पोहचूं अशी चाल्रं लागण्यापूर्वी खात्री करून घ्यावी. धर्मशाळेंत किंवा उताराच्या जागेवर सावधान निजावें. जवळ जोखम असल्यास अपरिचितांच्या संगतीनें जाऊं नये. दूरच्या प्रवाश्यानें निदान एक दिवसापुरतें तरी खाण्याचें साधन नेहमीं जवळ ठेवावें, आपल्या जिवाची काळजी घेणारें एक तरी मनुष्य जवळ असावें व प्रवासास पुरतें द्रव्य असावें, जास्त जोखम जवळ असूं नये आणि असल्यास फार सावध रहावें. स्वतः स्वयंपाक करण्याचा संबंध असल्यास भांडीं, निजण्यापांघरण्याचें साधन, त्वरेनें नुकसान करणाऱ्या रोगांचीं औषधें वगैरे बरोबर असावींत. उंच प्रतीच्या प्रवाश्यास ऐपतीप्रमाणें सर्व व्यवस्था ठेवावी लागते. वाफेच्या गाडींतून प्रवास करणाराकरतां ठिकठिकाणीं पाणी व खाण्याचे पदार्थ मिळण्याची व लघ्वी आणि परसाकडची सोई असावी, स्त्रियांकरतां निराळी गाडी असावी, गाडी चालू होण्याचे व पोंचण्याचे वेळ व भाडें प्रसिद्ध केलेलें असावें, गाड्यांच्या दरवाजांस कुलपें लावून बंद केलेलीं नसावीं, गाडी पाहिजे तेव्हां उभी करण्याचें साधन असावें, आंत रात्रीं दिवे लावलेले असावे व ओढणाऱ्या पुढील गाडीच्या चाकांपुढें पुढील अडचण रुळावरून काढून टाकण्याचें साधन असावें. सारांश, मनुष्याच्या जिवाच्या सुरक्षतेचीं सर्व साधनें ठेवण्यांत फार काळजी घेतलेली असावी. पाण्यांतून प्रवास करावयाचीं वहनें अनेक प्रकारचीं असतात. कांहीं लांकडाचीं व कित्येक मोठीं

तीं लोखंडाचीं असतात. तसेंच लहान होड्या काठीच्या टेक्यांनीं अथवा वल्ह्यांनीं आणि मोठीं जहाजें शिडांनीं व वाफेच्या यंत्राच्या साह्यांनीं चालवितात. जहाज अथवा गलबत किंवा होडी लहान अथवा मोठी कशीही असो, त्यांत जास्तींत जास्त वजन कोठपर्यंत राहावयाचें तें ठरविलेलें असावें. लांबच्या प्रवासाच्या मोठ्या जहाजांत अन्नपाणी, औषधें, लघ्वी व परसाकडची वगैरे सर्व योग्य प्रकारच्या सोई केलेल्या असाव्या व प्रसंगीं उपयोगीं पडण्याकरतां लहान होड्या ठेवलेल्या असाव्या. जहाजांत आग न लागूं देण्याच्या संबंधानें चांगला बंदोबस्त असावा. त्याप्रमाणेंच माळ व मनुष्यें चढण्याउतरण्याकरतां बंदरांत सोईवार धक्के बांधलेले असावे. प्रवास करतांना बरोबर विश्वासू साथिदार असावे.

पत्रव्यवहार व बातम्या पोंचविणें—राजास या संबंधींची व्यवस्था ठेवणें भाग असून त्यांत रयतेचीही सोय होते. तारायंत्रांत विजेच्या साह्यानें बातमी फार त्वरेनें पाठवितां येते. टपालाचे एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं पोंचण्यासंबंधीं नियम ठरविलेले असावे व त्यासंबंधीच्या सोईचा फायदा सर्वांस घेतां यावा. टपाल सुरक्षित पोंचण्यासंबंधी चांगला बंदोबस्त केलेला असावा. व ज्याचा कागद अथवा पदार्थ त्यासच पोंचण्याविषयीं योग्य व्यवस्था केलेली असावी. मोठमोठ्या कारखानदारांनीं किंवा रेलवेवाल्यांनीं हीं कामें आपल्या सवडीप्रमाणें आपण केल्यास वावगें नाहीं.

न्याय व सभा—लोकांनीं आपल्यापैकीं योग्य पंच

निवडून अथवा शहाण्या लोकांनीं आपखुषीनें एकत्र जमून जी मंडळी तयार होते तिला सभा ह्मणतात. प्रत्येक सभेला अध्यक्ष असून लेखी कामाच्या व्यवस्थेकरतां व पैसा गोळा करून त्याची सभेच्या ठरावाप्रमाणें व्यवस्था करण्याकरितां निरनिराळे अधिकारी ठरविलेले असावे. अशा सभांनीं किरकोळ न्याय व इतर सार्वजनिक हितांचीं कामें करावीं, जसें राजास रयतेच्या हितानहितासंबंधी कळविणें, कलाकौशल्य व व्यापारोद्योग वाढविण्यास झटणें, अनेक प्रकारच्या उपयुक्त विद्या वाढविण्यास किंवा शिकविण्यास झटणें, सार्वजनिक हितांच्या कृत्यास व सद्गुणांस उत्तेजन देणें, प्रसंगीं राजास मदत करणें, वर्गण्या गोळा करणें, न्याय करणें, इत्यादि. सभासदांनीं सभेचें काम फुकट, निष्पक्षपातानें, स्वतःच्या हितानहिताचा संबंध न ठेवतां, शहाणपणानें, निरालसपणें व धैर्यानें केलें पाहिजे, आणि योग्य प्रकारें काम करणाऱ्या सभेस लोकांनीं शक्त्यनुसार मदत केली पाहिजे. लोकांनीं ठरविलेल्या पंचांची सभा असल्यास तिची मुदत ठरविलेली असावी व ती मुदत पुरी झाल्यावर नवीन सभासदांची नेमणूक व्हावी. सभेनें अध्यक्ष व अधिकारी आपणापैकींच योग्य सभासदांस बहुमतानें नेमावें व सभेचें सर्व काम बहुमतानें व्हावें. सभेचें काम चालू होण्यास सभेपैकीं प्रत्येक वेळीं निदान किती सभासद असले पाहिजेत तें ठरविलेलें असावें व सारखीं मतें होतील तेव्हां अध्यक्षांस एक मत जास्त देण्याचा अधिकार असावा. सभा भरविण्याच्या वेळा जरूरीप्रमाणें ठरविलेल्या असाव्या व विशेष जरूरीच्या वेळीं सभा पाहिजे तेव्हां भरविण्याचा अध्यक्षांस

अधिकार असावा. सभेस सभासदांनीं होईल तितकें करून वेळेवर हजर व्हावें. सभांकडून न होणारीं कामें ह्मणजे मोठमोठ्या गुन्ह्यांचे न्याय व बंदोबस्त, वरिष्ठ प्रतीचें शिक्षण व सोई वगैरे प्रकारचीं राजानें अधिकारी नेमून करविलीं पाहिजेत. न्यायाच्या संबंधांत सर्वांस निष्पक्षपातानें खरा न्याय मिळेल व एका ठिकाणीं आपला न्याय बरोबर झाला नाहीं असें वाटल्यास वरिष्ठ ठिकाणीं दाद लावतां येईल अशी व्यवस्था असली पाहिजे. तसेंच गरिबास न्यायाच्या संबंधांत कांहीं खर्च न पडेल अशी व्यवस्था जरूर असली पाहिजे. नादार मनुष्यास कर्जांतून मुक्त केल्यावर तो दार झाल्यास त्याचेकडून त्याचे कर्जाची रक्कम देवविली पाहिजे. उपजीविकेच्या साधनास हरकत पडेल अशी व शरीररक्षणास अत्यावश्यक जें सामान किंवा पदार्थ त्यांवर कर्जाची जप्ति असूं नये. चोरीचा माल सर्व किंवा कांहीं भाग न सांपडल्यास व चोराच्या मालमिळकतींतून त्याची किंमत वसूल करण्यासारखी असल्यास वसूल करून ज्याची चोरी झाली असेल त्यास किंवा चोरीचा माल खरोखर न समजून ज्यांनीं विकत घेतला असेल अथवा गहाण ठेविला असेल त्याची रक्कम त्यास दिली पाहिजे. मात्र चोराच्या मनुष्यांच्या शरीररक्षणास अत्यावश्यक असें राहूं दिलें पाहिजे. न समजून घडलेल्या गुन्ह्यास व स्वतःच्या रक्षणाकरतां भाग पडलेल्या गुन्ह्यास आणि अतिशय त्वेष येण्यासारख्या कारणावरून घडलेल्या गुन्ह्यास शिक्षा करूं नये. न्याय करण्याची पद्धत व शिक्षांचें मान राजानें ठरविलेलें असावें व त्या ठरावास अथवा कायद्यास अनुसरून न्याय व्हावा, तथापि

क्वचित् प्रसंगीं त्यांवरून खरा न्याय होण्यास अडचण आल्यास त्यांस सोडून खरा न्याय झाल्यास चांगलें. पांच वर्षांच्या आंतील वयाच्या मुलांस शिक्षा देऊं नये व बारा वर्षांच्या आंतील स्त्रीस आणि सोळा वर्षांच्या आंतील पुरुषासही शिक्षा देणें ती सुधारण्याच्या शाळेंतील द्यावी. गुन्हा कबूल करण्याकरतां शरिरास इजा देऊं नये. न्यायाधिशानें पंचांच्या मतानें न्याय करण्याची पद्धत असावी.

विद्या—ह्मणजे माहिती. ही दोन प्रकारची आहे. एक ज्ञान वाढण्याची व दुसरी अनेक प्रकारचे धंदे व कसब शिकण्याची. कोणत्याही प्रकारची विद्या शिकणें झालें तरी पहिल्यानें लिहिणें, वाचणें व व्यवहारास उपयोगी असे हिशेब करणें हें शिकलें पाहिजे. विद्या शिकण्याकरतां मुलास पांच वर्षांच्या वयानंतर शाळेंत पाठवावें व तोंपर्यंत त्यास घरींच हळू हळू त्याचेवर सक्ती न करतां मुळाक्षरें व अंक शिकवावे. पूर्वी लिहिल्याप्रमाणें स्त्रियांस विद्या शिकविणें ती पाकनिष्पत्ति, शिवणकाम, गायन व वैद्यकी इतकीच शिकवावी व या विद्या शिकविण्याच्या शाळा निराळ्या असून त्यांवर स्त्रियाच शिक्षक असाव्या व त्या सदाचरणी असाव्या, आणि ऋतुप्राप्तीनंतर स्त्रियांस शाळेंत पाठवूं नये; कारण व्यभिचाराच्या प्रतिबंधाची तजवीज राखणें जरूर आहे. स्त्रियांस काम ह्मणजे मैथुनेच्छा स्वभावतःच पुरुषाहून जास्त असते, अशी नसती तर बाळंतपणाच्या कष्टामुळें भिऊन त्यांनीं रतिसंभोग सोडल्यामुळें उत्पत्तीला हरकत पडली असती. काम जास्त असल्यामुळें अविचार व मोहही स्त्रियांत जास्त असतो आणि शक्ति व स्वाभाविकज्ञान

हीं पुरुषाहून कमी असतात, सबब स्त्रिया शूरत्वाचीं व ज्ञानाचीं कामें करण्यास नालायक असतात. या कारणामुळेंच त्यांस दुसऱ्या विद्या शिकविणें निरुपयोगी आहे. शारीरिक शक्तीविषयीं तर यच्चयावत् प्राण्यांतही नरांत मादीपेक्षां जास्त ताकद पहाण्यांत येते व अकलेच्या कामांतही त्यांस पुरुषांचे बरोबरीनें विद्या शिकविण्याची व मोकळिकीची ज्या देशांत चाल आहे तेथें सुद्धां तितकीच विद्या शिकलेल्या पुरुषांपेक्षां स्त्रियांचें जास्त तेज पडलेलें आढळत नाहीं. शिवाय गरोदरपणा व प्रसूतीच्या संबंधामुळें शूरत्वाचीं व इतर महत्वाचीं कामें त्यांचे हातीं असल्यास प्रसंगीं मोठी अडचण पडण्याचा संभव असतो. या सर्व गोष्टींचा चांगला विचार केल्यास स्त्रियांस विद्या शिकविणें, त्यांस वागणुकीची मोकळीक देणें व राजकारणांत आणि लष्करी कामांत त्यांस घेणें तें फारच विचारानें व अत्यल्प प्रमाणावर केलें पाहिजे, नाहीं तर लोकस्थितीचें फार नुकसान होण्याचा संभव आहे. तसेंच उंच जातीच्या मुलांकरतां व नीच (ह्मणजे ज्यास इतर जातीचे लोक स्पर्श करीत नाहींत) जातींच्या मुलांकरतां निरनिराळ्या शाळा असाव्या. पुरुषांस ज्ञानासंबंधी ज्या विद्या शिकवावयाच्या त्या येणेंप्रमाणें, शुद्ध लिहिणें व बोलणें, भूगोल, खगोल, इतिहास, नीति, कारभार चालविण्याचें किंवा करण्याचें (ह्मणजे पुष्कळ लोकांवर अधिकार चालविण्याचें) ज्ञान, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, शारीरशास्त्र, व परमेश्वरासंबंधी ज्ञान. आणि धंद्यासंबंधी किंवा कलाकौशल्यासंबंधी विद्या शिकविणें त्या, राजाचे कायदे व न्याय, मोजणी व बांधकामें वगैरे (इंजि-

नीयरिंग,) यंत्रशास्त्र, वैद्यकी, अनेक प्रकारचे धंदे व नौकेसंबंधी विद्या व लढाईची विद्या. या विद्या शिकविण्याच्या निरनिराळ्या शाळा असाव्या. धंद्याचें व कसबाचें शिक्षण देण्याकरतां मोठमोठ्या कारखान्यांतून व्यवस्था केलेली असावी व शिकणारांकडून होणाऱ्या कामाच्या अंदाजाप्रमाणें त्यांस शिकत असतां वेतन द्यावें. कसबाच्या सुधारणेसंबंधी वगैरे नवीन शोध लावणारांस बक्षिसें देण्याची व्यवस्था असावी. लहान गांवांतील मुलांस विशेष अभ्यास करण्याकरतां शहरांच्या ठिकाणीं संरक्षकशाळा असाव्या व अशा शाळांतून विद्यार्थ्यांच्या खाण्यापिण्याची व सर्व प्रकारच्या संरक्षणाची सोई असावी. खऱ्या गरिबांच्या मुलांस अशा शाळांत फुकट घ्यावें. जीं मुलें गुन्हा करणारीं व वाईट चालीचीं असतील त्यांस शिकविण्याकरितांही मोठमोठ्या ठिकाणीं सुधारकशाळा असाव्या, मात्र या शाळांत अनेक प्रकारच्या धंद्यांचें व कसबांचें शिक्षण देण्याची तजवीज असून मुलांवर विशेष सक्त नजर ठेवावी, त्यांस वेतन वगैरे देऊं नये व त्यांची शाळेंतील मुदत पुरी झाल्याशिवाय अथवा तीं सुधरल्याशिवाय त्यांस शाळेच्या आवाराबाहेर जाऊं देऊं नये. या सर्व प्रकारच्या शाळा रयतेनें स्थापन कराव्या व त्यांच्यानें तसें न होईल तेव्हां राजानें स्थापन कराव्या व जरूर तर खर्च रयतेपासून घ्यावा. विद्येचा अभ्यास करण्यास साथीदार असणें चांगलें. विद्येचा उपयोग करण्याचीं साधनें मुख्यत्वेंकरून तोंड व हात हीं होत. विषयप्रतिपादनाच्या संबंधांत तोंडाचा उपयोग बहुधा त्वरेचा असतो. विद्या ही उद्योगाचें मूळ होय. कांहींही करणें

झालें तरी तें पहिल्यानें शिकावें लागतें. चालणें, बोलणें, बसणें वगैरेही शिकावींच लागतात. भाषा तोंडानें बोलण्याच्या, खुणा करण्याच्या वगैरे अनेक प्रकारच्या असतात.

धान्याचा व पाण्याचा सांठा—अन्न अथवा चारा व पाणी हीं मनुष्यांसुद्धां सर्व प्राण्यांस अवश्यक असल्यामुळें अवर्षणाचे वेळीं उपयोग होण्याकरतां ज्याप्रमाणें धान्याचा व चाऱ्याचा ठिकठिकाणीं मोठा संग्रह केलेला असावा त्याप्रमाणेंच पाण्याचाही सांठा केलेला असावा. इतर प्रकारच्या सांठ्याहून पाण्याचा सांठा तर विशेष महत्वाचा आहे, कारण त्यापासून धान्य व चाराही उत्पन्न करतां येतो. पाण्याच्या सांठ्याकरतां मोठमोठे तलाव बांधलेले असावे व नद्यांस मोठमोठीं धरणें बांधलेलीं असून त्यांचें पाणी चोहोंकडे नहरांच्या किंवा नळांच्या योगानें फैलावलेलें असावें. नळांची तजवीज लोकवस्तीच्या सोईसाठीं व नहरांची शेतीच्या सोईसाठीं केलेली असावी. मोठमोठ्या नहरांतून लहान गलबतें व होड्या फिरूं सकल्यामुळें ते एक प्रकारचे सोईवार रस्त्यासारखेही उपयोगीं पडतात. नदीच्या ज्या ठिकाणापासून नहरास आरंभ होतो त्या ठिकाणीं मजबूद दरवाजा असावा. जेणेंकरून नदींत पाणी कमी झालें ह्मणजे नहरांतील पाणी परत जाऊं नये. ज्या ठिकाणीं नहरास आडवे नाले आले असतील तेथेंही नहरांतील पाणी नाल्यांतून निघून न जाईल अशी तजवीज असावी व आडवे रस्ते आले असतील तेथें नहरांवरून पलीकडे जाण्यास पूल किंवा होड्या असाव्या. नहरांच्या व तलावांच्या बाजूंस झाडें लावलेलीं असावीं, पण त्यांचीं पानें पाण्यांत न पडतील अशीं दूर असावीं. नहरांतून अथवा तला-

वांतून शेतीकरतां वगैरे पाणी घेण्यास जरूर तेथें मोटा अगर दुसरीं कांहीं जलाकर्षक साधनें असावीं. पाण्याचा सांठा उंच जागेवर असल्यास किंवा पाण्याची सपाटी उंच असल्यास नळांनीं पाणी आणून लहान तोट्यांनीं तें हवें तेथें व तसें खेळवितां येतें. धान्याच्या संग्रहाकरतां जमिनींत चुन्या विटांनीं बांधलेलीं मोठमोठीं पेवें किंवा जमिनीवर मोठमोठ्या वखारी अथवा कोठारें असावीं. त्यांचें अग्नि, पाणी, प्राणी व चोर यांपासून नुकसान होणार नाहीं अशी व्यवस्था असावी. दोन वर्षें सारखें अवर्षण पडलें तरी हरकत पडणार नाहीं इतका सांठा सर्व देशभर असणें अवश्य आहे. प्रत्येक तिसरे वर्षीं साठ्यांतील धान्य काढून नवें भरण्याची तजवीज असावी. राजांनीं बनेल तितक्या बाबतींत ऐन जिनसी कर घेऊन धान्याचे वगैरे मोठमोठे संग्रह ठेवणें सर्व प्रकारें हितावह आहे. धान्याच्या सांठ्याचें तोंड उघडल्यावर कांहीं वेळ उघडें ठेवल्याशिवाय लागलीच आंत उतरूं नये. धान्याप्रमाणें चाऱ्याचा सांठाही जमिनींत करून ठेवतां येतो.

पदार्थसंग्रहालयें व प्रदर्शनें— अनेक प्रकारच्या हुन्नराचे व कसबाचे पदार्थ, धान्यें, वस्त्रें, जनावरें, पक्षी, फळें, निरनिराळ्या रिवाजाचे व पेहेराव्याचे पदार्थ, खनिज पदार्थ, प्राणी, शस्त्रें, वगैरेंचे नमुने संग्रह करून ठेवावयाचीं स्थळें ठिकठिकाणीं असावीं, जेणेंकरून त्यांच्या अवलोकनांनीं मनुष्यांस पुष्कळ प्रकारची माहिती होईल. जे पदार्थ संग्रहालयांत नसतील व नसण्याचा संभव असेल ते अनेक ठिकाणांहून मिळवून दाखविण्याकरतां प्रदर्शनें करावीं. प्रदर्शनांत उत्तम ठरलेल्या पदार्थांच्या मालकांस बक्षिसें किंवा

पसंतीचे दाखले द्यावे, जेणेंकरून चांगले पदार्थ पाठविण्यास किंवा बनविण्यास उत्तेजन येईल. प्रदर्शनांतील जे पदार्थ संग्रहालयांत ठेवण्यास योग्य वाटतील ते विकत मिळाल्यास घेऊन तेथें ठेवावे. प्रदर्शनापासूनही पहाणाऱ्या मनुष्यांस पुष्कळ माहिती होण्याचा संभव असतो व त्यामुळें देशांत हुन्नर व कसब वाढतें व अनेक प्रकारच्या उद्योगामध्यें सुधारणा होतात. प्रदर्शनें जनावरांचींही करतात.

यात्रा, ठरींव दिवशीं व ठिकाणीं भरणारे बाजार, तीर्थें, क्षेत्रें,—देवस्थानें, सण व उत्सव यांचा उद्देश परमेश्वरभक्ति घडावी; व्यायाम व्हावा; परदेश पहाण्यांत यावा; रोगहारक उदकांनीं स्नानें घडावीं व तें पिण्यांत यावें; इष्टमित्रांच्या भेटी व्हाव्या; सत्पुरुष भेटावे; अनेक प्रकारचे पदार्थ खरेदी करण्यास व पाहण्यास सांपडावे; मिष्टान्नपान व्हावें; मनोल्हाद प्राप्त व्हावा; श्रमाची, धैर्याची व कसरतीची संवई व्हावी; सदुपदेश ऐकण्यास सांपडावे व ऐक्य वर्धमान व्हावें असा आहे. सदरहूपैकीं कोणत्याही निमित्तानें जेव्हां बाहेरील ठिकाणचे पुष्कळ लोक एकत्र होऊन कांहीं काळ रहाण्याचा संभव असतो तेव्हां जमावाचें ठिकाण स्वच्छ ठेवण्याविषयीं फार जपलें पाहिजे, पिण्याचें पाणीही स्वच्छ राखलें पाहिजे, चोऱ्या वगैरे न होऊं देण्याविषयीं बंदोबस्त राखला पाहिजे, मनुष्यांस राहण्यास विस्तृत जागा असली पाहिजे. त्वरेचा रोग उद्भवल्यास लागलीच औषधें देण्याची व्यवस्था असली पाहिजे व देउळांत वगैरे मनुष्यप्रकृतीस व मनुष्यांच्या शरीरास इजा न होईल अशी तजवीज ठेवली पाहिजे. तसेंच दीपोत्साह केला असेल किंवा दारूकाम

सोडणें असेल तर मनुष्यांस इजा न होईल अथवा आग न लागेल अशाविषयीं फार जपलें पाहिजे. अशा वेळीं व ठिकाणीं लोकसमाजापुढें बोधपर व नीतिपर व्याख्यानें होण्याची व्यवस्था असणें चांगलें. मुदतीच्या बाजारामुळें खेडेगांवांतील लोकांस चांगली सोय होते. सण, उत्सव, यात्रा वगैरेंची वेळ देशस्थिति व काळ यांस अनुसरून मनुष्यांस सुखावह होईल अशी बनेल तितकें करून ठरविलेली असावी.

नेहमीं होणारे रोग व स्वल्प उपाय—लौकर वैद्य अथवा डाक्तर मिळण्यासारखे नसतील तेथें उपयोग होण्याकरतां मुख्यत्वेंकरून याची येथें योजना केली आहे. रोग उत्पन्न होण्याचीं मुख्य कारणें हीं आहेत कीं, अस्वच्छ हवा, पाणी व खाणें वगैरेंचा उपयोग; मल, मूत्र, शिंक, ढेकर व गुदद्वाराचा वायु यांचा अवरोध; मनाला अति खेद व एकाएकीं मोठें भय किंवा आनंद; रात्रीस फार जागरण किंवा दिवसास निजणें; चालून येऊन ताबडतोब पाणी पिणें व त्यावर श्रम न होणें; शीत पदार्थांचा अति उपयोग व अनियमित आणि फाजील भोजन. तसेंच नेहमीं होणारे रोग ह्मणजे ताप, वायु, डोकें दुखणें, पडसें व खोकला, खरूज व गळवें, सूज, आंग भाजणें, कापणें किंवा जखम पडणें, विषारी प्राण्यांचे दंश, आंतड्याचे रोग ह्मणजे जुलाब, उलटी इत्यादि. कोणत्याही रोगावर औषध देण्यापूर्वी त्या रोगांत शीततेचें मान जास्त आहे किंवा उष्णतेचें जास्त आहे तें पाहिलें पाहिजे. शीततेचें जास्त असल्यास औषध उष्ण द्यावें व उष्णतेवर समधात द्यावें, फार

सीत देऊं नये. उष्ण वेळेस दुखण्याचा जोर जास्त होत असल्यास उष्णता व शीत वेळेस होत असल्यास शीतता जास्त आहे असें समजावें. शिवाय हातापायांची, अंगाची किंवा डोळयांची आग होणें, वारंवार पाणी पिण्याची इच्छा होणें, लघ्वी लाल किंवा पिवळी व थोडी होणें, घाम न येणें वगैरे लक्षणें उष्णतेचीं आहेत व याच्या उलट तीं शीततेचीं समजावीं. वरील रोगांवर या देशांत बहुधा सर्व ठिकाणीं मिळणारीं व स्वल्प आणि अनुभवशीर औषधें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

ताप—(शीत) क्विनाईन ताप नसेल तेव्हां देणें, किंवा किराईत व सुंठ उकळून त्याचा काढा देणें, अथवा गुळवेल, सुंठ व ओला चहा यांचा काढा देणें—(उष्ण) गुळवेल, सुंठ, आवळकठी, पित्तपापडा किंवा जेष्ठीमध यांचा काढा मध किंवा खडीसाखर घालून द्यावा. औषधांचें प्रमाण रोगाच्या मानाप्रमाणें कमजास्त घ्यावें.

वायु झाल्यास—(हा बहुधा शीततेपासून होतो) आल्याचा रस, तुळशीच्या पाल्याचा रस व शेगटाच्या सालीचा रस यांत पिंपळी व सोनें उगाळून पाजावा; किंवा ब्रांडी, कोलोनवाटरसारखा तीक्ष्ण व उष्ण पदार्थ पाजावा; दृष्टि फिरली असल्यास पाण्यांत थोडी लवंग उगाळून डोळयांत घालावी; तीक्ष्ण पदार्थ, निदान क्यारोसीन तेल (घासलेट), किंवा सुंठ उगाळून किंवा मोहऱ्या पाण्यांत वाटून कपाळास, हातापायांस व छातीस चोळून वीट किंवा कौल तापवून व फडक्यांत घेऊन त्यांनीं हे भाग शेकावे.

डोकें दुखणें—(शीत) सुंठ किंवा इतर एखादें तीक्ष्ण औषध लावावें व हुंगावें. (उष्ण) रक्तचंदन उगाळून लावावा, फुलांचा मधुर वास घ्यावा, टाळूवर खोबरेल तेल, बेलिया अथवा लोणी घालावें. अत्तरांचा मधुर सुवास घ्यावा.

पोट दुखणें—(हें उष्णतेनें होत नाहीं) जुलाब घ्यावा, ओवा खावा, उष्णोपचार करावे.

पडसें व खोकला—(हे सर्दीचे ह्मणजे शीततेचे विकार आहेत) उष्णोपचार करावे. कफावर ज्वर असला तरी काटेरिंगणीचा काढा मध घालून द्यावा. आल्याच्या रसांत पिंपळी, जेष्ठीमध व हिरडा उगाळून त्यांत थोडी मध घालावी व वारंवार हें मिश्रण चाटित जावें. अगदीं लहान मुलाचे कफावर नुसत्या मधांत हे तीनही पदार्थ थोड थोडे उगाळून चाटवीत गेल्यास चांगला गुण येतो. जेष्ठीमध व मिरीं एकत्र कुटून तें चूर्ण थोड थोडें वारंवार खात गेल्यासही कफ नाहींसा होतो.

खरूज, गळवें वगैरे—फुटल्यावर करंजेल तेल लावावें. गळू होऊं लागल्याबरोबर वर कळीचा चुना पाण्यांत भिजवून तो तितक्याच भागावर लावावा, तो सुकून पडल्यावर पुनः लावावा, याप्रमाणें वारंवार सात आठ वेळां लावला असतां बसतें. मुरम्या वगैरे पुटकुळ्यांवर जांभळीची बी पाण्यांत उगाळून लावावी, गालफ्यावर उंबराचा चीक कागदावर लावून तो कागद वर बसवून द्यावा. हीं सर्व बसविण्याचीं औषधें आहेत. पिकविण्याकरतां गव्हांच्या पिठाचें पोटीस जरूर तर दोन तीन वेळांही

लावावें ह्मणजे विशेष त्रास न होतां कोणतेंही दुःख पिकतें, सुजेवर सुंठ किंवा पुनर्नवा उगाळून लावावा. रक्तशुद्धीवर कडू निंबाची साल, चंदन व गुळवेल यांचा काढा द्यावा.

वाऱ्याची शिलक—कोणतेंही वायुहारक तेल लावून शेकावें. त्यानें गुण नच येईल तर ज्या ठिकाणीं मुख्य कळ असेल तेथें बिबा घालावा किंवा मोहऱ्या पाण्यांत गंधासारख्या वाटून तें मिश्रण चोळावें. बिबा दुःखावर येत नाहीं व आला तर अपकार करीत नाहीं, उलट जास्त गुणच करतो, त्यास लौकर बरें करण्यास टाकळ्याच्या पाल्याचा रस लावावा किंवा एखादें तेल लावावें. बिबा घालून त्यावर चुना घातल्यास तो येत नाहीं पण त्याचा जोर कांहींसा कमी होतो.

आंग भाजणें, कापणें व जखम पडणें—आंग भाजल्याबरोबर त्यावर शाई लावावी, फार भाजलें असल्यास मध लावावी, जखमेसारखें झाल्यास वर करंजेल तेल लावीत जावें. नाईट्यावर तुळशीच्या पाल्याचा रस लावावा. गजकर्ण व इसब यांवर करंजेल तेलांत रसकापूर व मुरदाड शिंग वस्त्रगाळ करून घालून लावीत जावें व प्रत्येक वेळीं हात चांगला धुवीत जावा. कारण हीं औषधें विषारी आहेत. हात कापल्यास किंवा जखम पडल्यास ताबडतोब कांहीं वेळ ती जागा हातांनीं दाबून धरावी ह्मणजे रक्त बंद होतें. मग त्यावर वारंवार चुना लावावा ह्मणजे वरी होते. पू होईल असें वाटल्यावर बिब्रा घालावा. पू झाल्यास व जखम झाल्यास

तिच्यावर करंजेल तेल लावित जावें. जखम झांकलेली असावी. ती रोज दोन वेळां गरम पाण्यांनीं साफ धुऊन व मग नरम कपड्यांनीं पाणी टिपून घेऊन नंतर वर लावणें तें लावावें. मोठ्या जखमेवर करंजेल तेलांनीं कापडाचा तुकडा भिजवून तो ठेवीत जावा. रक्त बंद करण्याकरतां ताज्या जखमेवर थंड पाण्याची धार धरणें किंवा थंड पाण्याची घडी ठेवणें कधींकधीं अनहितकारक होतें, ह्मणजे शीततेमुळें एखादे वेळीं धनुर्वात होतो. रक्त बंद झाल्यावर त्या ठिकाणीं कांहीं वेळ धक्का लागूं देऊं नये नाहीं तर पुनः रक्तश्राव होऊं लागतो व दोन तीन दिवस तें ठिकाण पाण्यांत भिजूं देऊं नये ह्मणजे पू होत नाहीं. जखम पडल्याबरोबर निखारा वाटून वस्त्रगाळ पूड करून आंत भरावी. आंग ठेंचल्यास फटकी व हळद उगाळून लावावी. जिभेस फोड आल्यास तूप लावावें. हिरडी दुखत असल्यास कापूर किंवा तंबाखू अथवा कोरांटीचा पाला चावून तो दाढेखालीं धरावा व पाणी सुटेल तें थुंकित जावें. बहुतेक मुखरोगांवर बाभळीचे सालीचा काढा करून त्यांत कात व फटकीचें चूर्ण घालून त्याच्या गुळण्या कराव्या.

विषारी प्राण्यांचे दंश—सर्प व त्याच्यासारख्या दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचा दंश झाल्यास जीव वांचविण्याकरतां दुःखास न भितां लागलीच विस्तवाचा निखारा दंशाच्या जागेवर दाबून धरून तेथील त्वचा व मांसाचा कांहीं भाग यांसुद्धां विष जाळून टाकावें, किंवा तोंडाला कांहीं इजा नसेल त्यानें (स्वतः दंश होणारानेंही) विष

जोरानें चोखून घेऊन थुंकून टाकीत जावें. दंश झाल्याबरोबर ताबडतोब याप्रमाणें चोखल्यास तें रक्ताबरोबर निघून येतें. चोखण्यापूर्वी दंशाचे ठिकाणीं जास्त थोडें कापून जरूर तर मोकळें करावें व थोडें वरही पाहिजे तर कापावें आणि दोनही ठिकाणीं दोनचार वेळ चोखावें. विष फार त्वरेनें वर चढत जातें व जेथपर्यंत चढलें असेल तेथपर्यंत केस उभे राहिलेले दिसतात. चढलेल्या ठिकाणाच्या वर दोन तीन जागीं आंग दोरीनें किंवा दुसरे कशानें घट्ट बांधावें व मग दोनतीन ठिकाणीं फासण्या टाकून किंवा कापून जरूर तर तुंबडीनें रक्त काढावें. वीष जास्त चढलें असलें व सदरहू उपायांनीं नच उतरलें तर वांझ करटोलीचा कांदा पाण्यांत उगाळून पाजावा किंवा महाळुंगाच्या बियांतील मगजाचें चूर्ण पाण्यांत घालून तें पाजावें. विष कांहीं अंशीं तुपासारखें असतें. तें रक्ताला लागलें तरच त्याचा जोर चालतो. नुसत्या त्वचेला लागल्यामुळें त्यापासून कांहीं होत नाहीं. चोखून टाकण्यामुळें त्याचा थोडा अंश कदाचित् पोटांत गेला तरी मनुष्य मरत नाहीं. विंचवाच्या विषावर रुईचा चीक किंवा काजऱ्याची बी उगाळून लावावी. माशा, मुंग्या वगैरे चावल्यास दंशावर घासलेट (केरोसीन तेल) चोळावें. साधें कुतरें चावल्यास वर चुना लावावा.

आंतड्याचे ह्मणजे गुदाचे रोग—अजीर्णापासून वगैरे जुलाब होऊं लागल्यास अफूंत केशर व कापूर मिश्र करून थोडी घ्यावी. आमांशावर इंद्रजव, हिंग, सुंठ, बडीशेप, जायफळ, व खसखस एकत्र कुटून गुळांत

गोळ्या करून दिवसांत दोन, तीन किंवा चार वेळ द्याव्या. ह्या अतिसारावर पण चालतात. मूळव्याधीमुळें वगैरे रक्त पडत असल्यास नागकेशर, लोणी व खडी-साखर एकत्र करून खावीं.

औषधाचें प्रमाण रोग्याचें वय व शक्ति आणि रोगाचा जोर याप्रमाणें कमजास्त असावें. काढा उघडा शिजवावा. औषधें नासकीं कुजकीं असूं नयेत. आल्याचा रस तें ठेंचून कपड्यांत घालून एका पात्रांत पिळून काढावा व थोडा वेळ राहिल्यावर वरचा ओतून घ्यावा, खालचा जाड पांढरा भाग घेऊं नये. रोगांत ज्या दोषांचें मान जसें अधिक उणें असेल तसें मिश्रणांतील औषधाचें मान अधिक उणें असावें. गर्भिणीला व अशक्ताला जुलाब व उलटी देऊं नये. उष्णतेनें मैल सुकला असल्यास जुलाब लागू पडत नाहीं असें होतें तेव्हां शीत जुलाब (गुलाबाच्या कळ्यांचा वगैरे) द्यावा. कफाच्या विकारावर उलटीचें औषध देणें बरें. उलटीच्या रोग्यास जुलाब द्यावा. देवी वगैरे स्पर्शजन्य रोग्याजवळ खाणें, पिणें व श्वासोच्छ्वास यांचा निकट संबंध ठेवणें चांगलें नाहीं. मस्तक थंड असों द्यावें पण शरिरांत शीततेपेक्षां उष्णतेचें मान अधिक असावें. खाणें, पिणें, लेणें वगैरे ऋतु-मानाप्रमाणें असावें. घाम आल्यावर उघड्या आंगावर हवा लागूं देऊं नये व स्नान करूं नये. अजीर्णावर पाणी पिणें फार उपयोगी आहे. उपदंशावर तोंड घेणें चांगलें, पाऱ्याचें औषध घेऊं नये. अशुद्ध व कच्चीं भस्में घेऊं नयेत. पोता-मुळें मोठमोठे जुने रोग बरे होतात. कोणत्याही रोगांत पथ्य चांगलें सांभाळावें. कोणालाही डाक्टर किंवा वैद्याशिवाय

इतरानें औषध देणें चांगलें नाहीं, पण इतरांनीं देणें झालेंच तर रोगी आपण सांगितल्याप्रमाणें पथ्यपाणी सांभाळील तरच द्यावें. फार अजारी असलेल्या रोग्यास डाक्टर अथवा वैद्याशिवाय अथवा चांगल्या अनुभवी जाणत्याशिवाय कोणींही औषध देण्याचें जोखम घेऊं नये. कोणत्याही रोगावर औषध घेण्याला उशीर लावूं नये, कारण अग्नीप्रमाणें तो वाढता असतो. वायूसारख्या त्वरित असाध्य होणाऱ्या रोगावर तर औषध तत्काळ पोंचलें पाहिजे. आनंद व खेद यांचा परिणाम रोगावर व शरिरावर होतो आणि एकदम त्यांची अतिशयोक्ती झाल्यास कधीं कधीं मरणही येतें. प्रयत्नांनीं ह्मणजे उपायांनीं रोग बरे होतात व अपमृत्यु टळतात. थंडीच्या निवारणाकरतां ऊन घेणें किंवा शेकणें हितावह नाहीं. ज्याला सवई नसेल व रात्रीं जागरण झालें नसेल त्यानें दिवसा निजूं नये. गुदाच्या ह्मणजे आंतड्याच्या रोग्यास निद्रा हितावह आहे. पावसाळ्याच्या आरंभीं व अखेरीस हवाबदल होत असल्यामुळें बहुधा रोगांचें प्राबल्य विशेष असतें ह्मणून अशा वेळीं बाधक पदार्थ न खाण्याविषयीं जास्त खबरदारी ध्यावी. वैद्य नुसता जास्त पढलेला असल्यापेक्षां विशेष अनुभवशीर असेल त्याचें औषध घेणें चांगलें.

शोध—खनिज पदार्थांचा, समुद्रगर्भींच्या पदार्थांचा, पूर्वीं ठाऊक नसलेल्या व नवीन जमिनीचा, तत्वांच्या सामर्थ्याचा, विजेसारख्या शक्तींच्या सामर्थ्याचा व अनेक प्रकारच्या यंत्ररचनेचा मनुष्यानें नेहमीं अधिकाधिक शोध लावीत असावें, जेणेंकरून मनुष्यसौख्य वर्धमान होण्याचा संभव असतो. अशा प्रकारचे शोध करणारांस बक्षिसें व जरूर ती

मदत देऊन उत्तेजन देणें हें राजा व प्रजा या उभयतांचें काम आहे. तसेंच अशा व इतर प्रकारच्या मोठ्या महत्वाचीं कामें करणारांस पदव्या देणें, मानपत्रें देणें, स्मारकें करणें व इतर प्रकारें बहुमान करणें अत्यावश्यक आहे. जेणेंकरून इतरांस तशीं कामें करण्याविषयीं ईर्षा प्राप्त होते, व त्यांपासून सार्वजनिक हित होतें. हीं कामें बहुधा सभांनीं करावीं.

राज्यरचना–परप्रांतांतील व परदेशांतील लोकांच्या हल्ल्यापासून व एकंदर मोठाले दंगे आणि लुटारूपणा यांपासून वगैरे बचाव होण्याकरतां राज्यव्यवस्था असणें जरूर आहे. जमिनीवरील व पाण्यांतील लष्कर ठेवणें, त्यांचेकरतां लढाईचें साहित्य तयार राखणें, तें ठेवण्याकरतां व प्रसंगीं लष्कराच्या आश्रयाकरतां जरूर तेथें किल्ले बांधणें, बातमी पोंचविण्याकरतां टपाल व तारायंत्र ठेवणें, लष्कर पोंचविण्याकरतां आगगाड्या, सडका वगैरे प्रकारची सोई आणि जहाजें ठेवणें, सदरहू लोकांस राहण्याकरतां इमारती बांधून त्या दुरुस्त ठेवणें, इतर राजांजवळ आपले वकील किंवा मुखत्यार ठेवणें, टंकशाळा स्थापणें आणि सरकार व रयत यांचे संबंधांतील वगैरे मोठाल्या गोष्टींचा जरूर तेव्हां न्याय होण्याकरतां न्यायाधीश ठेवणें हीं कामें मुख्यत्वेंकरून राज्यव्यवस्थेचीं आहेत; व या संबंधाच्या योग्य खर्चाकरतां जितकी रक्कम राजास लागेल तितकी रयतेनें दिली पाहिजे. परंतु अशी रक्कम जमवून देण्याचें रयतेकडून होत नाहीं ह्मणून ती वसूल करण्याची व्यवस्थाही राजास करावी लागते, सबब जमाबंदीखातेंही राजास ठेवून जितक्या रयतेच्या उत्पन्नाच्या बाबी कर बसविण्यास योग्य वाटतील तितक्यांवर खर्चाच्या

मानाप्रमाणें नियमित कर बसवून तो राजास वसूल करवावा लागतो. शिवाय रयतेस आपसांतील तंटेबखेड्यांचा बंदोबस्त व न्याय होत नसल्यामुळें राजास बंदोबस्ताकरतां पोलीस व लहान न्यायकोर्टेंही ठेवावीं लागतात. तसेंच रयतेच्या विशेष फायद्यासाठीं व सोयीसाठीं सडका वगैरे बांधणें, शाळा स्थापणें, खानेसुमारी, जननमृत्यूचें टिपण, औषधालयें, तुरुंग (कैदखाने) वगैरे गोष्टीही आपलेकडे घ्याव्या लागतात. आणि या सर्वांच्या आंगभूत इनामें, पेनशनें, राजाचा खानगी खर्च, वेधशाळा इत्यादि बाबीही येतात. या सर्वांस पुरेल इतकें द्रव्य राजास रयतेजवळून वसूल करावें लागतें. जितक्या बाबतींत कर ऐनजिनसी घेणें योग्य दिसेल तितक्या बाबतींत तो तसा घेणें चांगलें. त्यामुळें देशांत तशा मालाचा मोठा सांठा रहातो व प्रसंगीं फार उपयोगीं पडतो. यावरून राजानें वेतन घेऊन रयतेचें काम करावयाचें असल्यामुळें एकप्रकारें राजा रयतेचा नोकर ठरतो पण दुसऱ्या प्रकारें त्यानें रयतेचा सर्वप्रकारें प्रतिपाळ करावयाचा असून, रयतेस सद्वर्तन लावणें व तिला ज्ञानी करणें सर्वप्रकारें त्याचे हातीं असल्यामुळें तो रयतेचा धनी ठरतो. तथापि राजानें रयतेच्या मतानें राज्यकारभार चालविणें फार चांगलें, कारण अशा महत्वाच्या कामीं एकाच्या अकलेचा उपयोग होण्यापेक्षां अनेकांची अक्कल एकत्र होऊन तिचा उपयोग होणें चांगलें; पण अशी अक्कल एकत्र करतांना मतभेद होण्याचा संभव असतो सबब नेहमीं बहुमताचा उपयोग करणें प्रशस्त होय. शिवाय रयतेचा राज्यकारभारांत शिरकाव असल्यास रयतेस राज्याचा विशेष अभिमान रहातो

व प्रसंगीं ती राजास मनापासून मोठें साह्य करते. रयतेचें मत राज्यकारभारांत घेणें ह्मणजे तिच्यापैकीं वजनदार, शहाणे, अनुभवी असे लोक पंच किंवा सभासद ह्मणून निवडून घेणें होय. यांत तीन प्रकार आहेत. एक राजानें सभासद नेमणें, दुसरें कांहीं त्यानें नेमणें व कांहीं रयतेनें बहुमतानें निवडून देणें, व तिसरें सर्वच सभासद रयतेनें निवडणें. यांपैकीं तिसरा प्रकार सर्वांत उत्तम होय. जगांत मनुष्यें दोन प्रकारच्या समजाचीं असतात. पहिला समज राज्याचें वैभव व सामर्थ्य जितकें वाढेल तितकें प्रजेस हितावह व त्या संबंधांत प्रजेस थोडी प्रत्यक्षत्वानें घस सोसावी लागली तरी चिंता नाहीं, आणि दुसरा प्रकार ह्मणजे थोड्याशा वैभवाकरतां व सामर्थ्याकरतां रयतेस तसदी द्यावयाची नाहीं. तसेंच पहिल्या प्रकारचीं मनुष्यें परदेशीयांस व परधर्मीयांस परके समजून वागतात व दुसऱ्या प्रकारचीं त्यांस बनेल तेथपर्यंत तसें न समजतां वर्तन करतात. सारांश, पहिल्यापेक्षां दुसऱ्यांत दयाभूतपणा विशेष असतो. दुसरा प्रकार रयतेस व इतरांस प्रत्यक्षत्वानें विशेष सौख्यकारक असतो व पहिला तसा नसतो. पंचांत अथवा सभासदांत वरील दोन प्रकार असल्यामुळें दोन पक्ष होतात व ज्या पक्षाचें बहुमत असेल त्याप्रमाणें राज्यव्यवस्था चालते आणि बहुमताला अनुसरून त्या पक्षाचेंच प्रधानमंडळ असल्यास काम चालूं सकतें ह्मणून त्या पक्षाचे पुढारी लोकांचेंच प्रधानमंडळ असणें चांगलें. जेव्हां एका पक्षाचें प्रधानमंडळ व सभासद यांचें बहुमत असल्यामुळें एखाद्या महत्वाच्या कामाचा बिघाड झाला ह्मणून तो पक्ष बदलण्याविषयीं लोकमत होईल

तेव्हां निवडणूक पुनः होण्याविषयीं राजानें व्यवस्था करावी. पंचांच्या सभेनें ठरविलेल्या नियमाप्रमाणें सर्व राज्यव्यवस्था प्रधानमंडळांनीं राजाच्या हुकमांनीं चालवावी. सभेपुढें मांडावयाचे विषय राजाच्या हुकुमांनीं मुख्य प्रधानांनीं मांडावे. एखाद्या प्रधानांत व राजांत मतभेद झाल्यास प्रधानमंडळाच्या सभेंत बहुमतानें जसा ठराव होईल तसें करावें. प्रधानमंडळाच्या सभेचा अध्यक्ष राजा असून त्यास दोन मतें देण्याचा अधिकार असावा. मोठमोठ्या जोखमदार कामदारांच्या नेमणुका प्रधानमंडळानें राजाच्या हुकुमानें कराव्या. राजा दुर्वर्त्तनी असल्यास त्यास राज्य चालविण्यास नालायक समजावें. रयतेच्या मुखत्यारांच्या सभेचा अध्यक्ष मुख्य प्रधान असावा व तो बडे लोकांपैकीं एक असावा. या सभेंत बडे लोकांची व साधारण लोकांची अशा दोन पोटसभा असाव्या. बडे ह्मणजे थोर लोकांस रयतेनें निवडण्याची जरूर नसावी. एकंदरींत ठरविलेल्या नेमाप्रमाणें दोन पोटसभांत व प्रधानमंडळाचे सभेंत अशा तीनही ठिकाणीं बहुमतानें जें ठरेल तेंच राजानें, प्रधानांनीं व एकंदर राज्यांतील सर्व अधिकाऱ्यांनीं केलें पाहिजे असा नेम असावा. सभासद निवडण्याकरतां मतें देण्यास अधिकार कोणाला, सभा केव्हां भरावयाच्या, किती अधिकारापर्यंत नेमणुका कोणीं व कोणाच्या कराव्या वगैरे अनेक बाबतींचे नियम ठरविलेले असावे. व एकंदर सर्वांच्या अधिकाराची इयत्ता ठरलेली असावी. मुख्य प्रधानाची निवड दोनही सभा व राजा यांचेकडून व्हावी व त्या प्रधानानें आपल्या पसंतीप्रमाणें इतर प्रधान सभासदांपैकींच राजाच्या मंजुरीनें निवडावे. सर्वांचें मुख्य कर्तव्य

ह्मटलें ह्मणजे रयतेच्या व एकंदर राज्याच्या परोक्ष व अपरोक्ष फायद्याकडे लक्ष्य देऊन जें करावयाचें तें मोठ्या शहाणपणानें करणें. सर्व सभासद न बदलतां नुसतें प्रधानमंडळ बदलणें भाग दिसल्यास नवें नेमण्याविषयीं राजानें सभेस सूचना करावी व एकच प्रधान बदलावा असें राजास वाटल्यास ती गोष्ट प्रधानमंडळाच्या सभेनें करावी. कोणीं आपखुशीनें प्रधानपणा सोडल्यासही असेंच व्हावें. सारांश एकंदर सर्व व्यवस्था अशा धोरणावर केलेली असावी कीं राजास अगर दुसरे कोणासही एखादी गैरशिस्त किंवा अन्यायाची गोष्ट करतां येऊं नये, परंतु रयतेच्या फायद्याची व राजाच्या ऐश्वर्याची व सामर्थ्याची गोष्ट सर्वांस आपआपल्या अधिकाराप्रमाणें करतां यावी. राजाच्या व इतरांच्या अधिकारांची इयत्ता त्यांस शोभण्यासारखी ठरविलेली असावी आणि बहुमतावर सर्व अवलंबून असावें. नुसत्या रयतेच्या सभेनें व तिच्या अध्यक्षानें राज्य चालविणें उत्तम नाहीं, कारण अध्यक्ष बदलणारा असल्यामुळें राज्याच्या वैभवाबद्दल, सामर्थ्याबद्दल, मानापमानाबद्दल व शोभेबद्दल राजास स्वतः जितकी ईर्षा वाटेल तितकी त्याला वाटणार नाहीं; कसेंही असलें तरी स्वतःचें व दुसऱ्याचें यांत भेद रहातोच. बहुतकरून राज्यावर स्त्री असणें बरें नाहीं व असेल तेव्हां पुरुषाइतके अधिकार तिला बहुधा असूं नयेत. राजाच्या खानगी खर्चाकरतां नेमणूक ठरविलेली असावी. तसेंच प्रधानमंडळास व अधिकाऱ्यांसही पगार ठरविलेले असून परगांवांहून सभेस येणाऱ्या सभासदांस येण्याजाण्याचा वगैरे खर्च मिळावा. अपराध्यांच्या वगैरे न्यायाकरतां जे नियम अथवा का-

यदे करण्यांत येतील ते सर्वांस कळण्याकरतां प्रसिद्ध करावे, तथापि अज्ञान व गरीब वगैरे लोकांस ते पुरतेपणीं समजण्याचा संभव नसल्यामुळें राज्यांतील कायदे जाणणारे लोकांस न्यायालयांत कोणाच्याही वतीनें बोलूं द्यावें. जे लोक गरीबीमुळें वकिलांचा खर्च करण्यास खरोखर असमर्थ असतील त्यांस सरकारी वकील मिळावे. मोठमोठ्या हुद्यावर लायक, कुलीन, सद्वर्तनी व अनुभवी ह्मणजे लहान हुद्यापासून वाढलेले असे लोक नेमावे. अधिकाऱ्यांचा गैरशिस्तपणा, व रयतेचीं दु:खें आणि जरूरी प्रसिद्ध करण्याकरतां राज्यांत वर्तमानपत्रें असावीं व त्यांस वाजवी टीका करण्याची मोकळीक असावी. राजानें व अधिकाऱ्यांनीं स्वत: राज्यांत फिरूनही यांचा तपास ठेवावा. पण फिरण्यापासून रयतेवर जुलूम किंवा तिला त्रास होऊं नये. राजानें आपल्या देशाचा व्यापार परदेशाशीं जितका चालवेल किंवा वाढवेल तितका चालवावा अथवा वाढवावा व त्या संबंधानें तिकडे जाणारे लोक व माल याच्या संरक्षणाची योग्य व्यवस्था ठेवावी. तसेंच इतर देशांतील कलाकौशल्यें व सुधारणा शिकण्याकरतां हुशार लोक पाठवून त्यांचा फैलाव आपल्या राज्यांत करावा. शिवाय राज्यांत तलाव व नहर खोदणें, सडका व विहिरी बांधणें, जंगलांचा विनाकारण नाश न होऊं देणें, सर्व प्रकारची स्वच्छता ठेवणें वगैरे सर्व तऱ्हेचीं रयतेच्या हिताचीं कामें रयतेकडून जीं होण्यासारखीं नसतील अथवा रयत करणार नाहीं तीं राजानें करून त्यांकरतां लागणारा खर्च वसूल करावा. पण रयतेजवळून कोणत्याही संबंधाचा कर वसूल करतांना रयतेच्या सामर्थ्याकडे फार लक्ष्य ठेविलें पाहिजे. कर वसूल करण्यामुळें

गरीब लोकांच्या अन्नवस्त्राला किंवा शरीररक्षणाच्या कोणत्याही अवश्यकतेला हरकत पडेल असें होतां कामा नये. शरीराचें नुकसान करून विद्या वाढविणें, जंगलें राखणें, स्वच्छता व सोयीसंबंधी विशेष कामें करणें इ० अनुचित होय. सारांश इतर फायद्यापेक्षां रयतेच्या प्रत्यक्ष शरीरसंरक्षणाच्या फायद्याकडे राजानें विशेष लक्ष्य ठेविलें पाहिजे. राज्यरक्षणाकरतां राजानें कायमचें लष्कर जितकें कमी ठेववेल तितकें कमी ठेविलें पाहिजे व परराष्ट्राशीं लढाईचा प्रसंग आणवेल तितका कमी आणला पाहिजे आणि रयतेपैकीं आपल्या फायद्याच्या (राज्याच्या) संरक्षणार्थ आपखुषीनें लढण्यास जितके लोक तयार असतील तितक्यांस लष्करी शिक्षण देऊन ठेवण्याची तजवीज केली पाहिजे. अशांनीं लष्करी खर्चाचें काम जास्त वाढत नाहीं. किंबहुना उमेदींत आलेल्या मनुष्यांनीं दुसरा कोणताही धंदा करण्यापूर्वीं नियमित मुदतपर्यंत लष्करी काम शिकावें असा नियम असणें फार चांगलें. तसेंच लढाईसंबंधीचीं कलाकौशल्यें परराष्ट्रापासून जितकीं गुप्त रहातील तितकें चांगलें. राज्यांतील लायक लोकांस उत्तेजनार्थ पदव्या वगैरे देण्याबद्दल नियम ठरविलेले असावे. दुष्काळ, सांथींचे रोग वगैरे सारख्या वेळीं राजानें मनुष्यहानी न होऊं देण्याविषयीं फार जपावें. राजानें नाणीं पाडावीं आणि वजनें व मापें छापलेलीं वापरविण्याविषयीं जपावें, परराष्ट्रांतून येणाऱ्या मालावर कर घ्यावा, मोजणी वगैरे करवून देशाचे व समुद्राचे नकाशे काढवावे, नियमित वेळीं मनुष्यगणति (खानेसुमारी) करवावी, सार्वजनिक बागा व संग्रहालयें बांधावीं, मोठमो-

ठालीं लढाऊ वगैरे जहाजें व रेलवे करवाव्या, इत्यादी रय-
तेच्या अथवा राज्याच्या हिताचीं कामें राजानें करणें अवश्य आहे. स्वतः राजा व मोठाले अधिकारी हे दयाळू, शांत स्वभावाचे, कशाही प्रसंगीं धैर्य न सोडणारे व धूर्त असे असून परस्त्री व परद्रव्याभिलाष न करणारे असे असावे. आणि एकंदर अधिकारी व रयत यांनीं राजाजवळ व त्याच्या कामदाराजवळ जशास तसा योग्य मान देऊन प्रीतीनें व आज्ञाधारकपणें वागलें पाहिजे. राजाचे कायदे व कानू मनापासून मानले पाहिजेत ह्मणजे त्यांना अनुसरून चाललें पाहिजे. राजसभेला लायक सभासद अगत्यपूर्वक निवडून दिले पाहिजेत आणि जेव्हां ज्या प्रकारची मदत राजाला पाहिजे असेल तेव्हां त्या प्रकारची एकदिलानें दिली पाहिजे. राजकीय संबंधांत खानगी वैमनस्यें एका बाजूस ठेवून सर्वांनीं एक विचारानें जें करणें तें करावें. आपलीं दुःखें व अडचणी आणि अधिकाऱ्यांचें गैरवर्तन राजाच्या निदर्शनास अदबीपूर्वक आणण्याविषयीं झटावें. तसेंच राजा आणि त्याचे अधिकारी यांचा त्यांचे गुणांस अनुसरून प्रसंगानुसार सन्मान व उत्सव करावा. याप्रमाणें जेथें राजा, अधिकारी व प्रजा असतील त्या राज्याचा उत्कर्ष झाल्याशिवाय रहात नाहीं, राजाचें सामर्थ्य व ऐश्वर्य वाढतें आणि प्रजेची संपत्ती व सुख हीं वृद्धिंगत होतात. आणि जेथें राजा व प्रजा यांत एकोपा नसेल, राजा व अधिकारी रयतेच्या दुःखाविषयीं हयगय करणारे व प्रजेस पीडणारे असतील, व राज्यांत बंदोबस्त, विद्या, न्याय, नीति, शौर्य व बहुमताचा आदर नसून अनियमितपणा, क्रौर्य व स्वेच्छाचार अ-

सेल तें राज्य फार दिवस टिकणें कठीण असतें. आपल्या देशास लागून नाहीं अथवा ज्या देशांत आपल्या धर्माच्या लोकांची संख्या फार कमी आहे अशा देशावर राज्य असल्यास तें राज्य चालविण्यांत व संभाळण्यांत तर फारच जपलें पाहिजे. तेथील लोकांजवळ न्यायाच्या संबंधांत परकेपणा न ठेवतां त्यांस प्रीतीनें वागविलें पाहिजे ह्मणजे तेथील लोकही राजावर प्रीति करतात व त्यामुळें राज्याला बळकटी राहून राज्य दीर्घ काळपर्यंत रहातें. तथापि अशा ठिकाणच्या आणि अशा प्रकारच्या लोकांवर विश्वास न ठेवतां सावध वागणें चांगलें. परंतु नुसतें सावध वागून चालावयाचें नाहीं, त्यांच्या फायद्याकरतां झटलें पाहिजे व त्यांचें उत्पन्न वाढविलें पाहिजे. जेणेंकरून परराज्यसंबंधानें देशाबाहेर गेलेल्या अथवा जात असलेल्या संपत्तीमुळें त्यांस दुर्भिक्ष प्राप्त होऊन जिवांचा कंटाळा येणें भाग पडणार नाहीं. शिवाय त्यांस विद्या शिकवून ज्ञानी केलें पाहिजे ह्मणजे त्यांना प्रजाधर्म समजतो व दूरदर्शीपणा येऊन अविचार जातो. त्याप्रमाणेंच त्यांस विषाद न वाटावा ह्मणून न्यायांत भेदभाव ठेवूं नये. त्यांचे सभासद निवडून घेऊन नवीन कर बसविणें, कर कमजास्त करणें, कायदे करणें वगैरे संबंधांत त्यांचीं मतें घेण्याची व बहुमतानें ठराव करण्याची व्यवस्था ठेविली पाहिजे. मात्र ज्यांच्या हातांत मोठीं राजकारस्थानें व मोठीं जोखमाचीं कामें असे मोठमोठे कामगार आणि लष्करी मोठे हुद्देदार यांच्या नेमणुका, अशांचीं कामें व अशांच्या कामांवर देखरेख त्या सभासदांची नसावी. परक्या लोकांस असे जोखमाचे अधिकार देऊं नयेत. तसेंच लढण्याचें सा-

मान, किल्ले आणि लढाऊ जहाजें त्यांचे स्वाधीन नसावीं. बाकी सर्व संबंधांत परदेशांतील प्रजेस राजधर्मीय व राजदेशीय लोकांप्रमाणें हक्क दिले पाहिजेत. ज्यांच्या नेमणुका प्रजेच्या मुखत्यारांच्या (सभासदांच्या) हातांत नाहींत अशा वर सांगितलेल्या कामगारांस ते कारभार करीत असतील त्या परक्या देशांत स्थाईक राहण्याची परवानगी देऊं नये व त्यांच्या हुद्यांच्या मुदती नियमित व थोड्या काळाच्या असाव्या. पोष्ट, तार व रेलवेचीं मुख्य सूत्रेंही परक्या लोकांच्या हातीं देणें चांगलें नाहीं. परदेशांतील रयतेनेंही संरक्षण, ज्ञानप्राप्ति वगैरे गोष्टींकडे लक्ष्य देऊन असे अधिकार आपल्यास नसल्याविषयीं विषाद मानूं नये व राज्यकर्त्यांस मनापासून प्रसंगीं मदत करीत जावें. राजानें आपल्या कोणत्याही प्रकारच्या प्रजेवर कोणत्याही तऱ्हेचा जुलूम करूं नये व तिचा धर्म निराळा असल्यास त्या बाबतींत अगदी पडूं नये; सर्वांच्या धर्मांचें, हक्कांचें व मनुष्यघाताशिवाय इतर प्रकारच्या चालीरूढींचें रक्षण करावें. राज्यव्यवस्थेकरतां जीं माहितीचीं पत्रकें अथवा तक्ते तयार करावीं किंवा करवावीं लागतील तीं अगदीं मुदतशीर, पुऱ्या माहितींनीं भरलेलीं व खरी स्थिति दाखविणारीं असावीं. उद्योग न करणारास भिक्षा मागूं देऊं नये. संस्थानिक असल्यास त्यांच्यापासून नियमित खंडण्या घेऊन त्यांस बहुमानानें व स्नेहधर्मानें वागवावें. आपमतलबीपणामुळें कोणाच्याही वाजवी हक्कास बाध आणूं नये. देवस्थानाच्या व धर्मादाय वगैरे नेमणुका रीतीप्रमाणें चालवाव्या. एकंदरीनें

कोणाच्याही खऱ्या हक्काला व वाजवी स्वातंत्र्याला बाध न आणतां रयतेचें पालन पुत्रवत् करावें.

किरकोळ राजा अथवा प्रजेनें करावयाचीं कामें.

सार्वजनिक बागा, उद्योग करण्यास असमर्थ व ज्यांस पोषण्यास कोणी नाहीं अशांकरतां आश्रयालयें, वक्तृत्वास उत्तेजन देणाऱ्या सभा, छापखाने, चित्रशाळा, वाचनालयें, संग्रहालयें, कीर्तिमान् पुरुषांचीं स्मारकें व तशांस मानपत्रें देणें, ज्ञानवृद्धीपर ग्रंथ करणारांस बक्षिसें देणें, मनुष्यप्राण वांचविण्यांत साहस करणारांस व नवीन शोध करणारांस इनामें देणें, नीतिपर, लोकस्थितींतील न्यूनता दाखविणारीं नाटकें करविणें, गायनकलेस उत्तेजन देणें इ० इ०.

प्रकरण ४—विचार व माहिती.

सृष्टि, तत्वें व पृथ्वी—सृष्टि ह्मणजे जें डोळ्यानें दिसतें किंवा आहे ह्मणून भासतें त्या सर्वांचा समावेश ज्यांत होतो ती. ह्मणजे सूर्य, चंद्र, ध्रुव, इतर तारे, पृथ्वी, वायु, जल, उष्णता विद्युल्लता, चुंबकता इत्यादि सर्व पदार्थ, सर्व शक्ती व सर्वगुण मिळून सृष्टि होय. हिंदुशास्त्राप्रमाणें सृष्टि पंचतत्वमय मानिली आहे. तीं तत्वें अशीं, भू (जमीन), आप (पाणी), तेज (उष्णता), अनळ (वायू) व आकाश (पोकळी). यांचे गुण, रूप (घनपदार्थ), रस (प्रवाही पदार्थ), स्पर्श, गंध आणि शब्द. अन्य प्रकारानें पहातां उष्णता, विद्युल्लता, चुंबकता व कांहीं वायुरूप तत्वें यांयोगें सर्व चराचर बनलें आहे. सृष्टीचें मूळरूप ह्मणजे अति

शीततामय व अति अंधकारमय अतिसूक्ष्म प्राणी किंवा परमाणू असें आहे. कारण प्रत्येक दृश्य व अदृश्य पदार्थ अतिसूक्ष्म प्राणी किंवा परमाणूपासून बनला आहे असें पृथक्करणांनीं व इतर प्रमाणांनीं सिद्ध करतां येतें व अंधकार आणि शीतता बुद्ध्या उत्पन्न करावीं लागत नाहींत. प्रकाशाचें व उष्णतेचें तसें नाहीं. हीं दोनही उत्पन्न करावीं लागलीं आहेत किंवा करावीं लागतात. तसेंच सर्व सृष्टी रज, सत्व व तम ह्मणजे उत्पत्ति, स्थिती व लय (नाश) या तीन गुणांनीं व्याप्त आहे. ह्मणजे प्रत्येक पदार्थ अति मोठा किंवा अतिसूक्ष्म कसाही असो, तो उत्पन्न होऊन व त्याची धारणा अथवा अस्तित्व नियमित मुदतपर्यंत राहून मग तो नष्ट व्हावा असी एकंदर सर्व सृष्टीची व्यवस्था आहे. सृष्टींत नुसत्या डोळ्यानें दिसत नाहीं किंबहुना सूक्ष्मदर्शक यंत्रांनींही दिसण्यास कठीण अशांपासून आपल्या या पृथ्वीपेक्षां लाखोंपट मोठे असे पदार्थ आहेत. हे मोठे पदार्थ नक्षत्ररूपानें आपल्याला आकाशांत दिसतात. ते अतिशय दूर असल्यामुळें लहान दिसतात. ते असंख्य आहेत. कित्येक जे फार दूर आहेत ते डोळ्यानें मुळींच दिसत नाहींत. त्यां सर्वांवर प्राण्यांची वस्ती असून त्यांचें एकमेकांवर आकर्षण असल्यामुळें सर्वांस नियमित प्रकारची गति आहे व ते कांहीं आधाराशिवाय अंतरिक्षभ्रमण करीत आहेत. त्यांच्यापैकींच आपली पृथ्वी ही एक लहानसी वस्तु आहे. त्यांपैकीं जे मोठे ते स्वयंप्रकाश आहेत. त्यां सर्वांवर प्रकाश पडल्यामुळें ते अंधारांत चमकतात व प्रकाशाचें परावर्तन करतात. आकाश ह्मणजे जिच्या विस्तीर्णतेचा अंत नाहीं व जिचें खालचें आंग कोणतें व वरचें

आंग कोणतें तें मुळींच कळत नाहीं अशी अंधकार, शीतता व अतिसूक्ष्म जडचैतन्यरूप प्राणिमय जागा आहे. त्यांच अतिसूक्ष्म प्राण्यांचे ठिकठिकाणीं चित्रविचित्र मोठमोठे पदार्थ उष्णतेमुळें व आकर्षणामुळें बनलेले आहेत. अंधारांत प्रकाश मिश्र झाल्यामुळेंच आकाशाचा रंग दुरून निळा किंवा श्याम दिसतो. अंधकार, शीतता व अतिसूक्ष्म प्राणिमय जें तत्व त्यालाच ब्रह्म अशी संज्ञा दिलेली आहे व त्यांपासून बनलेल्या मोठमोठ्या पदार्थांना किंवा नक्षत्र अथवा ताऱ्यांना ते बहुतेकांशीं अंड्याप्रमाणें गोलाकार असल्यामुळें ब्रह्मांडें अशी संज्ञा आहे. एकंदर सृष्टिरचनेंत अमित ज्ञान, दीर्घोद्योग, महासामर्थ्य, चित्रविचित्रपणा व अतिनियमितपणा दिसून येतो. तसेंच उष्णतेपासून विद्युल्लता व गती आणि विद्युल्लतेपासून अनेक प्रकारचीं आकर्षणें उत्पन्न होऊन त्यांमुळें सर्व सृष्टि बनली असून त्यांमुळें व वायू ह्मणजे मुख्यत्वेंकरून गतीमुळें ती वर्तत आहे असें दिसतें. अति उष्णता अथवा ज्वलन ह्मणजे अग्नि. अग्नि तेजमय असतो. उष्णतेंत सामर्थ्य व गति मिळाली ह्मणजे तिला विद्युत्मय उष्णता अथवा विद्युल्लता ह्मणावें. तिचेमुळें आकर्षण उत्पन्न होऊन व त्याचा परिणाम ब्रह्मावर होऊन अनेक प्रकारचे दृश्य पदार्थ उत्पन्न झाले आहेत. गतीचें मुख्य रूप वायु आहे व तो प्रतिसारक आहे. आपण ज्या ताऱ्यावर रहातों त्याला पृथ्वी असें ह्मणतात. पृथ्वीचा आकार बहुतेकांशीं गोल आहे. ती सूर्याभोंवतीं एक वर्षांत लंबरूपानें फिरते, त्यामुळें कांहीं काळपर्यंत ती त्याचेपासून विशेष दूर रहाते. तेव्हां

तिचेवर व तिचे वातावरणांत शीतता जास्त झाल्या-मुळें हवेंतील वाफेचें पाणी होऊन पर्जन्य पडतो आणि विशेष शीततेमुळें बर्फाचा वर्षाव होतो, थंडी पडते आणि पाणी थिजतें. पाण्याची वाफ जमिनीजवळ राहिली असेल ती रात्रीं थंड होऊन दंव पडतें. पृथ्वीचें दक्षिणेकडील टोंक सहा महिने सूर्याकडे वांकडें होतें व दुसरे सहा महिने उ-त्तरेकडील टोंक वांकडें होतें, तेव्हां विरुद्ध बाजूकडे शीतता जास्त होऊन दिवस लहान होतो व सूर्य समोरील बाजूनें वांकडा गेलेला दिसतो. या प्रत्येक सहा माहीस अयन असें ह्मणतात. उन्हाळादि तीन काळ व वसंतादि ऋतू पृथ्वीच्या अशा गतीमुळेंच होतात. सूर्य पृथ्वीपेक्षां लाखों पट मोठा असून स्वयंप्रकाश व स्वयंउष्णतात्मक आहे; त्याचेपासून किरणद्वारें पृथ्वीस उष्णता व प्रकाश मिळतो आणि त्या-मुळें तिच्यांत विद्युज्जागृती राहून तिला गति व आक-र्षणशक्ति प्राप्त होते. तिला सूर्याच्या सभोंवतीं प्रदक्षणा करण्याला सूर्याचें तिच्यावरील आकर्षण कारण होय. त-थापि त्या आकर्षणामुळें ती सूर्यावर जाऊन न पडण्याला, तिच्या प्रदक्षणेचा मार्ग वर्तुळाप्रमाणें व एक बाजूस लांबट होण्याला व तिचें एक टोंक एकदां व दुसरें दुसऱ्यांदा सूर्या-कडे कलथें होण्याला तिचेवर असलेलीं इतर मोठीं आक-र्षणें कारण आहेत. पृथ्वी आपल्या सभोंवतींही फिरते व त्या फेऱ्याला जितका काळ लागतो तितक्याला एक दिवस ह्मणतात. ती ज्या बाजूनें फिरते तिला पश्चिम व जिकडे फिरते ती पूर्व होय. तिच्या फिरण्यामुळेंच सूर्य व सर्व तारे पूर्वे-कडून पश्चिमेकडे गेलेले दिसतात व तिच्या वार्षिक गतीमुळेंच

ते सर्व आकाशाच्या मानलेल्या बारा भागांचें (राशींचें) नियमित मुदतींत आक्रमण करीत आहेतसें दिसतात. सूर्याच्या बारा राशींतून फिरण्यामुळें वर्षाचे बारा महिने (सौरमास) होतात. सूर्याभोंवतीं फिरणाऱ्या ताऱ्यांस ग्रह ह्मणतात व ग्रहाभोंवतीं फिरणाऱ्यांस उपग्रह ह्मणतात. चंद्र पृथ्वीचा उपग्रह असून तो पृथ्वीभोंवतीं सुमारें २८ दिवसांत एक प्रदक्षिणा करतो, त्या मुदतीस चांद्रमास ह्मणतात. आपल्या सूर्यमंडळांत मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि व कित्येक दुसरेही ग्रह असून त्या सर्वांस उपग्रह आहेत. आपल्या सूर्यमंडळांतील ग्रहांचें मोठेपण व गति याबद्दल आपणास बराच शोध लागूं शकतो व त्यांचे आकर्षणाचा संबंध आपल्या पृथ्वीशीं असतो. इतर असंख्य दिसणाऱ्या ताऱ्यांविषयीं आपणास कांहींच पत्ता लागत नाहीं व लागावयाचाही नाहीं, कारण ते आपणापासून फारच दूर आहेत. सर्व ताऱ्यांत उत्तरेच्या बाजूचा ध्रुवाचा तारा पृथ्वीच्या कशाही गती असल्या तरी आपणांस नेहमीं बहुधा एक ठिकाणीं दिसतो. यावरून त्याच्या आकर्षणाचा संबंध आपल्या सूर्यमंडळाशीं व पृथ्वीशीं असला पाहिजे. सूर्य आपल्या स्वतःभोंवतीं व ध्रुवाभोंवतीं फिरतो व त्याचा स्वयंप्रकाश व उष्णता नियमित काळपर्यंत कमजास्त होतात. कमी होतात तेव्हां ग्रहावर जळप्रळय होतो. हवेंतील नियमित वाफेचें पाणी झालें ह्मणजे पर्जन्याचा व बर्फाचा वर्षाव बंद होतो. अधिक वाफ प्रळयाच्या समयाशिवाय खर्च होत नाहीं. वाफेंत दोन प्रकारचे वायू असतात, त्यांचें शीततेमुळें व विद्युल्लतेमुळें पाणी होतें आणि अधिक शीततेमुळें बर्फ बनतें. चंद्राचें आकर्षण पृथ्वीवरील सर्व प्रवाही पदार्थी-

वर असतें त्यामुळें समुद्रास भरती व ओहोटी होतात. भरतीचा एक मध्य चंद्रासमोर व दुसरा त्याच्या बरोबर विरुद्ध बाजूला असतो. आपल्या सूर्यमंडळांतील ग्रहांचे आकर्षणाचा संबंध परस्पराशीं असल्यामुळें इतर ग्रहांच्या गतीला अनुसरून पृथ्वीवर लहानमोठे चांगले वाईट फेरफार होतात व ते मनुष्यांच्या अथवा इतर प्राण्यांच्या सुखाला किंवा दुःखाला योगभूत होतात. पृथ्वीला दोनही प्रकारची फिरण्याची गति मुख्यत्वें विद्युल्लता व वायूमुळें प्राप्त झालेली असते. फिरण्याच्या झोंकामुळें व विद्युल्लतेमुळें तिला आकर्षणशक्ती असते व त्यामुळेंच ती आपल्यावरील सर्व पदार्थ जवळ ठेवते. तिच्या आकर्षणांत स्थिति स्थापकता आहे ह्मणजे तिचेवरील अथवा वायूच्या वेष्टणांतील पदार्थास पाहिजे तशी गति ठेवतां येते. तिच्या सभोंवतीचें वायूचें वेष्टन सुमारें २० कोस जाडीचें आहे व तें निरनिराळया गुणदोषांच्या वायूंनीं भरलेलें आहे. तसेंच इतर पदार्थांप्रमाणें वायूही जड व चैतन्यमय परमाणूंनीं भरलेला असून त्यास प्रवाहरूपगती आहे. पृथ्वी व सूर्य यांचे मध्यें चंद्र आल्यास सूर्यग्रहण व चंद्र आणि सूर्य यांच्या मध्यें पृथ्वी आल्यास चंद्रग्रहण होतें. ग्रहणामुळें आकर्षणांत जो किंचित् बाध येतो त्यामुळें पृथ्वीवर गुणदोषांत फेरफार होण्याचा संभव असतो. पृथ्वीचें वजन नेहमीं सारखें असावें लागतें, तसें नसल्यास तिची गती नेहमीं सारखी न राहिल्यामुळें अनर्थ होण्याचा संभव आहे, ह्मणून तिचेवरील उत्पत्तीचें मान वाढतें तेव्हां आकारमान घटतें. याप्रमाणेंच अंतरिक्ष भ्रमण करणाऱ्या सर्व ताऱ्यांचें वजन वगैरे जगांतील सर्व गोष्टी नियमबद्ध नसल्यास धा-

रणा होणार नाहीं हें उघड आहे. ब्रह्मांडांच्या किंवा सृष्टीच्या रचनेच्या संबंधानें स्वामी महाराज लिहितात तें येणेंप्रमाणें:—

चित्रविचित्र ब्रह्मांडें बनविलीं ॥ एकाहुनी एक विशेष ठरविलीं ॥ ऐके त्यांचीं नांवें बोलिलीं ॥ पूर्वापार तींच पैं ॥ २७ ॥ उपग्रह सर्वांहुनी सान ॥ त्यांहुनी श्रेष्ठ ग्रह पूर्ण ॥ तद्विशेष सूर्य जाण ॥ ध्रुव श्रेष्ठ त्याहुनी ॥ २८ ॥ ऐसीं ब्रह्मांडें अनंत ॥ या पोकळीमाजीं विराजीत ॥ धुमकेतूसमुदाय अमित ॥ दळणवळणाचें काम करिती ॥ २९ ॥ ध्रुव आणि सूर्य स्वयंप्रकाश ॥ इतर ते परप्रकाश त्यांस ॥ उष्णता आणि प्रकाश आसमास ॥ पुरविती हीं वरिष्ठ ब्रह्मांडें ॥ ३० ॥ ध्रुवमंडळांत अनेक सूर्यमंडळें ॥ त्याभोंवतीं स्वपरिवारें फिरती बळें ॥ उपग्रहांसह ग्रहरवी भोंवती फिरे ॥ उपग्रह ग्रहाभोंवतीं ॥ ३१ ॥ मंडळाचा जो कां मुख्य ॥ त्याचे आकर्षणअधिकार अतर्क्य ॥ मंडळांतील ब्रह्मांडावरी चालती, अशक्य ॥ कांहीं तेथें नसेची ॥३२॥ स्वयंप्रकाश ब्रह्मांडाचा अधिकार ॥ परप्रकाश ब्रह्मांडावरी चाले साचार ॥ मुदतशीर लया पात्र ॥ सर्व होतीं निश्चयें ॥ ३५ ॥ लहान मोठीं आकारमानें ॥ ब्रह्मांडांचीं परोपरीनें ॥ गती पृथक् पृथक् त्यांकारणें ॥ लाविलीसे जाण पां ॥ ३६ ॥ एकएका ब्रह्मांडाचे अधिकारांत ॥ नियमीत संख्या ब्रह्मांडें आहेत ॥ ऐसीं ब्रह्मांडें असंख्य परिवारासहित ॥ भ्रमती या पोकळीं ॥ ३७ ॥ तीं सर्व न-

क्षत्ररूपें दिसती ॥ अंधारांत प्रकाशें चमकती ॥ कित्येक दूर त्यांची आकृती ॥ न दिसे मनुष्यां नेत्रांनीं ॥ ३८ ॥ ब्रह्मांडांचें परस्परांवर ॥ एकमेकांचें चालतें आकर्षण साचार ॥ त्यांचे गतीप्रमाणें फेरफार ॥ ब्रह्मांडावरी होती ॥ ३९ ॥ ध्रुवमंडळें पृथक एकमेकांपासून ॥ परी ध्रुवध्रुवाचें परस्परांवरी आकर्षण ॥ एका ध्रुवाचे मंडळांतील सूर्य जाण ॥ संबंध एकमेकांशीं तयांचा ॥ ४० ॥ सूर्यमंडळांतील ग्रहांचा ॥ परस्परसंबंध असे साचा ॥ ग्रहमंडळांतील उपग्रहांचा ॥ त्याचपरी ॥ ४१ ॥ ध्रुवावरी मनुष्यवस्ती प्रथम ॥ तीं मनुष्यें सूर्यावरी मानवउत्पत्ति करिती हा नेम ॥ सूर्यावरील ते करिती उत्तम ॥ ग्रह उपग्रहावरी पैं ५८ ॥ तोची अनुक्रम इतर प्राण्यांशीं ॥ जडसृष्टी होय एकदांची ॥ ती अल्पप्रळयीं नष्ट न होय साची ॥ परी इतर सर्व क्षय ॥ ५९ ॥ एक एका सूर्यमंडळासाठीं ॥ ध्रुवावरी पृथक पृथक वस्ती ॥ सूर्यावरी तेच रिती ॥ ग्रह उपग्रहाकारणें ॥ ६० ॥ सूर्यावरील वस्ती जेव्हां जी निजत ॥ तेव्हां तिचे ब्रह्मांडावर अल्पप्रळय होत ॥ ध्रुवावरील सर्व वस्तीस मुळींच निद्रा नसे सत्य ॥ अल्प प्रळयीं सर्व क्षय ॥ ६१ ॥ ब्रह्मांड मात्र रहात ॥ पृष्ठावरील सर्व नष्ट होत ॥ तो अल्पप्रळय निश्चित ॥ महाप्रळयीं ब्रह्मांडक्षय ॥ ६२ ॥

प्रळय तीन प्रकारचे आहेत, नित्य प्रळय, अल्प प्रळय, व महाप्रळय. नित्य प्रळयांत भूकंप, वादळें, साथींचे रोग, आवर्षणें,

मृत्यू वगैरेंचा समावेश होतो. अल्प प्रळय ह्मणजे पृथ्वीवरील जमीन व पाण्याशिवाय सर्व नष्ट होणें आणि महाप्रळय ह्मणजे सर्व पृथ्वीच नष्ट होणें होय. हाच प्रकार इतर ब्रह्मांडांसही लागू आहे असें महाराजांच्या वरील लिहिण्यावरून दिसतें. उत्पत्तीचा क्रमही बऱ्याच अंशीं असाच दिसतो. जमीन व पाणी पहिल्यानें उत्पन्न होऊन त्यांपासून उद्भिजांची व पाण्यांतील प्राण्यांपासून जमिनीवरील प्राण्यांची आणि शेवटीं मनुष्यप्राण्याची उत्पत्ती झाली असावी असें दिसतें. पहिल्यानें मनुष्याचें एकच किंवा अनेक जोडपीं झालीं याविषयीं सध्यां पृथ्वीवर भिन्न मतें आहेत, तथापि वर्णोच्चारावरून व भाषासरणीवरून मनुष्याचे तीन चार वर्ग करतां येतात आणि बहुतेक सुधारलेल्या मनुष्यांचें मूळ एक असावें असें सिद्ध होतें. पृथ्वीचे पृष्ठभागावर तीन भाग पाणी व एक भाग जमीन आहे. पाण्याचे महासागर, सागर (समुद्र), उपसागर वगैरे व जमिनीचे खंड, देश, प्रांत वगैरे भाग कल्पिले आहेत. प्राण्यांत उद्भिज, अंडज, स्वेदज व प्राणिज असे भेद आहेत. उद्भिज ह्मणजे उगवणारे अथवा बीज, माती व पाणी यांमुळें झालेले प्राणी, अंडज ह्मणजे अंड्यांतून निघालेले, स्वेदज घामापासून होतात ते, व प्राणिज ह्मणजे योनिद्वारें जन्म पावलेले. यांपैकीं शेवटच्या कोटींत मनुष्यप्राण्याची गणना आहे. मनुष्यप्राण्यास इतरांपेक्षां बोलण्याचालण्याला जितका अवधि व कष्ट जास्त लागतात तितकें त्याचें ज्ञान व सुख अधिक असतें. यावरून दुःख अथवा खेद व सुख अथवा आनंद यांचें मान जगांत बहुधा सारखें असतें. प्राण्यांत दोन प्रकार आहेत.

पाळीप्रमाणें झालेले व भोक्तृत्वाकरतां झालेले; पण ही गोष्ट उद्भिजांस लागू नाहीं. एकंदर सर्व सृष्टींत अगर जगांत उत्पत्ति, स्थिति व लय हे गुण भरलेलेच आहेत; ह्मणजे उत्पत्ति होण्याविषयीं, नियमित काळपर्यंत धारणा होण्याविषयीं व शेवटीं नाश होण्याविषयीं प्रत्येक पदार्थांत व प्राण्यांत गुण व दोष ठेविले आहेत व त्यांचा इतका दृढपणा आहे कीं त्यांचा उच्छेद करणें महादुर्घट असतें. पदार्थ जड व चैतन्य असे दोन प्रकारचे जरी दिसतात तरी कांहीं प्रयोगामुळें जड पदार्थापासूनही चैतन्य उद्भूत होतें, यावरून सत्, चित् आणि आनंद या तीन गुणमय सृष्टि आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण सत्रूप जो जड भाग त्याचें चैतन्य बेमालूम असतें. जडांत चैतन्य उघड समजण्यासारखें असेल तेव्हां त्याला चित् असें ह्मणतात आणि चैतन्य विकास पावलेलें ह्मणजे प्रफुल्लित झालेलें असल्यास त्याच्या त्या स्थितीस आनंद ह्मणतात. अन्यरीतीनें पहातां सत् ह्मणजे पदार्थ मग तो दृश्य असो किंवा अदृश्य असो, चित् अथवा चैतन्य ह्मणजे चलनवलन व ज्ञान आणि आनंद ह्मणजे समाधान, सुख, प्रफुल्लितपणा, किंवा हर्ष. या तीन तत्वमय सर्व जग आहे. इतकेंच नव्हे, प्रत्येक वस्तूंत हीं तीनही तत्वें आहेत, मात्र जड पदार्थांतील चित् व आनंद हीं दोन तत्वें विशेष कारणाशिवाय उपलब्ध होत नाहींत. ज्ञानामुळें चैतन्य विकास पावतें ह्मणून आनंद ज्ञानमय आहे. ज्ञानाची उत्पत्ति चैतन्यापासून आहे. शिवाय सृष्टींत ह्मणजे जगांत विनाकारण कांहींच नाहीं, ह्मणजे ज्याचा उपयोग कांहीं नाहीं असें कांहींच नाहीं. इतर

लक्षावधि प्रकारच्या प्राण्यांपेक्षां मनुष्यप्राण्यांत ज्ञान अधिक असून उद्योगाचीं साधनेंही जास्त आहेत ह्मणून त्यानें इतर प्राण्यांचे स्वाभाविक गुण जे आहार, निद्रा, मैथुन, स्वातंत्र्य किंवा आनंद संपादणें किंवा उपभोगणें यांहून विशेष महत्वाचीं कृत्यें केलीं पाहिजेत तरच त्याच्या मनुष्यपणाचें सार्थक होतें.

नीति व पुनर्जन्म—नीति ह्मणजे मनुष्यांनीं जगास्तित्वाला युक्त अशी वागणूक करणें. नुसती जगांत धारणा होण्याकरतां जी चांगली वागणूक तिला राजनीति अथवा ऐहिक नीति ह्मणावें आणि जगांतील धारणेच्या अंतीं चांगली स्थिति प्राप्त होण्याकरतां जें सुवर्तन त्याला धर्मनीति किंवा पारलौकिक नीति असें ह्मणतात. दोनही प्रकारच्या नीतीविरुद्ध वागणें याला पाप ह्मणतात व त्यांना अनुसरून वागणें याला पुण्य ह्मणतात. नीतीचे अनेक प्रकार आहेत. जसें आपल्या सुखा अथवा अस्तित्वासंबंधी, आपल्या समाजाच्या अस्तित्वा अथवा सुखासंबंधी, एकंदर सर्व मनुष्यांच्या सुखासंबंधी आणि यच्चयावत् प्राण्यांसंबंधी. यांपैकीं पहिल्या प्रकारच्या नीतीला अनुसरून वागल्यास मनुष्यास पुण्य होत नाहीं पण न वागल्यास पाप होतें. बाकी इतर तऱ्हेच्या नीतीला अनुसरून वागल्यास अनुक्रमें अधिक पुण्य घडतें. याच अनुक्रमानें पातकाचेंही मान जास्त असतें. ह्मणजे समाजाच्या नफ्याकरतां अगर नुकसानाकरतां झटण्यापेक्षां एकंदर मनुष्यप्राण्यांसाठीं झटणें अधिक पुण्य किंवा पाप होय आणि एकंदर प्राण्यांसाठीं झटणें त्याहूनही विशेष आहे. सारांश परक्यास किंवा दुसऱ्यास सुख होईल असें

आपण वागणें ह्मणजे पुण्य करणें व आपणास अगर इतरांस दुःख होईल असें करणें ह्मणजे पाप होय. ज्यांच्या संबंधानें वागावयाचें त्यांची संख्या जितकी अधिक व त्यांचे देह जितके अधिक उपयोगी तितकें पाप किंवा पुण्य अधिक होतें. पापपुण्याच्या निरनिराळ्या जाती आहेत. जसें दुसऱ्याचें अन्न हरण करणें, पाणी हरण करणें, किंवा जागा, गृह, स्त्री, वस्त्रें, द्रव्य यांचा अपहार करणें, उपजीविकेचें साधन, विद्येचें साधन अगर इतर सुखाचें साधन हरण करणें, अथवा वाजवी हक्काचा अपहार करणें, शरिरास अथवा जिवास दुःख होईल असें करणें, फसविणें इ०. हीं सर्व पातकें असून मुख्य पातक उद्योग न करणें हें होय. याप्रमाणेंच पुण्याच्याही निरनिराळ्या जाती आहेत. ज्या जातीचें पाप अगर पुण्य करावें त्या जातीचेंच फळ मिळतें. पापाचें फळ दुःख व पुण्याचें फळ सुख ही मुख्य गोष्ट होय. कोणत्या तऱ्हेचें किती पाप अगर पुण्य केलें ह्मणजे त्या तऱ्हेचें किती दुःख अगर सुख मिळतें तें समजणें कठीण आहे. या संबंधानें महाराज ह्मणतातः—

पापपुण्याचे अनेक प्रकार ॥ सुखदुःखफळें क्रमें तदनुसार ॥ द्रव्यापासोनी द्रव्य मिळणार ॥ वस्त्रापासोनी वस्त्र पैं ॥ १९५ ॥ अन्नापासोनी अन्न मिळत ॥ जीव रक्षिल्या आयुष्य वाढत ॥ ऐसे प्रकार असती बहुत ॥ त्यांचा हिशेब सूर्यलोकीं ॥ १९६ ॥ आयुष्य कमी भोगणें विशेष ॥ ऐसें होतां पुढील जन्मीं शेष ॥ भोगणें पडे प्राणास ॥ सत्य जाणिजे ॥ १९७ ॥ भोक्तृत्वाचा

काळ निश्चित ॥ नियमानुसार होय सत्य ॥ अ-
ज्ञान ते मानिती असत्य ॥ मृत्युलोकीं ऐसी
स्थिती ॥ १९८ ॥ जन्मापासोनी सद्वर्तनी ॥
तो सदैव दुःखी राहे जनीं ॥ दुर्वर्तनी सुख भोगी
अनुदिनीं ॥ हीं चिन्हें पूर्वार्जिताचीं ॥ १९९ ॥

यावरून पापपुण्य जसें अनुक्रमानें करावें तसें तें अनुक्रमानेंच भोगावें लागतें. त्यामुळें कधींकधीं त्यांचीं फळें याच जन्मांत भोगण्याची पाळी येते ह्मणून वाईट वागणुकीचा वाईट व चांगलीचा चांगला परिणाम याच जन्मांत झाल्याचीं आपण उदाहरणें पहातों, पण याच्या उलट उदाहरणें जीं पहाण्यांत येतात तीं पूर्वजन्माच्या सुकृतांचीं किंवा दुष्कृतांचींच होत असें उघड दिसतें. शिवाय कांहीं कारणाशिवाय कोणालाही सुखी अगर दुःखी स्थितींत जन्म प्राप्त होत असेल अगर स्वाभाविक ज्ञान वगैरे कमजास्त असेल असें मानणें कधींही सयुक्तिक होणार नाहीं. याला पूर्वजन्मार्जिताचें कारण असलेंच पाहिजे. शिवाय पूर्वजन्माच्या कधीं कधीं शारीरिक खुणाही आढळतात व पूर्वजन्माची स्मृति असल्याचींही क्वचित् उदाहरणें पहाण्यांत येतात, यावरून पुनर्जन्म आहे हें सिद्ध होतें. तसेंच कितीही बिनचूक प्रयत्न केला तरी आगंतुक कारणांनीं सिद्धि प्राप्त न होणें, कांहीं प्रयत्न न करतां मोठी फलप्राप्ति होणें, मोठ्या शहाणपणानें शरीर सांभाळणारास अकालीं मृत्यु येणें आणि अज्ञानी किंवा शरीररक्षणाची पर्वा न करणारे दीर्घायुषी असणें हीं पापपुण्याचीं फळें होत. पापपुण्यें कायिक व वाचिक अशीं दोन प्रकारचीं आहेत. ज्या पातकाविषयीं योग्य राजदंड झाला असेल

त्याबद्दलचें भोक्तृत्व नष्ट होतें. सजातीय पापपुण्याची वजाबाकी होते. मनुष्याकडून पापपुण्य न समजून झालें तरी भोक्तृत्व सुटत नाहीं. या संबंधांत महाराज ह्मणतातः—

न समजतां झालें पातक ॥ तरी दोष न सुटे देख॥ परी जाणून तें आचरतां अविवेक ॥ चतुर्गुण दोष घडे ॥ ८३ ॥ सूक्ष्म जीव न समजती न दिसती नेत्रांनीं ॥ स्वाभाविकपणें मरती अनुदिनीं ॥ तें न घडे पातक मानवा लागुनी ॥ पापसंबंध वरिष्ठ जिवा ॥ ८४ ॥

न समजतां झालेलीं पातकें देव क्षमा करूं शकतात. पण समजून झालेलीं परमेश्वरकृपेशिवाय क्षमा होत नाहींत, परंतु उभय प्रसंगीं पश्चात्ताप होऊन योग्य उपासना व सुनीतीचें अवलंबन झालें पाहिजे. मनुष्यास शरीररक्षणाकरतां अन्य उपाय असतां हत्या करणें हें पातक होय, तथापि मनुष्यास इजा करणारे प्राणी वधिल्यास पातक होत नाहीं. युद्धांत घडलेल्या हत्येबद्दल व आपला अगर दुसऱ्याचा जीव वांचविण्याकरतां भाग पडलेल्या हत्येबद्दल पातक घडत नाहीं. कधीं कधीं पुष्कळ प्राण्यांच्या प्राक्तनाची ह्मणजे कृतींची साम्यता असते. त्यामुळें लढाई, दुष्काळ वगैरे प्रसंगासारख्या परिणामाला ते पात्र होतात. पुष्कळ पुण्याकरतां थोडें पातक केल्यास चिंता नाहीं. स्त्रियांचे पातिव्रत्यरक्षणाचे कामीं हत्या करणें भाग पडल्यास त्याबद्दल पातकापेक्षां पुण्य जास्त घडतें. ज्या जिवाची हत्या होईल तो जीव जितका मोठा किंवा विशेष उपयोगाचा अगर महत्वाचा असेल तितकें पातक अधिक

?? Very doubtful mo[ra]lity

लागतें. पाप दुसऱ्याचे सांगण्यावरून केलें असल्यास उभयतां पापाला अधिकारी होतात व पुण्य धर्माच्या संबंधांत ज्याचा माल त्याला विशेष जोडतें. अशा अनेक प्रकारांत पाप अगर पुण्य वांटलें जातें. तसेंच ज्याच्या हातीं मनुष्य वागविण्याचें असतें त्यालाही हाताखालील मनुष्याच्या कर्तृत्वाचें फळ भोगावें लागतें; जसें राजा व अधिकारी, नवरा बायको, धनीनोकर, गुरुशिष्य वगैरे. मृत्युसमयीं मोठी आशा अथवा द्वेष राहिल्यामुळें पिशाच्चयोनि प्राप्त होते. याविषयीं स्वामी महाराजांचा लेख असा आहे:—

अंतीं आशा द्वेष रहातां साच ॥ पिशाच्चयोनी प्राप्त त्यास ॥ कर्मानुसार छळी शत्रूस ॥ अन्यथा कांहीं न चलेची ॥ १८७ ॥ पुण्यजोरें सुटे पिशाच्चयोनी ॥ अथवा शत्रुत्व जेव्हां जाय सरोनी ॥ पुण्य पोंचतें संकल्पांनीं ॥ अन्य जन्मींही ॥ १८८ ॥ कोणी अक्षयीं पुण्यसत्रें स्थापिती ॥ अन्नसत्रें औषधालयें ज्या रिती ॥ चालू पुण्याचें फळ आत्म्या मिळे निश्चितीं ॥ ज्या स्थळीं तो असे ॥ १८९ ॥ पाप पुण्य संकल्प करून ॥ देतां येतें दुसऱ्या लागून ॥ यावरून धर्मविधी क्रिया कर्में जाण ॥ व्यर्थ नसती धर्मशास्त्रीं ॥ १९० ॥

कित्येक मुळींच नपुंसक असतात, कित्येक पुरुषावयव असून पुरुषत्वहीन असतात, कित्येक स्त्रिया दाढी मिशा असणाऱ्या किंवा पुरुषाप्रमाणें सर्व कामें करणाऱ्या असतात, यावरून असें दिसतें कीं पातकामुळें पुरुष अगर स्त्रीस विपरीत स्थिति प्राप्त होते, नाहीं तर नराचा आत्मा सदैव नर

व मादीचा मादीच रहातो, त्यांत जन्मांतरींही बदल होत नाहीं. तसेंच नरमादींच्या जोड्या अथवा दंपत्यें ठरलेलीं असून विशेष प्रसंगीं मात्र त्यांत फेरबदल होतो. कधींकधीं पातकामुळें मनुष्यांस नियमित काळपर्यंत इतर प्राण्यांचे जन्म घ्यावे लागतात. इतर प्राणीही क्रमाक्रमानें मनुष्यजन्मापर्यंत पोंचतात. सबब जगांत मनुष्यसंख्या नेहमीं वाढती असते. या सदरांतील प्राणी या शब्दांत उद्भिज प्राणी जसें झाडें, गवत वगैरे यांचा समावेश होत नाहीं असें समजावें. उद्योग परमेश्वरप्रिय असल्यामुळें दृढ प्रयत्नांनींही प्राक्तनांत कांहींसा फेरबदल होतो ह्मणून अपायास उपाय करावा. मनुष्यविक्रय व इच्छेविरुद्ध जुलुमाची नोकरी नीतीचे विरुद्ध होत.

धर्म व ज्ञाती—ज्या ग्रंथांत पारलौकिक अगर पापपुण्याविषयीं ज्ञान व नीति सांगितलेली असते त्यांस धर्मशास्त्रें असें ह्मणतात आणि त्या शास्त्रांना अनुसरून जी वागणूक तो धर्म होय. पारलौकिक ज्ञानांत परमेश्वराच्या संबंधानें जीं मतें हल्लीं अनेक धर्मशास्त्रांत उपलब्ध आहेत तीं मुख्यत्वें तीन प्रकारचीं आहेत. तीं अशीं:—द्वैत ह्मणजे परमेश्वर निराळा व सृष्टि निराळी, अद्वैत—परमेश्वर व सृष्टि सर्व एकच आणि द्वैताद्वैत ह्मणजे परमेश्वर निराळा असून सृष्टि पण परमेश्वररूपच आहे. परमेश्वर मुळींच नाहीं असें ज्यांचें मत आहे त्यांचा धर्म ह्मणजे फक्त ऐहिक नीति; पण असे लोक भूत, भविष्य व दूर अंतरावरच्या गोष्टी कळणें वगैरे सारख्या ज्ञानाच्या अस्तित्वाविषयीं अगदीं अजाण असतात. धर्मशास्त्रांत परलोक अथवा देवाची भक्ति या संबंधाच्या नीतीशिवाय व पापपुण्यासंबंधी अगर सुखदुःखा-

संबंधीच्या नीतीशिवाय शरीरसुख व सोईसंबंधीही नीती सांगितलेली असते. जसें विवाह, जन्म, मृत्यु, तक्ताभिषेक वगैरे संबंधाचे विधी, पेहेराव्याच्या वगैरे रीती इत्यादि. शिवाय इतर प्रकारच्याही कित्येक चालीरीतींचा समावेश, त्या धर्मशास्त्रांत सांगितलेल्या नसल्या तरी धर्मांत होतो. कोणत्याही धर्मातील मनुष्य आपल्या धर्माला अनुसरून देवाची भक्ति करीत असल्यास व नीतीनें वागत असल्यास परमेश्वर सर्वसाक्ष व सर्वव्यापी असल्यामुळें ती त्याला पोंचते. हल्लीं पृथ्वीवर मुख्य धर्म हिंदु (वेदोक्त), बौद्ध, ख्रिस्ती, महमदी, हिब्रू व अग्निपूजक असे आहेत आणि यांत अनेक पंथ आहेत. बहुतेक सर्व धर्मातील नीति थोड्या बाबती शिवाय करून सारखी आहे. चालीरीती व परमेश्वरभक्तीचे मार्ग यांत परस्परांत बराच निराळेपणा आहे. धर्माचे लोकांची संख्या जितकी जास्त असेल तितकी धर्माला ह्मणजे धर्मानुयायांच्या सुखाला अधिक बळकटी असते. कोणालाही धर्मांतर करण्याचें कांहींच कारण नाहीं, कारण खऱ्या नीतीनें वागल्यास पाहिजे त्या मार्गानें परमेश्वरभक्ति केली तरी फलप्राप्ति सारखीच असते, परंतु अज्ञान लोक हें समजत नाहींत, ह्मणून सुज्ञांनीं त्यांचा समज पाडणें चांगलें. धर्मांत कितीही पंथ असोत व धर्म कसाही असो धर्माच्या सर्व लोकांचें ऐक्य असल्यास तो धर्म ऊर्जितदशेप्रत पोंचतो. धर्मशास्त्रांत व धर्मरिवाजांत कालमानाला अनुसरून मनुष्यांस इहपरलोकीं सुख होईल अशा सुधारणा करणें चांगलें; त्यांत इहलोकच्या सुखाकडे प्रथम लक्ष देणें बरें. धर्मसंबंधाच्या दे-

वळांची व्यवस्था राजाकडे किंवा नेमलेल्या मंडळ्यांकडे असावी व देवळांच्या उत्पन्नांतून धर्मोपदेशक व उपाध्यायांचा खर्च चालावा आणि भिक्षागृहें चालावीं. जेथें उपाध्यायांचा खर्च अशा प्रकारें चालत असेल तेथें त्यांनीं धर्मविधि करण्याबद्दल त्यांस विशेष कोणाकडून कांहीं मिळूं नये. असें जेथें नसेल तेथें उपाध्यायांस जें मिळावयाचें त्याविषयीं नियम ठरविलेले असावे व ते ठरवितांना गरिबाकरतां व श्रीमंताकरतां निरनिराळ्या प्रती ठरविलेल्या असाव्या. देवस्थानामार्फत चाललेल्या भिक्षागृहांत खऱ्या साधुसंतांस आणि अनाथांस अन्नवस्त्र मिळावें. कार्यप्रसंगाच्या व इतर मर्जीस येईल त्या वेळीं जी कोणास कांहीं धर्मादाय मदत देणें असेल ती अशा प्रकारें व्यवस्थित चाललेल्या देवस्थानाकडेसच द्यावी. पाहिजे त्यांनीं भिक्षा मागणें व जो मागण्यास येईल त्यास ती देणें ही रीत चांगली नाहीं; यामुळें आळशी, कैफी व लबाड लोकांस उत्तेजन मिळून एकंदर लोकस्थितीचें नुकसान होतें. खरे साधुसंत ह्मणजे नीतीनें वागून व संसारसुखाचा त्याग करून परमेश्वरभक्तींत लीन राहणारे. खरोखर रीतीनें पहातां वर्ण अथवा जाती दोनच असाव्या, एक घाणीचें काम करणारी व दुसरी तसें न करणारी, व त्या प्रत्येकांत श्रीमंत व गरीब असे दोन भेद असावे. जातींचा परस्परांशीं अन्नव्यवहार व विवाहसंबंध होऊं नये, पण पोटभेदांचा परस्पर अन्नव्यवहार होण्यास हरकत नाहीं, मात्र एक पंक्तीस होऊं नये व विवाहसंबंध होऊं नये. ज्या धर्मांत अगर पंथांत याहून निराळ्या प्रकारची वर्ण अथवा ज्ञातिव्यवस्था असेल त्यांत गरीब व श्रीमंतांचा (उंचनीच) भेद वर सांगितल्याप्र-

माणें असावा आणि स्थितीला व वागणुकीला अनुसरून एका भेदांतून दुसऱ्यांत किंवा एका जातींतून दुसरींत घेण्याची अथवा घालण्याची योग्य व्यवस्था असावी. हिंदु धर्मांतील ज्या जातींतील लोकांस स्पर्श करावयाचा नाहीं त्यांनीं धर्मांतर केल्यावर त्यांस स्पर्श करण्यास हरकत मानावयाची नाहीं व यामुळें त्यांनीं आपली धर्मसंख्या कमी करून घ्यावयाची आणि या गोष्टीस कांहीं उपाय करावयाचा नाहीं ही केवढी मोठी आश्चर्याची व अज्ञानाची गोष्ट आहे! ज्ञातींत, ज्ञातिभेदांत, व पंथांत परस्पर वैमनस्यांनीं वागणें मोठें अनहितकारक आहे. ज्या धर्मांत पुष्कळ ज्ञाती असून परस्पर अन्नव्यवहार व विवाहव्यवहार होत नाहीं अशा धर्मांत निरनिराळ्या जातींच्या विवाहाशिवाय होणाऱ्या संगमामुळें झालेल्या संततीच्या अनेक नव्या जाती उत्पन्न होण्याचा संभव असतो व तशा अनेक जाती उत्पन्न झाल्यामुळें धर्मैक्याला बाध येतो हें चांगलें नाहीं. सबब एका जातींतून वर्तणुकीला व स्थितीला अनुसरून दुसऱ्या जातींत घेण्याची चाल असणें फार फायदेशीर आहे. कोणी परधर्मी खुशीनें आपल्या धर्मांत येऊं लागल्यास त्यास धर्मांत घेण्याची व्यवस्था असणें हें फार चांगलें. प्रळयाच्या समयीं सर्व एक धर्म व प्रजासत्ताक राज्याचें प्राबल्य असण्याचा संभव असतो.

आनंद—पूर्वी सृष्टि या सदरांत सांगितलेंच आहे कीं, आनंद सर्व चैतन्यसृष्टींत भरलेला आहे. सर्व प्राण्यांस तो हवासा वाटतो व त्यामुळें प्राणी विकासित व प्रफुल्लित होतात आणि त्याविरहित चैतन्य विरस होतें, इतकेंच

नाहीं, आनंदाशिवाय चैतन्य बहुधा टिकत नाहीं. चैतन्य जडमय आहे आणि चैतन्य व आनंद यांचा अगदीं जोड आहे, ह्मणजे चैतन्य आनंदमय व आनंद चैतन्यमय असतो. सुखामुळें चैतन्य टिकतें व आनंद उत्पन्न होतो. सुख ह्मणजे चैतन्याच्या धारणेला व विकासाला ज्या गोष्टींची अथवा पदार्थांची अवश्यकता तें. सुखाचे अथवा धारणेचे अवश्यक पदार्थ व साधनें ह्मणजे उद्भिजांचे मुळाशीं मृत्तिका व पाणी, वाढण्याला मोकळी व सोयीवार जागा आणि पाहिजे तशी व तितकी हवा व उष्णता. इतकें मिळाल्याबरोबर चैतन्य पूर्णत्वास येऊन पानें, फुलें व फळें यांमुळें विकासित किंवा प्रफुल्लित होतें. इतर प्राण्यांसही खाणें, पिणें, स्वातंत्र्य व पाहिजे तशी जागा मिळाल्यास ते नाचणें, उड्या मारणें, तऱ्हेतऱ्हेचे शब्द करणें अथवा गाणें, रतिसंभोग करणें वगैरे अनेक प्रकार आपल्या विकासित चैतन्योद्भवित आनंदाचे करतात अथवा केल्याशिवाय त्यांस रहावत नाहीं. मनुष्यप्राणी सर्वांत श्रेष्ठ व ज्ञानी असल्यामुळें त्याचे आनंदाचे प्रकार तर आणखी फारच असतात. जसें गायन, वादन, नृत्य, सुशोभित वस्त्रें व अलंकार, मिष्टान्नपान, रहाण्याचीं व ऐषआरामाचीं सुशोभित व सोईवार स्थळें, दीपोत्साह, आतसबाजी, ध्वजारोपण, अनेक प्रकारचे मौजेचे खेळ इ०. गायनाचे अनेक छंद असतात. तें ताल व सुरावर असलें ह्मणजे फार प्रिय लागतें. तें मनुष्यांसच नाहीं पण इतर प्राण्यांसही आवडतें. मधुरध्वनि सर्वांस आवडतो. इतर सर्व प्राण्यांत सर्प मधुर ध्वनीवर फार लुब्ध होतो व त्याचें सर्व लक्ष्य तिकडे लागून राहिल्यामुळें त्यास धरतां येतें. तोंडानें गाण्यांत मधुर ध्वनी-

शिवाय अर्थोत्पादकतेमुळें शृंगार, वीर, करुणादि रस उत्पन्न होतात. मधुर ध्वनि वाद्यांपासूनही उत्पन्न होतो. वाद्यांचे चर्मवाद्यें, तंतुवाद्यें, वगैरे प्रकार आहेत. गाण्याबरोबर वाद्यें असल्यास फार मजा येते व विशेष आनंद उत्पन्न होतो. नृत्याचेही अनेक प्रकार असून तें तालासुरावर असलें ह्मणजे जास्त खुलतें. वीररस गाणें व वाद्यें वाजविणें यामुळें लढाईचे वेळीं उद्भवण्यास फार उपयोग होतो. गायन, वादन व नृत्यमिश्रित शृंगार, वीर, करुणादिरस उत्पन्न करणारे व नीति दाखविणारे असे खेळ जसें नाटकें, तमाशे वगैरे करणें वाईट नाहीं, मात्र त्यांचा मुख्य उद्देश नीतिपर असावा व त्यांत बीभत्सपणा मुळींच नसावा. याचप्रमाणें इतर अनेक आनंदोत्पादक स्थळें, पदार्थ व प्रकार आहेत. जितका सुशोभितपणा जास्त तितकीं त्यापासून सुख व आनंद जास्त उत्पन्न होतात. सृष्टिकर्त्याचा हेतु आनंद उत्पन्न व्हावा असा असल्यामुळेंच असे पदार्थ उत्पन्न केलेले आहेत. सण, यात्रा, उत्सव यांचा हेतूही हाच आहे. तथापि आनंद नीतिपर जितका असेल तितका बरा. आनंदानें दुःख व खेद नाहींशीं होऊन उद्योगाविषयीं उत्सुकता प्राप्त होते व ज्ञान खुलतें. सारांश पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें आनंदाशिवाय चैतन्य विकास पावत नाहीं अथवा प्रफुल्लित होत नाहीं ह्मणून तो जितका वाढेल तितका चांगला. आनंदाच्या इतर साधनांपेक्षां प्राण्यास मधुरध्वनि हें मोठें साधन आहे; तथापि मधुरध्वनि, ऐषआराम व अन्य आनंदोत्पादक साधनें जरी याप्रमाणें फायदेशीर आहेत तरी इतर आवश्यक व चैतन्यरक्षक सदुद्योगांत अंतर

येईल अशा तऱ्हेनें त्यांचा उपयोग केल्यास त्यांपासून नाश होतो. तसेंच त्या संबंधांत सामर्थ्याहून जास्त खर्च करणेंही चांगलें नाहीं.

प्राण्यांचे स्वाभाविक गुण—उद्भिज प्राण्यांत ह्मणजे गवत, झाडें, वेली यांत आहार, वृद्धि व आनंद हे तीनच गुण असतात; पण इतर प्राण्यांत आहार, निद्रा, भय, उद्योग, खेद, आनंद, काम (मैथुन), क्रोध, मद (मस्ती), मत्सर (हेवा), मोह (माया), व दंभ (अभिमान) इतके गुण स्वाभाविक असतात. देहसुख व देहरक्षण हें ज्ञान सर्वांत असतेंच, पण मनुष्यप्राण्यांत स्मृति व विचारशक्ति सर्वांहून जास्त असते. त्यांत ही मजा आहे कीं हे सर्व गुण सर्व मनुष्यांत सारखे नसतात, इतर प्राण्यांतही कांहीं कांहीं स्वाभाविक गुण सारखे नसतात व कांहींत तर कित्येक गुण असलेले स्पष्टपणें समजण्यांत येत नाहींत. स्मृति व विचारशक्ति हीं सर्वांत असतात पण मनुष्यांस आपल्या सोयी, ऐषआराम, संरक्षणाच्या अनेक युक्ती, जगाची उत्पत्ति, स्थिति व लय वगैरे महत्वाच्या बाबतींत हे दोन गुण जास्त वापरतां येतात. त्यामुळें त्यांचें वर्चस्व सर्व प्राण्यांवर राहून व पुष्कळ आनंद प्राप्त करून घेऊन परलोकसाधन करतां येतें. उद्भिजांतील आपला आहार ग्रहण करणें, वृद्धीला मध्यें अडचण दिसल्यास वांकडें होऊन वृद्धि पावणें व आनंदानें टवटवीत आणि फलद्रूप होणें या धर्मांवरून त्यांचे स्वाभाविक गुण व्यक्त होतात. मनुष्येतर प्राण्यांचे सर्वच स्वाभाविक गुण लहान प्राण्यांत चांगलेसे समजण्यांत येत नाहींत, पण मोठ्या प्राण्यांत ते चांगल्या

प्रकारें दिसून येतात. चाटून वगैरे आंग साफ करणें व श्रम करून खाण्यापिण्यास वगैरे मिळविणें हीं उद्योगाचीं लक्षणें आहेत. दुःखामुळें खिन्न होऊन रहाणें व डोळ्यांतून पाणी काढणें वगैरे खेदाचीं आणि नाचणें व बागडणें हीं आनंदाचीं लक्षणें आहेत. याप्रमाणेंच इतर स्वाभाविक गुणही लक्ष्यपूर्वक पहाणारास त्यांच्यांत आढळतात. मनुष्यप्राण्यांत तर सर्व स्वाभाविक गुण चांगले स्पष्ट दिसतात. अगदीं लहान मूलही पोट भरलें तरी हात पाय हालविण्याचा उद्योग करतें, भितें, खेद अगर दुःख झाल्यास रडतें, व मजा वाटल्यास अगर आनंद झाल्यास हसतें. आहार ग्रहण करण्याचें ज्ञान तर उपजतच यच्चयावत् सर्व प्राण्यांत असतें. स्वाभाविक गुणांपैकीं कामाचें (मैथुनाचें) प्रयोजन उत्पत्ति होय. आहार, निद्रा, भय, उद्योग, आनंद व मोह (माया) यांचें प्रयोजन स्थिति अथवा धारणेकरतां आणि खेद, क्रोध, मद, मत्सर व दंभ यांचें प्रयोजन लय ह्मणजे नाशाकरतां आहे. स्वाभाविक गुणांना आपले स्वाधीन ठेवल्यापासून व सन्मार्गाकडे लावल्यापासून सुख होतें व तसें न केल्यास ते नाशास व दुःखास कारण होतात. वरील नाशकारक गुणांपैकीं क्रोध, मत्सर व दंभ यांचा उपयोग फायद्याकडे किंवा सुखाकडेही करतां येतो. अनीती व अपमानाविषयीं क्रोध बाळगणें चांगलें, नाहीं तर दुःख व अपमान होतो. दुसऱ्याच्या थोरपणाचा, विद्येचा व सद्गुणांचा मत्सर करावा ह्मणजे ईर्षा बाळगावी, द्वेष करूं नये, तसे आपण मिळविण्याविषयीं उद्योग करावा ह्मणजे फायदा होतो. आणि दंभ ह्मणजे अभिमानही चांगल्या गोष्टीवि-

षयीं व स्वातंत्र्याविषयीं बाळगावा, आपल्या थोरपणाचा व शहाणपणाविषयीं नव्हे. विचार करण्याच्या सामर्थ्यास स्वाभाविक ज्ञान, अक्कल किंवा बुद्धि असें ह्मणतात व तें प्राक्तनाला व परमेश्वरकृपेला अनुसरून प्राण्यांत कमजास्त असतें. सर्व सद्गुणांत ज्ञान श्रेष्ठ व अत्युपयोगी आहे. विचार त्यांवरच अवलंबून असतो आणि विद्येमुळें तें खुलतें. स्मृति ही त्याची जोडीदार आहे. बुद्धीचा दुसरा अर्थ इच्छा असाही आहे. स्मृतीच्या आंगभूत विद्या असते आणि स्मृति व ज्ञान किंवा विचार यांचा फार निकट संबंध असतो. सर्व प्राणी स्वभावतःच सुखावर लुब्ध असतात व त्यामुळें ते सन्मार्ग चुकण्याचा संभव असतो. बीजांत पुढील आकृतीचा समावेश केलेला असतो व तो कर्त्याचें सामर्थ्य व ज्ञान यांची साक्ष देतो.

ज्योतिष, लक्षणें किंवा चिन्हें, शकुन वगैरे—ज्योतिष ह्मणजे काळाची गणना करणें, ग्रहांच्या गतीवरून शुभाशुभ फळें वर्तवणें, ग्रहणें वर्तवणें, ग्रहांच्या युतींचे काळ शोधून काढणें, इत्यादि. हा सर्व गणिताचा व मोठ्या विचाराचा विषय आहे. ज्योतिषामुळेंच नक्षत्रांच्या गतीवरून व स्थानांवरून असें सिद्ध होऊं शकतें कीं पृथ्वीवर पहिल्यानें मनुष्यवस्ती व सुधारणा हिंदुस्थानच्या उत्तर भागांत झाली असून हिंदु लोकांचें धर्मशास्त्र जे वेद, संस्कृत भाषा व देवनागरी लिपी हीं अगदीं आरंभींचीं आहेत. वेद, उपवेद व शास्त्रें यांत परमेश्वराच्या स्थितीविषयीं व इतर महत्वाच्या विषयासंबंधी जसा गहन विचार केलेला आहे तसा इतर कोणत्याही धर्मशास्त्रांत नाहीं. हिंदु लोकांस पूर्वीं आर्य

(श्रेष्ठ) असें ह्मणत असत. त्यांनीं युगांचें व अल्प प्रळयाचें कालमान वगैरे वर्तविलेलें आहे. प्राचीनकाळीं त्यांच्या सारखे विद्वान्, तत्ववेत्ते, कलाकौशल्यवान्, पराक्रमी, वैभवसंपन्न व लक्ष्मीवंत लोक सर्व दुनियेंत दुसरे कोणी नव्हते. परंतु पुढें कालगतीनें तें सर्व लयास गेलें. मनुष्यास खाण्यापिण्यास चांगलें मिळूं लागलें ह्मणजे ऐषअराम हवेसे होतात आणि ते पाहिजे तितके मिळाले ह्मणजे आळस, अज्ञान, आपसांत कलह व देवभक्ति हीं वाढतात. आळसामुळें ज्ञान व उद्योग यांचा ऱ्हास होऊं लागतो, अज्ञानामुळें सारासार विचार नाहींसा होतो, आपसांतील कलहांमुळें नाश होतो व अज्ञानी आणि फाजील देवभक्तीमुळें पातक होऊन व देहधारणेच्या विरुद्ध वागणूक होऊन सर्व नाश होतो. मनुष्याच्या आंगांत देव येणें, पाहिजे तेथें शेंदूर लावून देवाची भावना करणें, अनीतीनें वागलें तरी देवभक्तीनें शुद्धि होते असें समजणें, नवसानें फलप्राप्ति होते असें मानणें, डोकें दुखलें तरी देवसकी धुंडाळणें असल्या प्रकारांपर्यंत देवभक्तीची मजल येऊन पोंचल्यास व त्यांत ऐषअरामामुळें आलेला आळस, अज्ञान व आपसांतील कलह सामील झाल्यास सर्व नाश कां होणार नाहीं! पण मनुष्याच्या मागील हा अनुक्रम टळणें फार कठीण आहे. सुखामुळें ऐषअराम, त्यामुळें आळस व अज्ञान आणि दुसरीकडे वैभव मिळविण्यास जागा पुरती नसेल तेव्हां आपसांतील कलह व अंतीं अज्ञानपणाचा देवभोळेपणा हा अनुक्रम असून तो टळणें कठीण आहे, कारण प्रत्येक पदार्थाला व गोष्टीला नाश आहेच, सबब सुखाच्या

नाशाकरतां अशी योजना असावीसें दिसतें. शिवाय सुखामागून दु:ख व दु:खामागून सुख अशीं बहुधा आळी-पाळीनें येतात. इतकेंच नव्हे पण बहुतकरून सुखदु:खांचें मान सारखें असतें, ह्मणजे फार सुख झाल्यास पुष्कळ दु:ख व तशा दु:खांतून वांचल्यास पुष्कळ सुख होण्याचा संभव असतो. पापपुण्यांमुळें मनुष्याला प्रतिकूळ अनुकूळ असा काळ असतो व त्याप्रमाणें योग घडून येतात. कित्येक लोकांच्या दुष्ट कृत्यांमुळें ग्रंथांचा नाश झाला नसता व मूळ शुद्ध मतांचा लबाडीनें ग्रंथांत फेरबदल केला गेला नसता तर आर्य लोकांच्या ज्ञानभांडारास नांवें ठेवण्यास जागा रहातीना. तथापि अद्याप अनेक महत्वाच्या विषयांसंबंधी त्यांच्या धर्मशास्त्रांतील सिद्धांत व विचार यांची बरोबरी इतर कोणतींही धर्मशास्त्रें करूं शकणार नाहींत असे आहेत, आणि ते परमेश्वरस्फूर्तीमुळेंच झाले असावेत असे मानण्यासारखे आहेत. त्या ग्रंथांत परमेश्वरभक्तीचे व ज्योतिषाचे प्रकार नवल वाटण्यासारखे आहेत. त्यांपासून पुढें होणाऱ्या गोष्टींचें व अदृश्य गोष्टींचें ज्ञान होतें. जन्माची वेळ बरोबर समजल्यास ज्योतिषामुळें मनुष्याचा स्वभाव, आयुष्य, सुखदु:खाचा काळ वगैरे पूर्वींच समजतात. प्रत्येक सूर्यमंडळांतील ग्रहांचें परस्परांवर आकर्षण असल्यामुळें आणि ग्रहांचें आपल्या उपग्रहांवर असल्यामुळें त्यांवरील पदार्थ व प्राण्यांवरही आकर्षणाचा संबंध पोंचतो आणि त्यामुळें शुभाशुभ किंवा सुखदु:खकारक फेरफार होतात. जन्मवेळेवरून पुढील गोष्टी जाणणें त्या ग्रहांच्या शुभाशुभ संबंधावरून जाणतां येतात, मात्र जन्मवेळ प्राक्तनाला अ-

नुसरून असते. एकाच वेळीं दोन अगर अधिक प्राण्यांचा जन्म झाला असला तरी त्यांचें सुखदुःख सारखें नसतें; सुखदुःखाचा काळ बहुधा सम असतो, पण प्राक्तनाप्रमाणें सुख किंवा दुःखाचें मान कमी किंवा जास्त असतें. शिवाय वेळेची सूक्ष्मता समजण्यास फार कठीण असतें. या व इतर संबंधाचें गणित वर्तविण्याच्या रीति पूर्वींच्या आर्यऋषींनीं व ज्योतिष्यांनीं सांगितल्या आहेत. मनुष्याच्या स्वभावावरून त्याचें जातक समजतें व तें ज्योतिषावरून पूर्वीच वर्तवितां येतें, आणि त्यांवरून पूर्वजन्माविषयीं अनुमान करतां येतें. याचप्रमाणें गृहप्रवेश, परदेशगमन, लग्नकार्यें वगैरेंच्या वेळा त्या समयाच्या ग्रहांच्या स्थानांला अनुसरून निरनिराळ्या मनुष्यांस निरनिराळ्या प्रकारचीं फळें देणाऱ्या असतात व त्या कर्मानुसार लाभतात. आकाशाचे बारा भाग कल्पिले असून त्या प्रत्येकास रास असें ह्मणतात. प्रत्येक राशींतील ताऱ्यांच्या समुदायाचा आकार जसा दिसतो तसें त्या राशीला नांव दिलेलें असतें. पृथ्वीच्या वार्षिक गतीमुळें ग्रह या बारा राशींतून फिरत असलेले दिसतात व त्यांच्या निरनिराळ्या स्थानाप्रमाणें निरनिराळे शुभाशुभ परिणाम पृथ्वीवरील पदार्थ व प्राण्यांवर होतात असें मानिलें आहे, पण हें अर्थांत कर्माला अनुसरून होतें. सूर्याचीही फलज्योतिषाकरतां ग्रहांतच जमा आहे. शिवाय सत्ताविस नक्षत्रें ठरविलेलीं आहेत. त्यांवरूनही शुभाशुभ फलें काढतां येत असून कालमान समजतें. चांगल्या ज्योतिषास एखाद्या गोष्टीविषयीं प्रश्न विचारल्यास प्रश्नाची वेळ व अक्षरें व प्रश्न करणाराची स्थिति यांवरून पाहिजे त्या गोष्टीची माहिती आ-

धींच सांगतां येते. प्राण्याच्या रंगावरून बहुधा त्याचे गुण सांगतां येतात आणि मनुष्याच्या शरिराची आकृती, हातांवरील व पायांवरील रेषा, तीळ वगैरेंवरूनही स्वभाव आणि सुखदु:खाचें मान सांगतां येतें. तसेंच शुभाशुभ वेळेला अनुसरून शिंका, मांजराची, कोल्ह्याची, पालीची, कुत्र्याची व कावळ्याची चाल किंवा शब्द वगैरेंवरूनही शुभाशुभ फळें काढतां येतात. याप्रमाणेंच स्वप्नांचेही गुण समजतात. निजलेलें मनुष्य जागें होण्याच्या संधीला व अशा संधीला बहुधा लघ्वीला लागली असल्यास किंवा प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें अथवा कांहीं काळजीमुळें स्वस्थ झोंप लागत नसल्यास स्वप्न पडतें. स्वप्नांतील देखावे बहुतकरून ज्या गोष्टीचा निदध्यास असेल, जी गोष्ट दिवसास ऐकिली अथवा पाहिली असेल, अथवा जी गोष्ट मनास विशेष लागली असेल अशा गोष्टीस अनुसरून प्रत्यक्ष किंवा परोक्ष रीतीनें दिसतात. आणि त्यांत कधीं कधीं स्वप्नाचे वेळीं कानीं पडलेले आवाजही सामील होतात. या वेळीं स्थूळदेहापैकीं मन, व सूक्ष्म, कारण आणि महाकारण देह मात्र जागृत असतात. कित्येक स्वप्नांतील गोष्टींच्या लक्षणांवरूनही भविष्यें कळतात. परंतु ज्योतिषासंबंधी पुरें ज्ञान असल्याशिवाय अशा प्रकारच्या शकुनांवर, लक्षणांवर, चिन्हांवर, भविष्यावर, व ग्रहदशेवर सहसा भरंवसा ठेवूं नये. सुनीतीनें, फार जपून, व शहाणपणानें दीर्घोद्योग करणारास बहुधा असले विचार मनांत बाळगण्याचें कारण नाहीं. असल्या कोणत्याही प्रकाराचे हातीं चांगलें वाईट करण्याचें नसून ज्याच्या त्याच्या पापपुण्याप्रमाणें जें होणार तें टळत नसतें, मात्र या प्रकारा-

मुळें पुढील परिणामाचें ज्ञान होतें व त्यावरून सावध रहातां येतें. तथापि होणार तें टळत नाहीं किंवा टळावयाचें असेल तरच टळतें. ह्मणून नेहमीं मनुष्यानें सारासारविचार करून वागणेंच चांगलें. उदाहरण, एखाद्या अपशकुनाविषयीं आपल्यास चांगली अनुभवशीर खात्री आहे तर एखादे कामाचे आरंभीं तसा अपशकुन झाला असतां त्या वेळीं तें काम तहकूब ठेवून नंतर केलें असतां कांहीं बिघडणार नाहीं असें असल्यास तें तहकूब ठेवावें, विषाची परीक्षा खाऊन पहाण्यासारखें करूं नये. पण तसें तहकूब ठेवण्यामुळें तें बिघडेल असें पूर्ण विचारामुळें जर वाटेल तर शकुनाची वगैरे पर्वा न करतां तें काम विशेष सावधगिरीनें मात्र करावें. शकुन, चिन्हें, ग्रहदशा वगैरे शुभाशुभ फलें दोन प्रकारचीं दर्शवितात, कायमचीं व तूर्तचीं. पैकीं कायमच्या फलांवर अथवा भविष्यांवर भरंवसा ठेवूनच वर्तूं नये, नुसतें सावध रहावें, तूर्तच्या शकुनावर भरंवसा न ठेवला तरी टाळवेल तर ती वेळ व दिशा टाळावी.

ऐक्य—हा जगांतील अत्यावश्यक गुण आहे. याशिवाय कोणाचेंही कधींच चालावयाचें नाहीं. ऐक्याला आकर्षण किंवा माया अशीही संज्ञा आहे व तें सर्वव्यापक आहे. त्याच्यामुळेंच सृष्टींतील लहान मोठे सर्व पदार्थ व प्राणी बनले असून वर्तत आहेत व उत्पत्ति, स्थिति आणि लय हीं सर्व त्यांमुळेंच होत आहेत. अनेक परमाणू एकत्र होऊन पदार्थ बनणें, नर व मादीचा संयोग होऊन प्राणी उत्पन्न होणें, आईबापांच्या मनांत माया अथवा प्रीति उत्पन्न होऊन लहानाचें संगोपन होणें, वृद्धि करणाऱ्या द्रव्यांचा व वृद्धि

होणाऱ्या प्राण्यांचा मिलाफ होणें व नाश करणाऱ्या गोष्टींकडे प्राण्यांची प्रवृत्ति होणें हीं सर्व याच गुणामुळें ह्मणजे ऐक्य, माया किंवा आकर्षणामुळेंच होतात. संगति हाही या गुणाचाच एक प्रकार आहे. सद्गुण, विद्या, ज्ञान, दुर्गुण वगैरे सर्व या गुणामुळेंच ह्मणजे संगतीमुळेंच होतात. सारांश, ऐक्य ऊर्फ माया, आकर्षण किंवा संगति हा गुण सृष्टीचा अवश्य घटकावयव असून तो सुमार्गवर्ती असल्यास सुखकारक व कुमार्गवर्ती असल्यास दुःखकारक होतो. आणि कित्येक संबंधांत ऐक्याचें मान जितकें जास्त असेल तितकें विशेष सुखाला कारण होतें. उदाहरणार्थ सजातीय पुष्कळ प्राणी एकमतानें वागल्यास त्यांस सुख होतें, इतकेंच नाहीं, जितका जमाव मोठा तितकें सुख अधिक असें आहे. ह्मणजे जितका मोठा जमाव एकमताचा असेल तितका तो आपल्या संरक्षणाचें व सुखोत्पादक उद्योगाचें जास्त कार्य करतो. मनुष्येतर प्राण्यांतही जमावापासून होत असलेले फायदे पुष्कळ पहाण्यांत येतात, आणि नर, मादी व पिलीं यांतील ऐक्य तर प्रत्येक जातीच्या प्राण्यांत पहाण्यांत येतें. मनुष्यप्राण्यांनींही प्रत्येकानें पृथक् वागण्यापेक्षां स्त्रीपुरुषांनीं ऐक्यानें वागणें जास्त फायदेशीर होतें व ह्मणूनच लग्नें करणें व पातिव्रत्यानें चालणें अत्यावश्यक आहे. याहून कुटुंबैक्य विशेष फायदेशीर, त्याहून ग्रामैक्य किंवा ज्ञात्यैक्य व त्यापेक्षां धर्मैक्य किंवा देशैक्य फारच सुखकारक असतें. खंडैक्य असल्यास बोलावयासच नको व सर्व पृथ्वीवरील मनुष्यांचें ऐक्य असणें दुरापास्तच आहे. पण साधारणतः देशाचें किंवा धर्माचें तरी ऐक्य असल्याविना सुखो-

त्पादक कार्ये चांगल्या प्रकारें होत नाहींत. एखादी गोष्ट करण्याची इच्छा होणें ह्मणजे त्या गोष्टीची व इच्छा करणाराच्या अंतःकरणाची ऐक्यता झाली असेंच ह्मणावयाचें. एकंदरीनें ऐक्याच्या संबंधांतून जगांत कांहींच सुटलेलें नाहीं व त्याशिवाय सुख कधींच होणें नाहीं. आत्म्याचें व परमात्म्याचें तरी ऐक्य होतें तेव्हांच मोक्ष मिळतो.

पदार्थांचे स्वाभाविक धर्म व उष्णता, तेज आणि विद्युल्लता—पदार्थ घन, प्रवाही व वायुरूप असे तीन प्रकारचे असतात. प्रत्येक पदार्थ अति सूक्ष्म परमाणूमुळें बनलेला असतो आणि उष्णतेमुळें ते परमाणु पृथक् करतां येतात. उष्णतेनें कित्येक प्रवाही पदार्थ सुकवून घट्टही करतां येतात पण त्यामुळें त्यांचें प्रमाण पुष्कळ कमी होतें, परंतु शीततेनें घट्ट होतात तेव्हां तसें होत नाहीं. परमाणु जड व चैतन्य अशा दोन प्रकारचे जरी दिसतात तथापि जडांतही बहुधा चैतन्य गुप्तरूपानें असतें व तें कांहीं प्रयोगानें उपलब्ध होतें. प्रत्येक पदार्थाला मध्यबिंदू असतो व आकर्षणामुळें इतर परमाणू तिकडे ओढले गेल्यामुळें एकमेकांला चिकटून राहून पदार्थ बनतो. प्रवाही व वायुरूप पदार्थांवर ते ज्या मोठ्या पदार्थाजवळ असतील त्याचें आकर्षण चालत असल्यामुळें त्यांचे मध्यबिंदू त्या मोठ्या पदार्थाजवळ असतात. प्रत्येक पदार्थांत उष्णता कमजास्त मानानें असतेच. जितका परमाणु अधिक जड तितकें आकर्षण विशेष चालतें. जगांत उष्णता किंवा विद्युल्लता नसेल तर सर्व परमाणु ढगाच्या रूपानें रहाण्याचा संभव आहे. पदार्थ एक स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जातांना बहुधा उष्णता, ध्वनि

व सामर्थ्य प्रगट होतात. उष्णता फार उत्पन्न होते तेव्हां त्याला ज्वालन किंवा अग्नि असें ह्मणतात व त्या वेळीं तेज उत्पन्न होतें. उष्णतेच्या अंगभूत विद्युल्लता असते. विद्युल्लतेंत गति, सामर्थ्य व आकर्षण असतें आणि उष्णतेंत प्रतिसारण, पृथक्करण व उत्क्रमण असतें. विद्युन्मय उष्णतेंत हे सर्व गुण असतात. पदार्थांचा पृष्ठभाग जितका चकचकीत जास्त तितका त्याच्यांत उष्णतेचें परावर्तन करण्याचा अधिक गुण असतो. अतिशीततेचा परिणाम उष्णतेप्रमाणें होतो. प्रत्येक पदार्थाच्या मध्यबिंदूजवळ परम दार्ढ्य असतें व केव्हां केव्हां पदार्थांचें मिश्रण झालें ह्मणजे त्याचा रंग व गुण निराळाच होतो. पदार्थांचें रूपांतर होतें पण मूळ तत्वें अथवा तत्व कधींच नष्ट होत नाहीं. प्रत्येक पदार्थ नियमित मुदतपर्यंत मात्र टिकतो व त्याची धारणा व अंत आणि तज्जातीय पदार्थांची उत्पत्ती यांचीं साधनें त्यांतच असतात. कधीं कधीं उत्पत्ती, स्थिति व लय हीं एखाद्या पदार्थाचीं अगदीं निराळ्या पदार्थावरही अवलंबून असतात. कोणताही पदार्थ अक्षयी रहाण्यासारखा कधींही नसतो. फक्त दोन महत्तत्वें अक्षयी रहाणारीं आहेत. पदार्थ दृश्य व अदृश्य असे दोन प्रकारचे असतात अथवा जड व चैतन्य असेही दोन भेद आहेत, तथापि परमाणूप्रमाणेंच बहुधा जड पदार्थांत चैतन्य गुप्त व फार कमी असतें आणि चैतन्य पदार्थांत तें नुसत्या डोळ्यानें किंवा सूक्ष्मदर्शक यंत्रानें सहज दिसण्यासारखें व पुष्कळ असतें. परमाणू ह्मणजे सूक्ष्मदर्शक यंत्रानेंही दिसण्यास कठीण असे जड व चैतन्यमय अतिसूक्ष्म प्राणी, ज्यांतील चैतन्यांश कमजास्त होऊं शकतो व पृथक्ही

करतां येतो पण ज्याला गति नसून जाग्यावरच चलन वलन असतें. पदार्थाच्या रूपांतराच्या वेळेस होणाऱ्या क्रियेस रसायनक्रिया ह्मणतात. कधीं कधीं रसायनक्रियेच्या वेळीं ध्वनी व सामर्थ्य असत नाहीं. पदार्थाचें रूपांतर होण्याकरतां त्यांत अधिक उष्णता सामील व्हावी लागते किंवा त्यांतील कांहीं निघून जावी लागते, मिळून त्या ठिकाणीं उष्णता उद्भुत होतेच. रसायनक्रिया जोराची असल्यास ध्वनी, तेज व सामर्थ्य प्रगट होतें. वायूंत प्रतिसारक व व्यापक गुण आहे.

किरकोळ—ऐक्याप्रमाणेंच वेळ, नीति व नियम हींही मोठ्या महत्वाचीं आहेत. जी वेळ अथवा जितका वेळ जातो तितका आयुष्यांत वजा होतो व पुनः कधींच परत येत नाहीं; ह्मणून वेळ कधींच फुकट घालवूं नये, नेहमीं सदुद्योगांत, सद्विद्यासंपादनांत किंवा सत्ज्ञान मिळविण्यांत आणि परमेश्वरभक्तींत खर्च करावा. तसेंच शरीररक्षणाच्या आणि शरीराच्या फायद्याच्या संबंधांतही तो खर्च केला पाहिजे. ऐषअराम ही शरीराच्या फायद्याची गोष्ट जरी आहे तरी त्यांत वेळ खर्च करणें तो फारच थोडा ह्मणजे अगदीं जरूर तितकाच खर्च केला पाहिजे. नीति व नियम यांचें महत्व इतकें आहे कीं कांहीं करणें झालें, किंबहुना परमेश्वराची भक्ती करणें असलें तरी नीति व नियम नसल्यास कोणत्याही संबंधांत कधींच फलप्राप्ती होत नाहीं. **उद्योगवृद्धी**—पृथ्वीवर मनुष्योत्पत्तीचें मान नेहमीं वाढतें असल्यामुळें उद्योगाचीही नेहमीं वृद्धी असावी. अनेक प्रकारचे शोध व जरूर त्या सर्व बाबतींत सुधारणा नेहमीं होत असाव्या. धान्योत्पत्तीही वाढती अ-

सावी व कलाकौशल्यें आणि यांत्रिक विद्या वगैरेही वर्धमान करण्याचे प्रयत्न नेहमीं चालू असावे. शरीरानें असमर्थ अशीं खेरीज करून बाकी सर्व मनुष्यें उद्योग करणारीं असावीं, भिक्षा मागून फुकटचें खाणारीं नसावीं. पृथ्वीच्या ज्या भागांत असें नसेल तेथील मनुष्यें दुःखी असावयाचीं. **दया**—खरी असावी. मनुष्यप्राण्यांनीं स्वजातीयांची ह्मणजे मनुष्याची दया पहिल्यानें बाळगून इतर प्राण्यांची मागून बाळगावी. दहा मनुष्यांस तळतळाट देऊन एकाला कांहीं धर्म करणें ही खरी दया होत नाहीं. जसें दुष्काळांत गरिबांची दया न जाणतां त्यांचे जवळून त्यांस नाडून पैसा मिळविणें व त्यापैकीं कांहीं ब्राह्मण, साधू, संत, देवस्थानें किंवा पांजरापोळ अशांस देणें ह्मणजे खरी दया, धर्म, नीति किंवा देशभक्ती होत नाहीं. दया, धर्म, नीति, देवभक्ती वगैरे नेहमीं सारासारविचारानेंच केलीं पाहिजेत. **हवा**—ही पांच सहा प्रकारचे निरनिराळ्या गुणांचे वायू मिळून झालेली आहे. सर्व प्राण्यांच्या जीवनास तिची अवश्यकता असून जड व चैतन्यमय प्राण्यांनीं ती भरलेली आहे. तिच्याविरहित रिकामें स्थळ मुळींच नसतें असें ह्मटल्यास चालेल. प्रत्येक ब्रह्मांडाभोवतीं तिचें वेष्टण असून आणि ब्रह्मांडाजवळ ती जाड व जड असून उत्तरोत्तर पातळ व हलकी असते. पृथ्वीभोंवतीं ती सुमारें ४० मैल जाड असल्याचें अनुमान आहे. तीच ब्रह्मांडाला गती देते ह्मणजे फिरवीत नेत असते. परंतु वरिष्ठ ब्रह्मांडांच्या आकर्षणामुळें त्या गतीचा मार्ग कांहींसा वतुळ होतो. सांथीच्या रोगांचें वगैरे बीज व दुर्गंध आणि सुगंध हवा वाहून दुसरे ठिकाणीं नेते. त्याप्रमाणेंच कलह, दुर्वासना, सद्वासना वगैरेंचें

बीजही ती वाहून नेते. सुगंधी वगैरे पदार्थांच्या ज्वलनापासून ती शुद्ध होते. गतीला अडथळा झाला असतां सामर्थ्य वाढणें हा गुण तिच्यांतही आहे, उष्णतेमुळें तिला गती येते. **स्वातंत्र्य**—हें यच्चयावत् प्राण्यांस हवेंसें असतें. यानें आनंद प्राप्त होतो व ज्ञान खुलतें. पारतंत्र्यानें बुद्धी मंद होते, खेद प्राप्त होतो व कधींकधीं काळजीमुळें वगैरे देहाचेंही नुकसान होतें. पारतंत्र्य चुकविण्याकरतां मनुष्येतर प्राणीही जिवापाड श्रम करीत असतांना दिसतात. मान व अपमानाचेंही असेंच आहे, किंबहुना स्वातंत्र्य ह्मणजे मान आणि पारतंत्र्य ह्मणजे अपमान असें ह्मटल्यास चालेल. कित्येक इतर गोष्टींप्रमाणें पारतंत्र्य व अपमान हीं आंगवळणीं पडल्यावर अज्ञान्यांस त्यांविषयीं कांहीं वाटत नाहीं.

प्रकरण ५—ब्रह्मपरब्रह्मज्ञान.

परमेश्वराचें अस्तित्व—सृष्टींत (जगांत) एकंदर दिसून येणारा सुंदरपणा आणि तिच्या बनावटींत व्यक्त होणारें चातुर्य यांविषयीं जर चांगला विचार केला तर तिला कोणी कर्ता नसून ती आपल्याआपण झालेली आहे असें ह्मणणें मोठें सहास होणार आहे. कारणाशिवाय कार्य होत नाहीं व बीजाप्रमाणें अंकुर फुटतो. यावरून पहातां कोणी तरी महासमर्थ, पूर्ण ज्ञानी आणि आनंदी उत्पन्नकर्ता ह्मणजे कारण किंवा बीज असल्याशिवाय जगांतील लहानमोठ्या अनेक पदार्थांपासून व्यक्त होत असलेली आल्हादकारक शोभा, प्राण्यांच्या देहांतील ज्ञानोत्पत्तिकारक अतिसूक्ष्मा-

वयव, अमित वजनाच्या व आकाराच्या पदार्थांचें अंतरिक्ष-भ्रमण, अतिसूक्ष्मापासून अतिविस्तीर्ण असंख्य पदार्थांच्या गुणदोषांविषयीं, कृतीविषयीं व गतीविषयीं आणि एकंदर उत्पत्ति, स्थिति व लय यांविषयीं योग्य व बिनचूक व्यवस्था हीं सर्व कशीं होतील? सारांश अशा सर्वांस अनादी मानण्यापेक्षां एक दोहोंस अनादी मानावें लागल्यास विशेष सयुक्तिक होणार आहे हें उघड आहे. मात्र अशा एक दोहोंचें अनादित्व व अस्तित्व सप्रमाण सिद्ध झालें पाहिजे. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं जगांत उष्णता व प्रकाश करावा अथवा व्हावा लागतो, पण तसा काळोख आणि शीतता करावी लागत नाहीं. प्रकाश व उष्णता नसलीं किंवा काढून घेतलीं ह्मणजे काळोख व शीतता आपल्याआपण होतात, तेव्हां हीं दोनही अनादी किंवा स्वाभाविकच जगांत आहेत हें उघड आहे. तसेंच जड व चैतन्यमय अति सूक्ष्म परमाणू सर्वत्र आहेत व त्यांचेच लहान मोठे सर्व पदार्थ व प्राणी बनले आहेत यांतही कांहीं संशय नसून हें प्रमाणसिद्ध आहे, तेव्हां जड व चैतन्यमय जे परमाणू त्यांच्या आंगभूतच हे दोनही आहेत असें मानण्यास हरकत नाहीं. यावरून जड व चैतन्यमय शीत व अंधकाररूप परमाणू हेंच अनादी महत्तत्व होय. यालाच ब्रह्म अशी संज्ञा आहे. शीततेंत चैतन्य जरी असलें तरी त्याला गती व सामर्थ्य ह्मणजे प्रफुल्लितपणा असत नाहीं. या अनंत पोकळींत सर्व ब्रह्म भरलेलें असल्यामुळें तें सर्व मिळून एक पदार्थच आहे. प्रत्येक पदार्थाला मध्यबिंदू असतो आणि मध्यबिंदूच्या ठिकाणीं परमदार्ढ्य असतें, त्यामुळें या ब्रह्माच्या

मध्यबिंदूच्या ठिकाणीं अति शीतता, अति अंधकार आणि अति दाट जडचैतन्यमय परमाणू आहेत ह्मणून यांस परब्रह्म अशी संज्ञा आहे. पण या परब्रह्माचे गुण कांहीं बाबतींत ब्रह्माच्या उलट आहेत. अति शीततेपासून उष्णतेसारखा परिणाम होतो, रसायनक्रिया घडते व विरुद्ध गुण उद्भुत होतात. या गोष्टीला अनुसरून या ठिकाणीं रसायनक्रियेमुळें अति उष्णता, ध्वनी, सामर्थ्य व तेज उत्पन्न होऊन चैतन्यापासून अति ज्ञान व जडापासून सर्वांस धारण करणारें रूप उत्पन्न झालेलें आहे. तेंच अति उष्ण पूर्ण ज्ञानी, अति देदीप्यमान, अतुल सामर्थ्ययुक्त, सर्वानंदमय, ब्रह्म व्यवस्थापक परब्रह्मरूप होय. यालाच सच्चिदानंद किंवा सत्चित्ज्ञानानंद असें ह्मणतात. सत् ह्मणजे कांहीं तरी असणें, चित् ह्मणजे चैतन्य अथवा सजीवपणा, ज्ञान ह्मणजे विचार किंवा अक्कल आणि आनंद ह्मणजे प्रफुल्लितपणा किंवा हर्ष. यासंबंधानें स्वामी महाराज ह्मणतात कीं मी ध्यानस्थ असतां तेजांतून ध्वनी झाला. त्याचा भावार्थ असाः—

या अनंत पोकळींत ॥ सदां भरलों असे मी निश्चित ॥ हिची विस्तीर्णता मनुष्यां अगण्य सत्य ॥ या पृथ्वीग्रहावरी ॥ ८ ॥ इशीं नसे वरखालीं ॥ ममतत्वें सर्व व्यापिली ॥ त्या तत्वाचीं दोन अंगें असती वहिलीं ॥ सत्व आणि सामर्थ्य ॥ ९ ॥ बनणार आणि बनविणार साचीं ॥ दों तत्वें परी एकरूप परियेसीं ॥ न चले कांहीं पृथक्करणादी क्रियांची ॥ शक्ति, तें ममरूप ॥ १० ॥ सत्व तें चेतनमय ब्रह्मतत्व जाण ॥ सामर्थ्य होय गति-

ज्ञान तेजमय परब्रह्म तत्व पूर्ण ॥ एका संगें एक रहाती, भिन्न ॥ न होती कदां काळीं ॥ ११ ॥ अति शीतमय अंधार ॥ अति सूक्ष्म प्राणिमय जैसा ढग थोर ॥ सजीव परी गति नसे साचार ॥ तयां प्राण्यांशीं ॥ १२ ॥ ऐशा ब्रह्ममय पोकळीचा मध्य जाण ॥ तो ब्रह्माचा परम दार्ढ्य बिंदू पूर्ण ॥ तें परब्रह्माचें मुख्य स्थान ॥ अमित सामर्थ्य ज-याचें ॥ १३ ॥ तो मी प्रत्यक्ष कार्य कारण ॥ माझें ज्ञान सांगतों तुजलागुन ॥ चित्त देई सावधान ॥ श्रोत्रेंद्रियें ठेवावीं ॥ १४ ॥ रंगहीन सतेज आ-कृति मूळ माझी ॥ त्यावरी आच्छादनाकृति जेवीं मनुष्याची ॥ वर्तुळ जैसें सतेजालिंग, ॐकार ध्व-नीची ॥ गर्जना अद्भुत ॥ १५ ॥ मनुष्यप्राणही लिंगरूप असे ॥ देह तो ज्ञानोद्योगाकरतां वसे ॥ मनुष्याकृतींत भावना होतसे ॥ मम रूपाची १६ अति शीततेपासून ॥ उष्णता उत्पन्न होय जाण ॥ अंधारापासून प्रकाश पूर्ण ॥ अतीस जीवापासोनि सजीव ज्ञान शक्ती ॥ १७ ॥ यामुळें माझें मुख्य रूप ॥ सतेज उष्ण ज्ञान तेजमय देख ॥ विराट आकृति सुरेख ॥ सामर्थ्य अत्यद्भुत ॥ १८ ॥ रूपां-तरामुळें सतत ॥ ध्वनी आणि सामर्थ्य प्रगट होत ॥ नाद ज्ञानासी रंजवीत ॥ गती उत्पन्न मजपासुनी ॥ १९ ॥ ध्वनी तोचि श्वासोच्छ्वास ॥ ॐ ह्मणोनि चाले साच ॥ तो नित्य परियेस ॥ न थांबे क-दांही ॥ २० ॥

यावरून परमेश्वराचें अस्तित्व कसें सिद्ध होतें व त्याची स्थिति कशी आहे हें तर झालेंच. मूळ बिंदू अथवा लिंग जरी रंगहीन तेजोमय आहे तरी ज्याप्रमाणें अंधारांत प्रकाश मिश्र झाल्यामुळें आकाशाचा रंग निळा दिसतो त्याप्रमाणेंच मुख्य बिंदूवरील आच्छादनाकृति श्याम रंगाचीच असली पाहिजे. ब्रह्म व परब्रह्म हीं दोनही जरी पृथक् वाटतात तरी तीं एकमेकांपासून पृथक् कधींच होऊं शकत नाहींत ह्मणून एकरूपच आहेत ह्मणजे तीं दोनही महत्तत्वें मिश्र रूपानेंच सर्वव्यापक आहेत. ॐध्वनि परमात्मरूप आहे. ब्रह्म जसें शीतता व अंधकारमय अति सूक्ष्म सजीवनिर्जीवमय परमाणू आहे तसें परब्रह्म उष्णता, तेज, गति ह्मणजे सामर्थ्य आणि ज्ञान किंवा आनंदरूप एक अति विस्तीर्ण सर्वव्यापक व्यक्ति जिचें मुख्यरूप ब्रह्माचा मुख्य बिंदू अथवा विशाळ परमाणु असें आहे. याची मुख्य प्रतिमा आत्मा अथवा जीव होय.

माया—हें उघड आहे कीं कोणीही प्राण्याला उद्योगाशिवाय अथवा कर्मणुकीशिवाय रहाणें आवडत नाहीं, मग सर्व शक्तिमान्, महाज्ञानी व पूर्णानंदी अशा परब्रह्माला किंवा परमेश्वराला त्यांविरहित रहाणें कसें आवडेल ! सबब कर्मणुकीविषयीं त्यास इच्छा झाल्याबरोबर माया अथवा आकर्षणरूप महाशक्ति जी विद्युल्लता ती प्रगट झाली व तिनें परमेश्वरइच्छेप्रमाणें जगाची रचना केली, ती कशी याविषयीं परमेश्वरध्वनीचे शब्द स्वामी लिहितात.

कर्मणुकीकरतां त्वरीत ॥ मज इच्छा झाली सत्य ॥
खेळ करावा विचित्र येथ ॥ ज्ञानाचा हा परिणाम

॥ २१ ॥ इच्छा ती केवळ विद्युल्लता मूर्तिमंत ॥ स्त्रीरूप उत्पत्तिस्थितिलयाकरतां बनली सत्य ॥ ती केवळ माझी सामर्थ्यसरिता निश्चित ॥ चित् शक्ती प्रगटली ॥ २२ ॥ मजशीं ती अनेक खेळ करून ॥ मम सेवा करी अनुदिन ॥ निरंतर मम आज्ञें वर्तून ॥ रंजवीतसे मनोहर नादें ॥ २३ ॥ तिनें ब्रह्मतत्वासी परब्रह्म तत्व मिळवून ॥ रचना केली रंगीबेरंगी अतर्क्य पूर्ण ॥ आकर्षणशक्तीनें सर्व संधान ॥ आपुले आधीन ठेविलें ॥ २४ ॥ अनेक ब्रह्मांडें तिनें रचिलीं ॥ वायूवेष्टणांत गुंडाळलीं ॥ आकर्षणशक्तीनें तोलिलीं ॥ भ्रमण त्यांचें नियमबद्ध ॥ २५ ॥ आकर्षण, पृथक्करण, प्रतिसारण, परावर्तन ॥ रचना केली रसायन, उत्क्रमणादिकांपासून ॥ तिचा रमणीय सामर्थ्यखेळ पाहुन ॥ आनंदमय मी सदां ॥ २६ ॥ चित्रविचित्र ब्रह्मांडें बनविलीं ॥ एकाहुनी एक विशेष ठरविलीं ॥ ऐके त्यांचीं नांवें बोलिलीं ॥ पूर्वापार तींच पैं ॥ २७ ॥ उपग्रह सर्वांहुनी सान ॥ त्यांहुनी श्रेष्ठ ग्रह पूर्ण ॥ तद्विशेष सूर्य जाण ॥ ध्रुव श्रेष्ठ त्याहूनी ॥ २८ ॥ ऐसीं ब्रह्मांडें अनंत ॥ या पोकळीमाजीं विराजीत ॥ धुमकेतूसमुदाय अमित ॥ दळणवळणाचें काम करिती ॥ २९ ॥ ध्रुव आणि सूर्य स्वयंप्रकाश ॥ इतर ते परप्रकाश त्यांस ॥ उष्णता आणि प्रकाश आसमास ॥ पुरविती हीं वरिष्ठ ब्रह्मांडें ॥ ३० ॥ ध्रुवमंडळांत

अनेक सूर्यमंडळें ॥ त्यांभोवतीं स्वपरिवारें फि-
रती बळें ॥ उपग्रहांसह ग्रह रवीभोवतीं फिरे ॥
उपग्रह ग्रहाभोवतीं ॥ ३१ ॥ मंडळाचा जो कां
मुख्य ॥ त्याचें आकर्षण अधिकार अतर्क्य ॥ मंड-
ळांतील ब्रह्मांडावरी चालती, अशक्य ॥ कांहीं
तेथें नसेची ॥ ३२ ॥ उभयतांपासोनी कुसरी ॥
अनेक वायू रूप अदृश्य तत्वें अवधारी ॥ त्यां
नंतर दृश्यतत्वें परोपरी ॥ मत्शक्तीनें रचियेलीं
॥ ३३ ॥ अणुरेणुपासोनी ब्रह्मांडापर्यंत ॥ रचना
केली अत्यद्भुत ॥ विशाळ तीं बहुधा वर्तुळाकार
सत्य ॥ ब्रह्मांड नाम त्यां या अर्थें ॥ ३४ ॥ स्वयं-
प्रकाश ब्रह्मांडांचा अधिकार ॥ परप्रकाश ब्रह्मां-
डांवरी चाले साचार ॥ मुदतशीर लया पात्र ॥
सर्व होती निश्चयें ॥ ३५ ॥ लहान मोठीं आकार-
मानें ॥ ब्रह्मांडांचीं परोपरीनें ॥ वजन गती पृथक
पृथक त्या कारणें ॥ लाविलीसे जाण पां ॥ ३६ ॥
एक एका ब्रह्मांडाचे अधिकारांत ॥ नियमित
संख्या ब्रह्मांडें आहेत ॥ ऐसीं ब्रह्मांडें असंख्य
परिवारासहित ॥ भ्रमती या पोकळीं ॥ ३७ ॥
तीं सर्व नक्षत्ररूपें दिसती ॥ अंधारांत प्रकाशें
चमकती ॥ कित्येक दूर त्यांची आकृती ॥ न दिसे
मनुष्यां नेत्रांनीं ॥ ३८ ॥ ब्रह्मांडांचें परस्परांवर ॥
एकमेकांचें चालतें आकर्षण साचार ॥ त्यांचे गती-
प्रमाणें फेरफार ॥ ब्रह्मांडांवरी होती ॥ ३९ ॥
ध्रुवमंडळ पृथक एकमेकांपासून ॥ परी ध्रुव ध्रु-

चांचें परस्परांवरी आकर्षण ॥ एका ध्रुवाचे मंड-
ळांतील सूर्य जाण ॥ संबंध एकमेकांशीं तयांचा
॥ ४० ॥ सूर्यमंडळांतील ग्रहांचा ॥ परस्पर संबंध
असे साचा ॥ ग्रहमंडळांतील उपग्रहांचा ॥ त्याच
परी ॥ ४१ ॥ सर्वांचा संबंध ॥ आकर्षणें अबाध ॥
असे मम शक्तीसी अगाध ॥ सृष्टीरचना मम
इच्छें ॥ ४२ ॥ फेरफारांचा संबंध पाही ॥ सर्व
पदार्थ प्राणिमात्रावरी होई ॥ तदनुसार शुभाशुभ
होत जाई ॥ ज्योतिषानुभव प्रत्यक्ष ॥ ४३ ॥ परी
प्राक्तनाला अनुसरून जाण ॥ शुभाशुभाचें कारण ॥
पापपुण्य फळ तें प्राक्तन ॥ त्यान्वयें ग्रहपीडा ४४
जैसें तंतूचें जाळें केलें ॥ मध्यें मध्यें मणी गुंफिले ॥
सानमोठे चित्रविचित्र शोभले ॥ मध्यें अपूर्व पर-
ब्रह्म ॥ ४५ ॥ तंतू तीं आकर्षणें ॥ रंगीबेरंगी
मणी तीं ब्रह्मांडें जाणें ॥ सर्वांमध्यें शक्तीसह पर-
ब्रह्म रूपडें ॥ अतर्क्य शोभा सर्वची ॥ ४६ ॥
शुभ्र वा रंगहीन प्रकाश काळोखाशीं मिश्रित ॥ या
लागीं श्यामप्रभा माझी सत्य ॥ मम स्त्रियेचा वर्णपीत ॥
अनेक रंगी अलंकार ॥ ४७ ॥ जितुके सूर्य ध्रुवा-
च्या अधिकारांत ॥ तितुक्यावरी तो सत्ता चालवीत ॥
सूर्यग्रह उपग्रहावरी सत्य ॥ आपुल्या मंडळाच्या
॥ ४८ ॥ प्राणी उदक आणि समीर ॥ भूवरी
चालतो अधिकार ॥ भूकंप, रोगसाथी, आवर्षण
वादळें परिकर ॥ अधिकाराज्ञें पै होती ॥ ४९ ॥

यावरून मायेची व मायेनें केलेल्या रचनेची स्थिति काय तें उघड झालें. सृष्टि हा सर्व एक खेळ ऊर्फ नाटकाचा प्रयोग बनला आहे. याचा सूत्रधार परमात्मा असून माया ही नटीच समजावयाची. आणि प्रत्येक प्राणी विशेषतः मनुष्य प्राणी यांनीं सुंदर आणि सोईवार स्थळीं घेतलेल्या सोंगाची यथायोग्य बतावणी करून दाखवावयाची आहे व त्या अनंतकोटी ब्रह्मांडनायकास रंजवावयाचें आहे. त्याकरतां त्यानें मनुष्य प्राण्यास स्वतंत्र बुद्धि व ज्ञान दिलें आहे. योग्य बतावणी करणाराबद्दल त्यास अर्थांत आनंद होतो व तसें नसल्यास राग येतो. याप्रमाणें योग्य बतावणी करणारीं आजपर्यंत या पृथ्वीवर थोर थोर ज्ञानी, सद्वर्तनी व पराक्रमी कित्येक सोंगें होऊन गेलीं आणि आपल्या कर्तृत्वानें त्या जगन्नियंत्याला प्रिय झालीं व असंख्य आपल्या कर्तृत्वांत चुकल्यामुळें अद्याप पुनर्जन्मफेऱ्यांत व दुःखांत गटकळ्या खात आहेत. प्रिय वाचकहो! मी व आपणही एक एका नांवानें सोंग आणलें आहे. त्याची बतावणी योग्य प्रकारें करून नटीच्या जाळ्यांतून सुटून सूत्रधाराचा दर्शनलाभ मिळविला पाहिजे, तरच सोंग घेतल्याचें सार्थक होणार आहे. आणि अशा बतावणीचा मार्ग विशेष मोकळा करण्याचाच या ग्रंथाचा व तो करण्यास स्फूर्ति व साह्य देणाऱ्या त्या महासमर्थ व ज्ञानी स्वामी महाराजाचा हेतु आहे. अस्तु. पूर्वीं ऐक्य या सदराखालीं मायेच्या व्यापकत्वाविषयीं व अवश्यकतेविषयीं परिस्फुटता केलीच आहे. तथापि मायेच्या एका गुणाविषयीं महाराज परमेश्वरसाक्षात्कारद्वारें काय ह्मणतात तें पहाः—

मायारूप मन अनियमित चंचळ अत्यंत ॥ अविचारें मम कर्मणूक पुरी न होऊं देत ॥ मी सुविचारें तिसी नियमबद्ध सत्य ॥ केली असे जाण पां ॥ १०२ ॥ माया अशुभ आणि अस्वच्छ ॥ ती प्राण्यासी जन्ममरणफेऱ्यांत ओढीत ॥ मी दयेनें नीती आणि सत्यानंद दावित ॥ माया सदां कुमार्गवर्ती ॥ १०३ ॥ माया ती मम भक्ती न करूं देत ॥ सदैव अशाश्वत सुखावरी हेत ॥ परी ज्ञानी ते मजकडे रत ॥ नीतीमार्गें वर्तूनी ॥१३८॥ मी तों आनंदी सदय ॥ मम भार्या क्रूर दुःखमय॥ जगत् कारणांकरतां होय ॥ ऐसी रिती ॥ १६१ ॥ युक्तीनें कार्य करावें ॥ त्यांत सर्व साधावें ॥ इच्छारूप मायेसी लंपट न व्हावें ॥ सुमार्गी मात्र ती अवश्यक ॥ १६२ ॥

यावरून जगांत किंबहुना आपल्या या पृथ्वीवर जे चांगलें वाईट, सुख दुःख, हर्ष खेद असे दोन एकमेकांच्या विरुद्ध प्रकार आपण पहातों त्याचें कारण उघड झालें; व असे प्रकार नसते तर उत्पत्ति, स्थिति व लय न्यायबद्ध होतेना; मुख्यत्वेंकरून लय वाईटपणाशिवाय होणें हें न्यायाच्या विरुद्ध झालें असतें. परमेश्वर तर पूर्ण न्यायी व दयाळू आहे तेव्हां लयाला अथवा नाशाला कुमार्गाची रचना पाहिजेच; तो कुमार्ग, ही रचना करून मोडणारी कुमार्गवर्ती, माया होय. जिच्यामुळें परिणामाच्या विचारापेक्षां सुखाकडे ओढा जास्त असतो. यावरून माया अथवा इच्छा ही जगत्कारणाकरतां जरी अवश्यक आहे तरी ती एक उपाधी असून तिचे गुण

अशुभ, दुःख (रुदन किंवा खेद), उत्पत्ति व नाश असे आहेत. मायेचा उच्छेद होणें महा दुर्घट असतें; मृत्युसमयीं-ही प्राण मायापाशांत (मायेचें विशेषरूप जी वासना त्यांत) गुंतलेला असतो. दुसऱ्याचा मृत्यु व देहाचा पुढील विधि पहाण्याचे वगैरे प्रसंगीं मात्र मनुष्याला बरीचशी विरक्तता प्राप्त होते, पण ती मायेच्या जोरापुढें टिकत नाहीं. मायेला असें सामर्थ्य नसतें तर सृष्टींतील व्यवसाय चालले नसते. आपलेपणा व परकेपणा हाही मायेचाच परिणाम आहे. जन्मांत एकंदर कष्टाचें व दुःखाचें मान जरी विशेष असतें तरी मायेमुळें त्याविषयीं प्राण्यांस कांहीं वाटत नाहीं. आनंद, ज्ञान व दया यांशिवाय प्राणांत असलेले सर्व गुणावगुण मायेचे होत, सामर्थ्य मात्र परमेश्वर व माया या उभयतांपा-सून असतें. जितका संबंध जवळचा तितका मायेचा जोर जास्त असतो.

कारभारी अथवा परमेश्वरअंश देव आणि प्रळय —प्रत्येक कारखान्याची व्यवस्था बरोबर चालण्याकरतां लहानमोठे अधिकारी असावे लागतात, मग या अद्भुत व अति विस्तीर्ण विश्वकारखान्याच्या व्यवस्थेकरतां ते नाहींत असें समजणें सयुक्तिक होणार नाहीं. ब्रह्मांडें लहान मोठीं व कनिष्ठ वरिष्ठ अशीं जर आहेत आणि कनिष्ठ, वरिष्ठास प्रदक्षणा करीत असून त्याच्या अधिकारांत आहे व त्याच्या उष्णतेमुळेंच जर स्वतःवर प्राण्याची धारणा करीत आहे, तर वरिष्ठ (उष्णता देणारा) नुसता गोळा असेल असें मानणें योग्य होणार नाहीं. शिवाय प्राक्तनाचे ह्मणजे पापपुण्याच्या फळाचे योग घडवून आणण्याला प्राण्यांच्या बुद्धीवर, विचा-

रावर किंवा इच्छेवर अंमल करणारें कोणीतरी असलें पाहिजे व त्याप्रमाणेंच प्रत्येक मनुष्याचा पापपुण्याचा हिशेब ठेवण्याचीही व्यवस्था असली पाहिजे; यावरून स्वयंप्रकाश अथवा वरिष्ठ ब्रह्मांडांवर विशेष सामर्थ्यवान् लोकांची वस्ती असावी असें उघड दिसतें. या बाबतींत महाराजांच्या ग्रंथांत ह्मटलें आहे कीं:—

अणुरेणूपासून पूर्ण ब्रह्मांडावरी ॥ कारभार करिती जे कुसरी ॥ ते लोक रहाती स्वयंप्रकाश ब्रह्मांडावरी ॥ देवलोक त्यां बोलती ॥ ५० ॥ ते आणि त्यांचे दूत अदृश्य रूपें ॥ अधिकारांतील ब्रह्मांडावरी येती साक्षेपें ॥ ग्रहउपग्रहांवरील कौतुकें ॥ ऐशा रिती तीं होती ॥ ५१ ॥ उत्पत्ती स्थितील-यासी उक्त ॥ ऐसी व्यवस्था ते राखिती निश्चित॥ पापपुण्यान्वयें शुभाशुभ भोगविती सत्य ॥ त्यांच्या सह मम अंश मानव मस्तकीं ॥ ५२ ॥ भोक्तृत्वाप्रमाणें जन्मवेळ ॥ शकून चिन्हें ती सोज्वळ ॥ भविष्य दाविती जैसा पुढें काळ ॥ पूर्वी जरी नेत्रा आड ॥ ५३ ॥ सानमोठ्या ब्रह्मांडांसी ॥ अधिकार उक्त आयुष्यराशी ॥ दिलीसे परी ध्रुवासी ॥ आर्धदीन पै माझा ॥ ५४ ॥ मी जितका काळ व्यवसायीं जागृत ॥ तितुकाची विश्रांती वा सुषुप्तींत ॥ जागृतीपर्यंत सर्व सृष्टी रहात ॥ पुढें लय पावे ॥ ५५ ॥ मी विश्रांतींत राहें एकटा जाण ॥ इतर सर्व ब्रह्मपरब्रह्म तत्वीं जाती मिळून॥ मोक्षस्थानीं जे का मशीं मिळती येऊन ॥ ते रहाती

मम मुख्यरूपीं ॥५६॥ मजसी स्वप्न विकार नसे ॥ मायामय प्राणाशीं तें पडतसे ॥ मी मायेपासून अलिप्त असें ॥ जरी मजसीं ती अभिन्न ॥ ५७ ॥ ध्रुवावरी मनुष्यवस्ती प्रथम ॥ त्यानंतर सूर्यावरी मानवउत्पत्ती होय हा नेम ॥ सूर्यानंतर सुजाण ॥ ग्रह उपग्रहावरी पै ॥ ५८ ॥ तोच अनुक्रम इतर प्राण्यासीं ॥ जडसृष्टी होय एकदांची ॥ ती अल्प प्रळयीं नष्ट न होय साची ॥ परी इतर सर्व क्षय ॥ ५९ ॥ एकएका सूर्यमंडळासाठीं ॥ ध्रुवावरी पृथक पृथक वस्ती ॥ सूर्यावरी तेच रिती ॥ ग्रहउपग्रहाकारणें ॥ ६० ॥ सूर्यावरील वस्ती जेव्हां जी निजत ॥ तेव्हां तिचे ब्रह्मांडावर अल्प प्रळय होत ॥ ध्रुवावरील सर्व वस्तीस मुळींच निद्रा नसे सत्य ॥ आर्ध जागे आर्ध निजती ॥ ६१ ॥ अल्प प्रळयीं ब्रह्मांड मात्र रहात ॥ पृष्ठावरील सर्व नष्ट होत ॥ भू उदक राहे निश्चित ॥ महाप्रळयीं ब्रह्मांडक्षय ॥ ६२ ॥ जागा होता अनंत कोटी ब्रह्मांडनायक ॥ सर्व रचना उत्पन्न होय सुरेख ॥ तैशीच सूर्यावरीळ वस्ती उठतां देख ॥ ग्रहउपग्रहावर उत्पत्ती ॥ ६३ ॥ महाप्रळयाचा समय ॥ अल्प प्रळयासी मिळून होय ॥ सर्व नियम मी रक्षीत जाय ॥ माया ती अनियमित ॥ ६४ ॥ ध्रुवावरी समीर मात्र सेवन ॥ रवीवरी मधुर सुधापान ॥ ग्रहावरी अन्नोदकपान ॥ उपग्रहीं नीर निर्मळ ॥ ६५ ॥ जगास्तित्वास अ-

थवा स्थितीस ॥ अनुसरून वागणें ती नीती अथवा पुण्य साच ॥ विरुद्ध ती अनीती वा पाप, नाश ॥ दुःख खेद त्यां पायीं ॥ ६६ ॥ उत्पत्तीपासून प्रळयापर्यंत ॥ पातक वाढत जाय सत्य ॥ देवसत्व तैसेंची कमी होत ॥ अंतीं योग प्रळयाचा ॥ ६७ ॥ अस्तित्वपर नीती तेचि पुण्यरास ॥ आचरतां उपग्रहावरील वस्तिवास ॥ सोडून जाय ग्रहलोकांस ॥ तेथून जाणें देवलोकीं ॥ ६८ ॥ देवलोक तोची स्वर्ग जाण ॥ स्वयंप्रकाश ब्रह्मांडीं त्यांचें स्थान ॥ वायू, उष्णता, किरण, आकर्षण ॥ यायोगें गमन तेथें ॥ ६९ ॥ सूर्यलोकीं जे नीतीनें वागती ॥ ते ध्रुवलोकांप्रती जाती ॥ तेथून पुढील गती ॥ मम पदाची ॥ ७० ॥ नीर, अमृत, वात ॥ उद्योगानें हें भक्ष तयार होत ॥ त्यांत अनेक प्रकार असती सत्य ॥ अलंकारादिकांचेही ॥ ७१ ॥ जैं पातक फार होय ॥ मग होय अल्प प्रळय ॥ तैं देवसुषुप्तीची वेळ होय ॥ हें सामर्थ्य मायेचें ॥ १२९ ॥ महाप्रळयाचे समयीं ॥ अल्प प्रळयाचाही योग येई ॥ नियमन्यायबद्ध सर्वही ॥ चालवीं मी स्वइच्छें ॥ १३० ॥ इच्छा ते उपाधी जाण ॥ ह्मणून इच्छारूप माया अशुभ पूर्ण ॥ तिचें छायारूप मन ॥ अशाश्वताकडे धांवे ॥ १३१ ॥ मी जरी दया न करतों ॥ मनुष्यां सुबुद्धी न देतों ॥ नीतिस्थापन भक्तरक्षणीं उदास रहातों ॥ तरी अल्प प्रळय वारंवार ॥ १३२ ॥ मी नियमित

काळपर्यंत ॥ नीती रक्षितों जगांत ॥ सर्व नीती आणि नेमांनीं चालवीत ॥ ह्मणोनी अस्तित्व नियमबद्ध ॥ १३३ ॥ इच्छेसी सांभाळणें ॥ आणि नियमबद्ध वागविणें ॥ हें लागतें मला करणें ॥ ममान्वयी मज प्रिय ॥ १३४ ॥ ह्मणोनी नीतिनेम मजसी प्रिय ॥ त्यांचें फळ तत्काळ होय ॥ तरी जें होणें सर्व काय ॥ तें कर्म विचारें होतसे॥१३५॥ माया ती मम भक्ती न करूं देत ॥ सदैव मिथ्या सुखावरी हेत ॥ परी ज्ञानी ते मजकडे रत ॥ नीतीमार्गें वर्तूनी ॥ १३८ ॥ जैसा अनुक्रम ब्रह्मांडांचा ॥ मी अधिक उणा तैं राहें तैसा॥ध्रुवावरील मनुष्यांत विशेष अंश साचा ॥ ज्ञानसामर्थ्यही अधिक ॥ १४९ ॥ उष्णता, वायू, आकर्षण, विद्युल्लता ॥ यां रूपें मी जगव्यापक तत्वता ॥ चराचर देव आणि देवदूतां ॥ माजी अंशरूपें मी वसतसें ॥ १५० ॥

यावरून व्यवस्थाधिकारी जे देव त्यांचें स्थान व स्थिति यांविषयीं बराच बोध होत असून ब्रह्मांडांची व्यवस्था, प्रळय वगैरे बऱ्याच गोष्टी समजतात. हे देव अनेक देह व अदृश्य आकृत्या जरूर तर धारण करूं शकतात आणि दुर्गुणांचें प्राबल्य कांहीं कमी मानानें पण स्वयंप्रकाश ब्रह्मांडांवरही असतें असें दिसतें. अंतरिक्षांत देव अथवा देवता किंवा विशेष सामर्थ्यवान् व्यक्ती असल्याविषयीं प्राणविनिमय विद्येवरून, मंत्रशास्त्रांवरून आणि याबद्दलच्या अनुभवांवरूनही प्रमाणसिद्ध आहेच.

सर्व साहित्यासह आत्मा (प्राण अथवा जीव) आणि प्राक्तन—देह हें एक यंत्रासारखें असून जीव अगर आत्मा नाहीं असा कित्येकांचा समज आहे; पण काम, क्रोध, मद, मत्सर, मोह (माया), दंभ, भय, मन (इच्छा), विचार, स्मृति, ज्ञान वगैरे गुण आणि प्राणविनिमयामुळें, ध्यानामुळें अथवा योगसाधनामुळें होणारी विश्वदृष्टी किंवा भूतभविष्यांसंबंधी वगैरे ज्ञान हीं नुसत्या यंत्रास होतील अथवा नुसत्या त्या यंत्राजवळ असतील असें मुळींच संभवत नाहीं. याकरतां कांहीं विशेष व्यक्तीची ह्मणजे ज्ञानी व समर्थ पदार्थाची जरूर आहे. इतकेंच नव्हे, जगांत पृथ्वीवर अधिक उण्या सुखांत किंवा दुःखांत होत असलेल्या जन्मप्राप्तीवरून आणि पुढील सुख व दुःखप्राप्तीच्या दिसत असलेल्या प्रकारावरून तो पदार्थ अथवा आत्मा अमर असून कर्मानुसार अनेक देहधारणा करतो असें दिसतें, शिवाय करावीसी वाटली ह्मणजे शरिराकडून अथवा त्याच्या कोणत्याही भागाकडून जी क्रिया घडते तसी घडण्याला प्राणांसारखी कांहींतरी शक्ती असल्याविना क्रिया घडूं शकणार नाहीं. तसेंच प्राण्यांना विनाकारण कमजास्त सुखदुःख होणें जगांत स्वाभाविकपणें दिसून येणाऱ्या न्यायाच्या विरुद्ध होणार आहे. आतां या बाबतींत समर्थ महाराजांच्या ग्रंथांत काय आहे तें पहाः—

प्राण तो मायेंत मम प्रतिबिंब असे ॥ परी मनुष्यमस्तकांत मी विशेष अंशरूप वसें ॥ मम अंश प्राणास स्मृतीविचार पुरवीतसे ॥ जसें पूर्वार्जित ॥ ८५ ॥ पूर्वार्जिताचा संबंध नसे जरी ॥ मग

विचारावर प्राण पूर्ण सत्ताधारी ।। वाईटबरा तो विचार करी ।। स्वतंत्रपणें ।। ८६ ।। माझे अंशाचे ठिकाणीं देव राहून ।। बुद्धी चालविती प्राणी कर्मासमान ।। परी दृढनिश्चयी असतां प्राण ।। चालूं न दे कोणाचें ।। ८७ ।। याप्रमाणें कर्तृत्व प्राणाचे हातीं ।। ह्मणोनी फळें भोगणें त्याप्रती ।। इंद्रियें अवयव त्याच्या इच्छेनें वागती ।। इच्छा तें मन मूर्तिमंत ।। ८८ ।। प्राण वसे हृदयांत ।। मम अंश मस्तकीं देव अंशासहित ।। षड्रिपू आनंद खेदमय प्राण रहात ।। तो मायामय अत्यल्प अंश माझा ।। ८९ ।। त्यासी सारासारविचारज्ञान ।। मस्तकींच्या मम अंशापासून ।। इतर प्रांण्यांच्या मस्तकीं देव अंश मात्र असून ।। अत्यल्प ज्ञान तयांसी ।। ९० ।। मस्तकीच्या मम अंशांत ।। ज्ञानस्मृती राहे मजसवें शांत ।। कर्मानुसार त्यांचें आणि षड्गुणांचें प्रमाण कमजास्त ।। असतें प्राणीकाजा ।। ९१ ।। मम कृपें स्वभावांत चांगूलपण ।। येत विद्याज्ञानेंही करून ।। विद्या माहिती परी ज्ञान ।। वाढतें तिजपासुनी ।।९२।। विचारसामर्थ्य तेंची ज्ञान ।। सर्व ज्ञानांत मम ज्ञानविद्या उत्तम ।। त्यापासोनी मोक्षधाम ।। प्राप्त होय त्वरित ।। ९३ ।। अती सूक्ष्म ज्ञानतंतू व्यापक शरिरांत ।। त्यायोगें माझा संबंध प्राणासी रहात ।। परी प्राणासी मम दर्शन मस्तकीं कष्टें होत ।। ध्यानें किंवा योगाभ्यासें ।। ९४ ।।

आनंद सौंदर्य गायन वादन ॥ या योगें ज्ञानतंतू प्रफुल्लित होती जाण ॥ दुःखें आणि खेदें विरस होऊन ॥ स्थिती दाविती मुखावरी ॥ ९५ ॥ सर्व ज्ञानतंतूंत मन फिरत ॥ मस्तकांतील ज्ञानतंतुजाळ्यांत ॥ विचार स्मृती असती सत्य ॥ जरूर तेव्हां प्राप्त प्राणा ॥ ९६ ॥ प्राणाशीं मनाचा नित्य संबंध ॥ नेत्रकर्णादिकांसी अबाध ॥ सर्व देहीं त्वरें अगाध ॥ तें सदां फिरतसे ॥ ९७ ॥ मनें सुचवितां प्राण क्रिया करी ॥ ईशविचारें मात्र त्यास अव्हेरी ॥ अथवा स्वपराक्रमें ही आवरी ॥ जरी कृपा पै माझी ॥ ९८ ॥ जाळ्याचें वरील वेष्टन स्मृतीचें ॥ त्याचे आंतील विचाराचें ॥ त्यांतर भागीं स्थान देव व मम अंशाचें ॥ वेष्टना संबंध जिव्हा, नासिक, कर्ण, नेत्रां ॥ ९९ ॥ परी तो संबंध मनाच्या द्वारें ॥ प्राणासी वेष्टणसंबंध मात्र परभारें ॥ मनाशिवाय ज्ञानतंतूची गती हरे ॥ मायारूप मन चपळ पै ॥ १०० ॥ मन तें सदां निर्भय ॥ विचारें भय उत्पन्न होय ॥ मन पराधीन नसतें मग काय ॥ सृष्टीधारणा कैची ती ॥ १०१ ॥ जे कां दृढ निश्चयी जन ॥ मनवासना षड्रिपू धरती आवरोन ॥ करिती सन्मार्गाचें बळेंची आकलन ॥ मोक्षमार्गीं ते लागती ॥ १०५ ॥ बुद्धीचे अर्थ दोन ॥ बुद्धी ह्मणजे स्वाभाविक ज्ञान ॥ किंवा बुद्धी तो कृत संकल्प जाण ॥ प्राण करी स्वातंत्रें ॥ १०७ ॥

पंचप्राण परी मुख्य एक ॥ चारांमाजी तीन देह अमर देख ॥ चोहों देहांच्या चार भाषा सुरेख॥ चोहोंचीं लक्षणें पृथक पै ॥ १०८ ॥ तीन देह एकावरी एक जाण ॥ स्थूळ वा लिंग देहा मरण ॥ सूक्ष्मासी स्वप्न ॥ कारणासी सुषुप्ती ॥ १०९ ॥

यावरून पहातां मन हें प्राणाचें साथीदार आहे, पण महाप्रळयानंतर माया ज्याप्रमाणें परब्रह्मांत मिळून जाते तद्वत् मृत्यूनंतर तें प्राणांत मिळतें. प्राण आणि मन हीं निराळीं नसतीं तर मनांत (इच्छेस) एखादी गोष्ट करावयाची असूनही प्राणी ती करीत नाहीं, अशा वेळीं प्राण विचार करून इच्छेच्या विरुद्ध वागतो असें झालें नसतें. शिवाय कधीं कधीं असें होतें कीं प्राण इंद्रियानें किंवा अवयवानें एक प्रकारचा उद्योग करीत असतां मन दुसरीकडेसच असतें. सर्व शरिराचें चलनवलन अर्थात प्राणाच्या हातीं आहे. मृत्यूनंतर सूक्ष्म ज्ञानतंतू लागलीच विरघळून जातात व बेशुद्धीच्या वेळेसही ते थिजल्यासारखे होतात. स्मृतीचें जाळें फिरतें असतें. प्राण पांच प्रकारचे आहेत; त्वचेंत जो असतो त्यामुळें स्पर्शज्ञान असतें व त्याचा प्रवाह धूम्रासारखा शरिराभोंवतीं फिरता असतो, मस्तकाभोंवतीं तर तो पुष्कळ असतो, याचा संबंध कारणदेहाशीं असतो. गुह्यस्थानाजवळ असतो तो मलमूत्र पृथक् करून चेतना, गर्भधारणादी व्यवस्था करतो. उदरांतील अन्नपाण्याचा पाक करून मैल निराळा काढतो. कंठांतील रुचि व वास घेऊन बोलतो. आणि हृदयांतील जो मुख्य तो बाकीचीं सर्व कामें करतो. या मुख्याला तीन अदृश्य देह आहेत. पण बाकीचे चार स्थूळदेहांतच

वास करतात. उद्भिजांत प्राण तीन असतात. सर्व प्राण वायुरूप असतात व शरीराच्या धारणेकरतां जशी अन्नाची जरूर असते तशी प्राणाच्या पुष्टीकरतां प्राणवायूची जरूर असते व तो श्वासाबरोबर मिळतो. सर्व प्राणांचा व देहांचा संबंध प्राणवायूनें व मनानें जोडलेला असतो. कांहीं वेळ प्राणवायु न मिळाला तरी प्राणांची धारणा होऊं शकते. प्राण वायुद्वारें दुसऱ्याचे देहांत प्रवेश करून नराच्या किंवा मादीच्या रेतांत बीजरूपानें राहून गर्भाशयांत प्रवेश करतो; पण याकरितां उभयतां नरमादींचें रेत पाहिजे तसें असावें लागतें तेव्हां देह बनतो. उद्भिजांच्या संबंधांत पाण्यामुळें उत्पन्न होतो. प्राणाचे देह कारणपरत्वें चार प्रकारचे असून त्यांत निरनिराळे चार प्रकारचे गुण आहेत व ते निरनिराळ्या क्रिया करतात. ते येणेंप्रमाणें:—

महाकारणदेह—चैतन्य, आनंद, स्वाभाविक ज्ञान हे गुण असून निद्रा नाहीं. परावाचा.

कारणदेह—आकार, विश्रांति किंवा निद्रा, वासना ह्मणजे हेतु किंवा संकल्प (हिच्यामुळें पुनः जागृत होतो व हिला अनुसरूनच कधीं कधीं अन्य जन्म किंवा पिशाच्च योनी पावतो. मनाची उत्पत्ती हिच्यापासूनच असून मन चंचल पण ही दृढ आहे), संसर्गिक ज्ञान (याचेमुळेंच झोंपेंत कोणीं हाक मारली किंवा स्पर्श केला ह्मणजे धक्का लागला किंवा आवाज ऐकला असतां जागृत होतो). विचार, चिंता किंवा अस्वस्थता (हीं असल्यास निद्रा येत नाहीं). ज्ञानतंतूंच्या विचारजाळ्याचा संबंध पश्यंतीवाचा.

सूक्ष्मदेह—स्वप्न, स्मृति, अहंकार (आपलेपणा), मन, ज्ञानतंतूंचा व चार प्राणांचा संबंध, षड्रिपू. मध्यमावाचा.

स्थूल अथवा लिंगदेह—देह व त्याचे प्रत्यक्ष सर्व व्यवहार. वैखरीवाचा.

पहिले तीन हे हृदयांतील प्राणाचे एकावर एक तीन कोशच समजावयाचे. ज्याप्रमाणें आत्मा परमेश्वराचें छायारूप आहे त्याप्रमाणेंच मन मायेचें अंशरूप होय आणि वासना हें मायेच्या उत्पत्तीचें कारण व मुख्यरूप होय. स्वाभाविक ज्ञान ह्मणजे चैतन्याचा प्रफुल्लित होण्याचा गुण ह्मणजे मानसिक उद्योग अथवा विचारसामर्थ्य. यापासून स्मृति, मनन, क्रिया व शेवटीं आनंद यांची उत्पत्ति होते. याचें प्रमाण सुकृताला अनुसरून प्राणांत कमजास्त असतें व तें मस्तकांतील परमेश्वर अंशामुळें पुष्टी पावतें. परमेश्वराचा अंश मनुष्याच्या मस्तकांत असतो आणि त्यामुळेंच मनुष्यांस इतर प्राण्यांपेक्षां स्मृति व विचार जास्त असतो. परमेश्वरअंशामुळें ज्याप्रमाणें स्वाभाविक ज्ञानाची पुष्टी होते त्याप्रमाणें देवअंशामुळें विचार व स्मृतीची होते. पण कर्मयोगें शरीरसामर्थ्यांत बदल झाल्यास या पुष्टींत अंतर पडतें. प्रत्येक पदार्थाला पुष्टी अथवा वृद्धी व झीज यांची अवश्यकता असते. देवअंश प्राण्याचे विचार कर्माप्रमाणें फिरवितात व श्वासोच्छ्वासाबरोबर येणाऱ्या व जाणाऱ्या देवदूतांच्या द्वारें हितानहितांच्या संबंधानें इतर प्राण्यांच्या विचाराची जुळती व्यवस्था ठेवण्याची तजवीज करतात. अशा दूतांच्या किंवा लहान देवांच्या द्वारें या देवअंशाचा संबंध स्वर्गांतील (स्वयंप्रकाश ब्रह्मांडावरील) देवांशीं

असतो, त्यामुळें तेथील देवांना सर्व व्यवस्था ठेवतां येते. देवअंश कर्मानुसार सुख अगर दुःख होण्यासारखी बुद्धि ह्मणजे विचार फिरवितात पण पाप अगर पुण्य करण्यासारखी फिरवीत नाहींत. परमेश्वरअंशाचा देवअंशाशीं कांहीं संबंध नसतो. तोंड, नाक आणि डोळे यांच्या द्वारें प्राणाची गति होते, त्यामुळें तद्वारें एका प्राणाचा संबंध दुसऱ्या प्राणाशीं होऊं शकतो आणि याच कारणामुळें मोहन व प्राणविनिमय विद्या चालतात. दोन प्राणांचें सामर्थ्य एकत्र झाल्यास भूतभविष्यज्ञान येतें किंवा प्राण देवअंशाशीं अथवा परमेश्वरअंशाशीं मिळाल्यासही असें ज्ञान होतें. कारण देहाला विश्रांति पाहिजे ह्मणून त्याच्या जोरानें निद्रा येऊन महाकारणाशिवाय सर्व देह शिथिल होतात, पण त्याच्याच वासनेमुळें सूक्ष्मदेहाला चेतना होऊन पुनरपि सर्व जागृत होतात. महाकारणामुळें निद्रेंतही चैतन्य असतें. कारणामुळें विचार, निद्रा व जागृतावस्था प्राप्त होते, सूक्ष्मामुळें इच्छा, स्मृति वगैरे मानसिक सर्व कांहीं होतें आणि स्थूळ देहामुळें देहाकडून सर्व प्रत्यक्ष क्रिया घडतात. नजरेला नजर मिळविण्याच्या एका प्रकारच्या प्रयोगानें एका प्राणाचा संबंध दुसऱ्याशीं लागू होतो व अशाच प्रकारच्या कित्येक दुसऱ्या क्रियांनीं प्राणप्रवाहाचे चमत्कार होतात. योगसाधनानें प्राणाला वर चढवून देवअंशाचें व परमेश्वरअंशाचें दर्शन करवितां येतें व असें दर्शन होत असलेल्या प्राणास चारही देह क्षीण न होऊं देतां आयुष्य पुष्कळ वाढवितां येतें. प्राक्तनाचा बरावाईट योग घडवून आणण्याकरतां एका प्राण्याच्या मस्तकांतील अंशाला विचार

फिरविण्याविषयीं माहिती देणें व त्या बाबतींत दुसऱ्या प्राण्याचा संबंध असल्यास त्याच्याही मस्तकांतील अंशास खबर देणें हें देव आपल्या दूतांच्या द्वारें करतात. ग्रहदशा हें येणाऱ्या योगांविषयीं फक्त आगाऊ समजण्याचें साधन आहे. सर्व कांहीं प्राक्तनाला अनुसरून होतें व ग्रहदशेचा योगही जन्मवेळेवरून तसाच येतो. कोठें, कोणत्या वेळेवर कशा प्रकारचा जन्म द्यावयाचा, मरणाच्या वेळेस व स्थितीस अनुसरून रोगबीजें वगैरे कशीं व केव्हां उत्पन्न करावयाचीं याचा विचार व व्यवस्था सर्व देवांकडून (स्वयंप्रकाश ब्रह्मांडावरील) होते. याकरतां व पापपुण्याचा हिशेब ठेवण्याकरतां; तसेंच मेघवर्षाव; हवेची गति व तिच्यांतील रोग, कलह, दुःख आणि सुख यांचीं बीजें; भूकंप; वादळें वगैरेंच्या व्यवस्थेकरतां अनेक निरनिराळे देव व त्यांचे दूत आहेत. ते सर्व पाहिजे तेव्हां ग्रह उपग्रहांवर अदृश्य रूपानें येऊं शकतात. तसेंच जरूर तर देव अवतार धारण करून सुनीतीची स्थापना व कुनीतीचा उच्छेद करूं शकतात. चार प्राण किंवा मस्तकांतील परमेश्वरअंशास धक्का बसल्यास अथवा त्यांचा स्थानविक्षेप झाल्यास प्राणांची स्थूळ देहांत धारणा होत नाहीं ह्मणजे प्राणोत्क्रमण होतें. प्राणाला चार उपप्राण फुटल्याशिवाय व परमेश्वरअंशाशीं संबंध असल्याशिवाय स्थूळदेहधारणा होत नाहीं. परमेश्वरअंशाशिवाय ज्ञान विकास पावत नाहीं; ज्ञानामुळें स्मृती, तिच्यामुळें विचार व त्यायोगें आनंद जेव्हां होतो तेव्हां प्राणाचें ज्ञान विकास पावलें ह्मणावयाचें. प्राणोत्क्रमणाचे वेळीं पंचप्राण एकवटतात. परमेश्वरी अंशापासून प्राण

निराळा नसता तर मायेचा खेळ (अविचार व दुःखाकडे ओढा) चालला नसता आणि परमेश्वरअंशाचा संबंध प्राणाशीं नसता तर ज्ञानप्राप्ति पाहिजे तितकीच झाली नसती. ज्ञान (प्रत्यक्षत्व), ज्ञानाचा विकास (आनंद) व मोक्ष (निरुपाधि) हीं परमेश्वरअंशाचा संबंध प्राणाशीं असल्याशिवाय होत नाहींत. प्राण हा एक मोठा सजीव परमाणु ह्मणजे ब्रह्मरूपाप्रमाणें जरी आहे तरी तो परब्रह्मछायारूप असल्यामुळें ब्रह्माहून विशेष सामर्थ्यवान् व त्रिकोशमय आहे. पांचही प्राणांत आपआपल्या अधिकाराप्रमाणें चमत्कारिक सामर्थ्य असतें. देहधारणेशिवाय परमेश्वरअंशाचा संबंध प्राणास मिळत नाहीं. प्राणाचा संबंध मन ज्ञानतंतूंद्वारें सर्वांशीं जोडतें. ज्ञानतंतूंत, प्राणास आपल्या ज्ञानाचा उपयोग करून घेतां येण्यासारखा गुण परमेश्वरी अंशाच्या संबंधामुळें असतो. मनामुळें त्याला उपयोग करून घेतां येतो. स्मृतीचें व विचाराचें हीं चक्रें अति सूक्ष्म ज्ञानतंतुमय असतात. विचाराच्या चक्रांत देवअंश वास करतात. स्मृतीचें चक्र अति त्वरेनें फिरूं शकतें. त्यांत वास अथवा स्वाद घेतलेलें, ऐकलेलें व पाहिलेलें सर्व सांठविलें जातें. याला मनामुळें गती असते. येथून प्राणाकडे जाणाऱ्या ज्ञानतंतूसमोर याचा जो भाग असतो त्याची आठवण प्राणास असते. परमेश्वरअंश आणि विचारजाळें याशिवाय इतर ज्ञानतंतूंचा संबंध प्राणाशीं मनामुळें जडलेला असतो. ज्ञानामुळें चैतन्य विकास पावतें व मनामुळें सामर्थ्य विकास पावतें. विचारांत मनासारखा चपळपणा नसतो. प्राण शरिराचा राजा किंवा मालक असून तो आपल्या

मर्जीप्रमाणें कधीं कधीं इच्छेच्या (मनाच्या) विरुद्धही शरिराकडून क्रिया करवितो व कृतीप्रमाणें फळें भोगतो.

उपासना—मूर्तिपूजा, यज्ञ वगैरे क्रिया, प्रार्थना, नमस्कार अथवा भजन, योगसाधन व ध्यान असे उपासनेचे अनेक प्रकार आहेत. यासंबंधानें परमेश्वरस्फूर्तिद्वारें निघालेले स्वामींचे शब्द असे आहेत:—

माझ्या सत्य रूपाचें जरी न होय ज्ञान जाण ॥ माझ्या नांवें अर्ची का पाषाण ॥ मी सर्वव्यापी त्यांत वसोन ॥ फलप्राप्ती देतसें ॥ १४० ॥ परी अशा भक्तीला मोक्ष नसे ॥ सुबुद्धी, ज्ञान, सुख मात्र मिळतसे ॥ माझे मुख्यरूपा ज्ञानी भजतसे ॥ मोक्षप्राप्ती त्या सद्वर्तनें ॥ १४१ ॥ जप, तप, पूजन, अर्चन ॥ अनुष्ठान, होम, हवन ॥ हीं ब्रह्मज्ञान ध्यानयोगापुढें गौण ॥ मम मुख्य रूप मोक्ष पै ॥ १४२ ॥ जरी कोणतेही ब्रह्मांडावरील मनुष्य ॥ मम ज्ञानभक्तिरत होय नित्य ॥ विरक्तेनें वा विदेहीत्वें अहंभाव विसरत ॥ तो पावे मोक्षपदा ॥ ७२ ॥ मम स्थान तो मोक्ष जाण ॥ तेथें ज्ञानी रहाती मम तेजीं लीन ॥ त्यांसी वरिष्ठ ब्रह्मांडावरी जाण्याचें कारण ॥ नाहींच कदां काळीं ॥ ७३ ॥ पुण्यवानाकरतां ब्रह्मांडें वरिष्ठ ॥ ज्ञानी भक्तासी ममहृदय संपुट ॥ अज्ञान भक्तिसी पुण्यवानाची वाट ॥ धरावी लागे ॥७४॥ माझी भक्ती आणि ज्ञान ॥ जन्मांतरींही नष्ट न होय जाण ॥ बुद्धी त्यापरीच पूर्ण ॥ उपजतांची

॥ १८५ ॥ सत्धर्म नीतिस्थापनासाठीं ॥ मम अंश देव अवतार घेती ॥ स्थितीस जरूर ती रीती स्थापिती ॥ क्रौर्य अज्ञान विभांडोनी ॥ १९१ ॥

परमेश्वर सर्वसाक्ष सर्वव्यापी आहे. त्याची भावना धरून पाहिजे त्या प्रकारची उपासना केली तरी तो फलप्राप्ति देतो, मात्र कोणत्याही प्रकारची उपासना करणें झालें तरी ती नियमबद्ध असली पाहिजे व उपासना करणाराची वागणूक नीतिपर असली पाहिजे. ज्ञानमार्गांनीं परमेश्वराची उपासना ह्मणजे भक्ती केली तरच मोक्षप्राप्ती होते. इतरांची ह्मणजे देवांची अथवा दैवतांची किंवा थोर पुरुषांची भक्ती केल्यास सुनीतीकडे प्रवृत्ती होणें, ऐहिक सुख मिळणें, न समजून घडलेल्या पापाची क्षमा होणें, शरिराचा फायदा होणें, चित्त एकाग्र करतां येणें ह्मणजे ध्यानमार्गाकडे प्रवेश होणें असे फायदे भक्तीच्या दृढतेला, सुनीतीच्या वागणुकीला व नियमितपणाला अनुसरून कमजास्त होतात. प्राणाचें सामर्थ्य व ज्ञान सर्वांत सारखें नसून पुण्याच्या व भक्तीच्या मानाप्रमाणें कमजास्त असतें. ज्यांच्यांत कमी असतें त्यांनीं जास्त असणारांस मान देणें, श्रेष्ठ समजणें, वंदन करणें, त्यांची सेवा करणें व आज्ञा मानणें योग्य होय, कारण त्यामुळें देवांची किंवा दैवतांची भक्ती केल्याप्रमाणें होतें. सारांश, कनिष्ठानें वरिष्ठांस श्रेष्ठ मानून वागणें हा सन्मार्ग होय व तो तहत परमेश्वरापासून अति क्षुल्लक प्राण्यांपर्यंत व पदार्थांपर्यंत सारखा लागू आहे, कारण श्रेष्ठाचे ठिकाणीं परमेश्वराचें अधिक सत्व असतें व कनिष्ठाचे ठिकाणीं कमी असतें व कमी जें तें जास्तीपुढें गौण होय हें

उघड आहे. आतां उपासनेच्या निरनिराळ्या प्रकारांविषयीं थोडा विचार करूं ह्मणजे झालें.

मूर्तिपूजा—परमेश्वराची भावना करून देवांची अथवा थोर लोकांची भक्ती करण्याकरतां प्रतिमा करून पूजन अर्चन करण्याचा रिवाज पृथ्वीवर अनेक ठिकाणीं आहे. प्रतिमा पाषाणाच्या, मातीच्या किंवा धातूच्या मनुष्याकृतींच्या असतात; कित्येक लोकांत तर लांकडाचीं तिगटीं, मृत मनुष्यांचीं थडगीं किंवा कबरी अशा अनेक प्रकारच्या प्रतिमांचा रिवाज आहे. यांमुळें परमेश्वराच्या प्रत्यक्ष भक्तीप्रमाणें जरी फायदा होत नाहीं तरी देवांच्या भक्तीप्रमाणें फायदा होतो ह्मणजे वर दर्शविल्याप्रमाणें सुनीती लागते, पूजेच्या सुगंधामुळें वगैरे शारीरिक फायदा होतो, ऐहिक सुख मिळतें, पापाची कदाचित् कांहींशी क्षमा होते व चित्त एकाग्र करण्याची संवय लागते. ही शेवटील गोष्ट मोठ्या फायद्याची आहे, कारण सर्वांत श्रेष्ठ उपासना जी योगधारणा किंवा ध्यान ती चित्ताच्या एकाग्रतेशिवाय होऊं शकत नाहीं. शिवाय कांहीं आकाराविना ध्यान कसें करतां येईल?

यज्ञ, याग वगैरे क्रिया—यांत सुगंधी व हवाशुद्धिकारक वगैरे द्रव्यें जाळल्यामुळें व मंत्रघोषामुळें देव संतुष्ट झाल्याकारणानें हवा शुद्ध होऊन वेळच्या वेळीं पर्जन्यवृष्टि चांगली होते, सांथीचे रोग वगैरे होत नाहींत, भूकंप व वादळें होत नाहींत, देशांत आबादानी होते, लोकांस सुबुद्धि होऊन सुनीतीची पुष्टि होते आणि इच्छित कार्यें घडून येतात. देवपूजेंतील सुगंधी पदार्थांच्या उपयोगांनींही थोड्या जागेंत पण असेच फायदे होतात.

भजन, नमस्कार, जप, प्रार्थना—ॐकार हा परमेश्वराचा ध्वनि किंवा नाद असून केवळ परमेश्वररूपच आहे. ध्वनि किंवा नाद हा जगांत सर्वव्यापी आणि महत्वाचा आहे. त्यामुळें आनंद व सामर्थ्य उत्पन्न होतें, इतकेंच नाहीं, त्यामुळें प्राणाचें दुसऱ्या प्राणाशीं, देवाशीं व परमेश्वराशीं ऐक्य होतें. हवेमुळें त्याची (नादाची) उत्पत्ति होते व हवेनेंच त्याला गति प्राप्त होऊन ती त्याला इच्छित स्थळीं पोंचविते. भजन, जप, प्रार्थना व नमस्कारापासून पूजन-अर्चनाप्रमाणेंच फायदे होतात. त्यांत नाद जितका अधिक सुस्वर व त्यांतील अर्थ जितका अधिक महत्वाचा असेल तितका विशेष फायदेशीर असतो. मात्र इतर ठिकाणीं परमेश्वराची भावना करून जो फायदा व्हावयाचा त्याहून प्रत्यक्ष परमात्म्याप्रीत्यर्थच केलेली भक्ती किंवा उपासना सर्व प्रसंगीं विशेष फलप्रद होते हें पक्कें लक्षांत वागविलें पाहिजे.

तप व योगसाधन—तप हा भक्तीचा वरिष्ठ मार्ग आहे, पण वरीलप्रमाणें तेंही परमेश्वरप्रीत्यर्थ असल्यास किंवा योगधारणामय असल्यास उत्तम. यापासूनही इच्छित फलप्राप्ती होते. योगसाधन ह्मणजे प्राणाला पाहिजे तशी गती देणें व त्याला ऊर्ध्व चढवून मस्तकांत देवांचें व परमेश्वराचें दर्शन करविणें. याला हठयोग ह्मणतात. हठयोगांत शरिरास कष्ट द्यावे लागत असून त्याचे प्रकार अनेक आहेत. यापासून आयुष्य वर्धमान होतें, सर्व सिद्धी प्राप्त होतात, त्रिकाळज्ञान प्राप्त होतें व मोक्ष प्राप्त होतो. याचे प्रयोगांचा संबंध श्वासोच्छ्वासाशीं (ॐकार

किंवा प्राणवायूशीं) विशेषेंकरून असतो. श्वासोच्छ्वासाच्या प्रवाहावरून भूतभविष्य समजण्याचीही एक रीत आहे व त्या प्रवाहाच्या साधनानेंही सिद्धि प्राप्त करून घेतां येते.

ध्यान व समाधि—ह्मणजे स्वस्थांतःकरणानें एखाद्या गोष्टीचें, व्यक्तीचें अथवा पदार्थाचें चिंतन करणें. ज्या पदार्थाचें किंवा व्यक्तीचें ध्यान करावयाचें त्याचें जितकें व जसें महत्व असेल त्याप्रमाणें ध्यान फलद्रूप होतें. सर्वांत प्ररमेश्वराचें ध्यान करणें यासारखा त्याचे भक्तीचा किंवा उपासनेचा सुलभ व श्रेष्ठ मार्ग दुसरा कोणताच नाहीं. त्यांत नुसतें ध्यान करण्यापेक्षां मुखानें त्याचें नामस्मरण करून ध्यान करणें सर्वोत्कृष्ट होय. ॐकाराचा किंवा त्याच्या दुसऱ्या उपमांचा जप करून ध्यान करणें यालाच पूर्वींच्या श्रेष्ठ व सर्वज्ञ पुरुषांनीं राजयोग असें ह्मटलें आहे व त्याचे विधी सांगितले आहेत. ध्यानाच्या योगेंही योगधारणेप्रमाणेंच सर्व सिद्धी व मोक्ष प्राप्त होतो. ध्यानापासून व योगापासून तीं चांगल्या प्रकारें साध्य झालीं ह्मणजे जितका काळपर्यंत आत्मा ऐहिक सर्व व अहंभाव विसरून परमेश्वरतत्वासी किंवा ध्यानस्थ व्यक्तीसी लीन होतो तितक्या काळालाच समाधि असें ह्मणतात. समाधीची स्थिति बहुधा सुषुप्ति ह्मणजे निद्रा याप्रमाणें असते, त्या वेळीं आत्मा इतर सर्व उपाधिरहित आनंदांत व परब्रह्म अथवा इतर रूपदर्शनांत अगदीं तल्लीन व निमग्न होऊन गेलेला असतो. या प्रकारच्या समाधीसाधनापर्यंत ज्याच्या ध्यानाची किंवा योगाची मजल येऊन पोंचली असेल त्यासच वर लिहिलेलीं योगाचीं व ध्यानाचीं फळें जीं सर्वसिद्धी,

इच्छित आयुष्य, त्रिकाळज्ञान, अदृश्य देहधारणा आणि परमेश्वरप्रीत्यर्थ समाधी असल्यास मोक्ष, हीं प्राप्त होतात, इतरांस कधींच होत नाहींत. इतर ठिकाणीं परमेश्वरभावना केलेली असल्यास मोक्ष मिळत नाहीं. सर्वांत सुलभ ध्यानमार्ग ह्मटला ह्मणजे निवांत वेळीं व स्थळीं पद्मासन घालून पूर्वेकडे तोंड करून बसून दोनही हातांच्या आंगठ्यांनीं कानांचीं दोनही छिद्रें बंद करून व दुसऱ्या बोटांनीं दोनही डोळे बंद करून तोंडानें परमेश्वरनामोच्चार करीत परमात्म्याच्या अमित तेजमय रूपाचें एकाग्र चित्तानें ध्यान करणें हा होय असें महाज्ञानी व समर्थ श्रीसद्गुरु वैवस्वत स्वामी महाराजांचें ह्मणणें आहे व त्याकरतां त्यांनीं मंत्रही सांगितला आहे.

परमेश्वरप्राप्तीच्या उपासनेचे जे मार्ग वर सांगितले त्यांत दोन प्रकार आहेत. एक ऐहिक व्यवहार सर्व सोडून विरक्ततेनें राहून उपासना करणें ह्मणजे निवृत्तिमार्ग व दुसरा ऐहिक व्यवहार रीतीप्रमाणें व नीतीनें सर्व करून व त्यांत विरक्त राहून उपासना करणें हा प्रवृत्तिमार्ग. यांत श्रेष्ठ पंथ कोणता याविषयीं विचार केल्यास दुसरा मार्ग श्रेष्ठ होय असें सिद्ध होतें, कारण दुसऱ्यापासून जन्माच्या हेतूचें सार्थक होतें, ह्मणजे सुकीर्ती व सुख मिळतें, परोपकार व पुण्य घडतें व शेवटीं मोक्षही मिळतो. संसार करणें आणि न करणें या दोहोंतही सुखदुःखें बहुधा सारखींच असतात. संसारांत दुःखाचें मान ज्याप्रमाणानें अधिक असतें त्याप्रमाणें सुखही अधिक असतें, ह्मणून दुःखाची पर्वा न करतां विदेहीपणें आणि सुनीतीनें संसार करून व सर्व सुखदुःखें अनुभवून जन्माचें सार्थक करणेंच उत्तम होय.

सारांश दुसऱ्या पंथामुळें मिळालेल्या सोंगाची बतावणी बरोबर केल्यामुळें परमेश्वरास आनंद होतोच आणि भक्तीमुळें तो दुप्पट वाढतो ह्मणजे केवळ दुधांत साखर घातल्याप्रमाणें होतें, असें पहिल्यानें होत नाहीं. मनुष्यदेह ह्मणजे ज्ञानाची बतावणी करण्याचें सोंग होय, सबब ज्यानें सुकीर्ति, सुख, पुण्य व मोक्ष मिळविलीं नाहींत त्याची बतावणी विशेष साधनें प्राप्त झालेलीं असून इतर प्राण्यांहून कांहींच जास्त झाली नाहीं ह्मणून त्याचा जन्म व्यर्थ होय. याप्रमाणें प्रवृत्तिमार्ग श्रेष्ठ जरी आहे तरी वृद्धापकाळीं उद्योगसामर्थ्य नष्ट होईल तेव्हां निवृत्तिमार्गाचें अवलंबन करणें उत्तम होय. याविषयीं परमेश्वरस्फूर्तीचे शब्द असे आहेत.

विदेहीपणें पुण्य आणि समाधी करून ॥
जो वर्ते पराक्रमें स्थितीस अनुसरून ॥
तो महा ज्ञानी श्रेष्ठ पूर्ण ॥
मज प्रीय तो सर्वांत ॥ १४५ ॥

पूर्ण विचार करून पाहिल्यास जग हें मुळींच मिथ्या आहे, कारण ज्ञानामुळें जो भास होतो त्यामुळेंच सर्व प्रत्यक्ष आहे असें वाटतें, नाहीं तर निद्रेंत असतां चैतन्य, अवयव व इंद्रियें असूनही सर्व शून्यवत् असतें. तसेंच अक्षयी असें जगांत प्रत्यक्ष कांहींच नाहीं. यावरून जें आपल्याला प्रत्यक्षसें वाटतें तें प्रत्यक्ष कशावरून! स्वप्नांतही जें मिथ्या तें प्रत्यक्षसें वाटतें, तेव्हां जागृति हें एक मोठें स्वप्नच असें ह्मणण्याला कांहीं हरकत नाहीं. फक्त ज्ञानामुळें जो भास होतो तो प्रत्यक्षसा वाटतो, नाहीं तर सर्व मिथ्या आहे

असें जरी आहे तरी स्वप्नांतही आपण जसा आपला आपले-
पणा (अहंभाव अथवा अहंकार) सोडीत नाहीं तसा या
जागृतीच्या मोठ्या स्वप्नांतही न सोडतां आपणांस प्राप्त झा-
लेल्या सोंगाची विदेहीपणांनीं किंवा विरक्ततेनें योग्य बता-
वणी करणें व सदैव त्या जगन्नियंत्याचें नामस्मरण करून
तद्रूपीं लीन रहाणें अत्यावश्यक आहे. ह्मणून येथें ही अंतीं–

॥ ॐ ब्रह्मपरब्रह्माय नमः ॥

समाप्त.

हें पुस्तक विकत मिळण्याचीं ठिकाणें.

१. राधाबाई आत्माराम सगुण आ० कं०, काल-
कादेवीरोड, मुंबई.

२. जगद्धितेच्छु छापखाना, पुणें.

३. जगद्धितेच्छु छापखान्याचें बुकें विक्रीचें दुकान, रामवाडीचा नाका, मुंबई.

४. सिताराम रघुनाथ अधिकारी, रेसिडेंट इंजिनीयरचें ऑफीस, भडोच.

सूचना—पोष्टांतून मागविणारांनीं किंमतीशिवाय दीड आणा पाठविला पाहिजे. रक्कम पाठविणें ती पोष्टाच्या अर्धा आण्याच्या तिकिटानें वर्तविल्यासुद्धां पाठवावी. पत्रव्यवहार करणें असल्यास उत्तराकरतां तिकीट यावी.